१२८१

म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

सं. क्र. ३३८ अ

REFBK-0001962

क्र. मं. ठाणे

(शालेय)

# महाराष्ट्राचा इतिहास

इ. ३३८ अ



REFBK-0001962

किंमत ८ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं. इतिहास २८५
ता. ..........
नाशिक शाखा

( शालेय )

# महाराष्ट्राचा इतिहास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं. मा.१.२३
ता.........

लेखक

**यशवंत गणेश फर्के**

शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणें.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

नवीन किताबखाना, पुणें.

प्रथमावृत्ति २०००

१९२१

Transferred to V. H. Damle, Propritor New Kitabkhana, Poona. First Edition 1921.

Printed by L B. Kokate of the Hanuman Press, 300 Sadashiv, Poona, and Published by V. H. Damle, 627 Budhwar Peth Poona.

मराठी ग्रंथ
नं..... ......
ता.........

# लेखकाचें निवेदन

मराठी चौथ्या इयत्तेंतील मुलांसाठीं महाराष्ट्राचा सोपासा इतिहास लिहावा असें प्रथम माझ्या मनांत येऊन मी " महाराष्ट्राचा गोष्टीरूप इतिहास" लिहिला, त्यास एक तपाहून अधिक काळ लोटला. हाच इतिहास कांहीं फेरफार व संक्षेप करून रा. ग. बा. बोरवणकर यांनीं प्रसिद्ध केला. हा इतिहास मूळ लिहितांना कांहीं बखरी व ग्रँट डफचा इतिहास एवढ्याच साधनांचा उपयोग केला होता. पण गेल्या दहा पंधरा वर्षांत इतिहासभक्त रा. ब. पारसनीस, राजवाडे, खरे वगैरे संशोधकांच्या अविश्रांत परिश्रमानें महाराष्ट्राच्या इतिहासाचीं अपार साधनें प्रसिद्ध झालीं, पूर्वींच्या अनेक कल्पना व समजुती चुकीच्या ठरल्या, अनेक संशयित गोष्टींचा निर्णय झाला आणि मराठ्यांच्या एकंदर इतिहासावर इतका नवा प्रकाश पडला कीं, बारा वर्षांपूर्वीं तुटपुंज्या साधनांवर लिहिलेलीं पुस्तकें अजूनही तशींच विद्यार्थ्यांचे हातीं ठेवणें इष्ट राहिलें नाहीं. अनेक विद्वानांनीं असें मत प्रदर्शित केल्यावरून व अनेकांनीं सुचविल्यावरून प्रस्तुतचें हें नवें पुस्तक तयार केलें आहे.

आजवर प्रसिद्ध झालेल्या साधनांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाची जी रूपरेषा निश्चित झाली आहे तीच या पुस्तकांत रेखाटली आहे. विद्यार्थ्यांस वाचावयास व शिक्षकांस शिकवावयास सोईचें पडावें म्हणून एकंदर इतिहासाचे ५० पाठ केले आहेत. यांतील प्रत्येक पाठ निराळा वाचल्यास ती एक स्वतंत्र गोष्टच आहे असें वाटेल. पण क्रमानें वाचिल्यास हे पाठ म्हणजे सुसंगत इतिहासाचीं निरनिराळीं प्रकरणेंच आहेत असें दिसून येईल व कोठेंही संगति तुटल्यासारखी वाटणार नाहीं अशी रचना केली आहे. भाषा बालवाचकांस योग्य होईल इतकी

सोपी पण चटकदार योजण्याचा प्रयत्न केला आहे. तारखा, स्थने व नांवें यांची गर्दी होऊं दिली नाहीं. बारीक तपशील शक्य तितका गाळला आहे. प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगाचें व गोष्टीचें सामान्य स्वरूप कळण्यास आवश्यक तेवढाच भाग दिला आहे. मुलांच्या आवांक्याबाहेरचें राजकारण अगदीं येऊं दिलें नाहीं आणि महाराष्ट्राच्या एकंदर इतिहासाचें अगदीं सामान्य, ठोकळ ज्ञान विद्यार्थ्यांस व्हावें व त्याच्या उज्वलतेचा ठसा त्यांचे अंतःकरणांत यथावत् उमटावा असा शक्य तो प्रयत्न केला आहे.

हें पुस्तक चित्ताकर्षक व सुबोध व्हावें म्हणून यांत प्रसिद्ध पुरुषांचीं कांहीं चित्रें व उपयुक्त नकाशे दिले आहेत. आणखी बऱ्याच पुरुषांचीं चित्रें, महत्त्वाच्या स्थलांचीं छायाचित्रें, व भरपूर नकाशे देण्याची योजना केली होती. परंतु त्यांसाठीं जे संच तयार करावे लागतात ते वक्तशीर हातीं न आल्यामुळें तो बेत तहकूब करावा लागला. तथापि हा माझा प्रयत्न बालशिक्षणपटु विद्वज्जनांस मान्य व बालवाचकांस प्रिय झाला तर त्या योजनेप्रमाणें सर्व चित्रें व नकाशे देऊन पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग याहूनही सुंदर करावें अशी इच्छा आहे.

हें पुस्तक तयार करण्याविषयीं ज्यांनीं प्रेरणा केली व प्रोत्साहन दिलें आणि लेखनाचें काम तडीस जाण्यास लागणारें मनःस्वास्थ्य ज्यांच्यामुळें मला लाभलें त्यांचा येथें नामनिर्देश करतां येत नाहीं तथापि त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य होय.

या पुस्तकांतील न्यूनाधिक कोणी कृपा करून कळविल्यास व सूचना केल्यास मी त्यांचा फार आभारी होईन व पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास त्या सर्वांचा उपयोग करीन.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.
पौष वद्य ४ शके १८४२.

य. ग. फफे.

# अनुक्रमणिका.

—:❀:—


| पाठांक. | पाठाचें नांव. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रदेश ... ... ... ... | १ |
| २ | महाराष्ट्रांतील प्राचीन राजवंश ... ... | ३ |
| ३ | मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश ... ... | ५ |
| ४ | लहरी महंमद तवलघ ... ... ... | ७ |
| ५ | बहामनी राज्य व त्याचे पांच विभाग... ... | ८ |
| ६ | बहामनी राज्याचे वेळची महाराष्ट्रांतील लोकांची स्थिति | १० |
| ७ | चांदबिबी आणि मलिकंबर ... ... | १२ |
| ८ | चंद्रसूर्यवंशांचा संयोग ... ... ... | १४ |
| ९ | स्वराज्यसंकल्पक शहाजीराजे भोसले ... ... | १६ |
| | **छत्रपति शिवाजी महाराज.** | |
| १० | स्वराज्यसंस्थापनेची तयारी ... ... | १९ |
| ११ | स्वराज्याचें तोरण ... ... ... | २१ |
| १२ | अफझुलखानाचा वध ... ... ... | २२ |
| १३ | नरवीर बाजी प्रभु ... ... ... | २४ |
| १४ | शाएस्तेखानाची तारांबळ... ... ... | २६ |
| १५ | ठकास महाठक ... ... ... | २८ |
| १६ | गड आला पण सिंह गेला ... ... | ३१ |
| १७ | नरवीरांची जोडी-प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते | ३३ |
| १८ | राज्याभिषेकाचा महोत्सव ... ... | ३५ |
| १९ | दक्षिण–दिग्विजय ... ... ... | ३७ |
| २० | शिवाजीची राज्यव्यवस्था ... ... ... | ३८ |
| | **छत्रपति संभाजी महाराज.** | |
| २१ | संभाजीचा वध ... ... ... | ४० |

सोपी पण चटकदार योजण्याचा प्रयत्न केला आहे. तारखा, स्थानें व नांवें यांची गर्दी होऊं दिली नाहीं. बारीक तपशील शक्य तितका गाळला आहे. प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगाचें व गोष्टीचें सामान्य स्वरूप कळण्यास आवश्यक तेवढाच भाग दिला आहे. मुलांच्या आवांक्याबाहेरचें राजकारण अगदीं येऊं दिलें नाहीं आणि महाराष्ट्राच्या एकंदर इतिहासाचें अगदीं सामान्य, ठोकळ ज्ञान विद्यार्थ्यांस व्हावें व त्याच्या उज्ज्वलतेचा ठसा त्यांचे अंतःकरणांत यथावत् उमटावा असा शक्य तो प्रयत्न केला आहे.

हें पुस्तक चित्ताकर्षक व सुबोध व्हावें म्हणून यांत प्रसिद्ध पुरुषांचीं कांहीं चित्रें व उपयुक्त नकाशे दिले आहेत. आणखी बऱ्याच पुरुषांचीं चित्रें, महत्त्वाच्या स्थलांचीं छायाचित्रें, व भरपूर नकाशे देण्याची योजना केली होती. परंतु त्यांसाठीं जे संच तयार करावे लागतात ते वक्तशीर हातीं न आल्यामुळें तो बेत तहकूब करावा लागला. तथापि हा माझा प्रयत्न बालशिक्षणपटु विद्वज्जनांस मान्य व बालवाचकांस प्रिय झाला तर त्या योजनेप्रमाणें सर्व चित्रें व नकाशे देऊन पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग याहूनही सुंदर करावें अशी इच्छा आहे.

हें पुस्तक तयार करण्याविषयीं ज्यांनीं प्रेरणा केली व प्रोत्साहन दिलें आणि लेखनाचें काम तडीस जाण्यास लागणारें मनःस्वास्थ्य ज्यांच्यामुळें मला लाभलें त्यांचा येथें नामनिर्देश करतां येत नाहीं तथापि त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य होय.

या पुस्तकांतील न्यूनाधिक कोणी कृपा करून कळविल्यास व सूचना केल्यास मी त्यांचा फार आभारी होईन व पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास त्या सर्वांचा उपयोग करीन.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.
पौष वद्य ४ शके १८४२.

य. ग. फफे.

# अनुक्रमणिका.

—:ॐ:—



| पाठांक. | पाठाचे नांव. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रदेश ... ... ... ... | १ |
| २ | महाराष्ट्रांतील प्राचीन राजवंश ... ... | ३ |
| ३ | मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश ... ... | ५ |
| ४ | लहरी महंमद तवलघ ... ... ... | ७ |
| ५ | बहामनी राज्य व त्याचे पांच विभाग... ... | ८ |
| ६ | बहामनी राज्याचे वेळची महाराष्ट्रांतील लोकांची स्थिति | १० |
| ७ | चांदबिबी आणि मलिकंबर ... ... | १२ |
| ८ | चंद्रसूर्यवंशांचा संयोग ... ... ... | १४ |
| ९ | स्वराज्यसंकल्पक शहाजीराजे भोसले ... ... | १६ |
| | **छत्रपति शिवाजी महाराज.** | |
| १० | स्वराज्यसंस्थापनेची तयारी ... ... | १९ |
| ११ | स्वराज्याचें तोरण ... ... ... | २१ |
| १२ | अफझुलखानाचा वध ... ... ... | २२ |
| १३ | नरवीर बाजी प्रभु ... ... ... | २४ |
| १४ | शाएस्तेखानाची तारांबळ... ... ... | २६ |
| १५ | ठकास महाठक ... ... ... | २८ |
| १६ | गड आला पण सिंह गेला ... ... | ३१ |
| १७ | नरवीरांची जोडी-प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते | ३३ |
| १८ | राज्याभिषेकाचा महोत्सव ... ... | ३५ |
| १९ | दक्षिण—दिग्विजय ... ... ... | ३७ |
| २० | शिवाजीची राज्यव्यवस्था ... ... ... | ३८ |
| | **छत्रपति संभाजी महाराज.** | |
| २१ | संभाजीचा वध ... ... ... | ४० |

| पाठांक. | पाठाचें नांव. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| | **छत्रपति राजाराम महाराज.** | |
| २२ | जिंजीस प्रयाण ... ... ... | ४३ |
| २३ | स्वराज्यसंरक्षणाची पराकाष्ठा ... ... | ४५ |
| २४ | **छत्रपति शाहू महाराज.** | |
| | **बाळाजी विश्वनाथ पेशवे.** | |
| २५ | बाळाजी विश्वनाथाचा उदय ... ... | ४९ |
| २६ | साम्राज्यवृक्षाचें बीजारोपण ... ... | ५२ |
| | **थोरले बाजीराव पेशवे.** | |
| २७ | बाजीरावाची निजामावर स्वारी ... ... | ५४ |
| २८ | बाजीरावाचे नवे सरदार-शिंदे, होळकर, पवार व बुंदेले | ५६ |
| २९ | आपसांतील कलह ... ... ... | ५८ |
| ३० | बाजीरावाचे तीन महापराक्रम सिद्दीचा बंदोवस्त, , दिल्लीवर स्वारी व निजामाचें पारिपत्य ... | ६० |
| ३१ | बाजीरावाचा पाठीराखा चिमाजीअप्पा ... | ६२ |
| | **बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब** पेशवे. | |
| ३२ | बाळाजी बाजीराव पेशवा होतो ... ... | ६४ |
| ३३ | शाहूचा मृत्यु ... ... ... ... | ६६ |
| ३४ | साम्राज्याचा दक्षिणेंत विस्तार ... ... | ६८ |
| ३५ | साम्राज्याचा उत्तर हिंदुस्थानांत विस्तार ... | ७० |
| ३६ | अहमदशहा अबदल्लीच्या स्वाऱ्या ... ... | ७२ |
| ३७ | पानिपतचा घनघोर संग्राम ... ... | ७४ |
| | **थोरले माधवराव पेशवे.** | |
| ३८ | राघोबादादांचा कारभार ... ... ... | ७७ |
| ३९ | हैदरअल्लीवर स्वाऱ्या ... ... ... | ७९ |
| ४० | पानिपतचा सूड ... ... ... | ८१ |
| ४१ | माधवरावाचा मृत्यु ... ... | ८३ |

| पाठांक. | पाठाचें नांव. | पृष्ठांक. |
| --- | --- | --- |
| | **नारायणराव पेशवे.** | |
| ४२ | नारायणरावाचा खून ... ... ... | ८४ |
| | **सवाई माधवराव पेशवे.** | |
| ४३ | बारभाईंचें कारस्थान ... .. ... | ८६ |
| ४४ | इंग्रजांबरोबर लढाई ... ... ... | ८७ |
| ४५ | नाना आणि महादजी ... .. ... | ८९ |
| ४६ | मराठ्यांच्या सामर्थ्याचें अखेरचें प्रदर्शन ... | ९१ |
| ४७ | सवाई माधवरावाचा मृत्यु ... ... | ९३ |
| | **धाकटे बाजीराव पेशवे.** | |
| ४८ | मराठ्यांचें राज्य डळमळूं लागलें ... ... | ९५ |
| ४९ | मराठ्यांच्या राज्याचा शेवट ... ... | ९७ |
| ५० | इंग्रजी अमदानी ... ... ... | ९९ |


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
नं.........
ता.........


भोपाळ
धार
नर्मदा नदी
असीरगड
एलिचपूर
तापी नदी
नागपूर
सुरत
साल्हेर
नाशिक
वेरूळ
असई
दौलताबाद
औरंगाबाद
जालना
माहूर
पैठण
बसई
मुंबई
अहमदनगर
गोदावरी नदी
पुणे
उदगीर
परांडा
वरंगळ
सातारा
कल्याणी
बेदर
कलबुर्गी
अक्कलकोट
हैद्राबाद
मालखेड
रत्नागिरी
मिरज
विजापूर
राजापूर
कोल्हापूर
रायचूर
बदामी
कर्नूल
धारवाड
विजयानगर
चित्रदुर्ग
कडप्पा
मद्रास
वंगलूर
कोलार
श्रीरंगपट्टण
म्हैसूर
जिंजी
तंजावर
रामेश्वर

महाराष्ट्राचा नकाशा.

... ग्रंथ संग्रहालय ठाणे. नं. सं. ८. २३६ ता.........

( शालेय )

# महाराष्ट्राचा इतिहास.

## १. महाराष्ट्र देश.

दक्षिण हिंदुस्थानाचे मध्यभागीं सर्व बाजूंनीं पर्वतांनीं वेढलेलें एक मोठें पठार आहे. त्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत आहे. पश्चिमेस सह्याद्रीची ओळ असून तिचे पलीकडे कोंकणाची अरुंद पट्टी व अरबी समुद्र आहे आणि पूर्वेस पूर्वघाट नांवाच्या टेकड्यांच्या तुटक रांगा असून त्यांपलीकडे जमिनीची बरीच रुंद पट्टी व तिचे पलीकडे बंगालचा उपसागर आहे. या त्रिकोनी पठारांतून गोदावरी, कृष्णा व त्यांस मिळणाऱ्या अनेक नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात.

या त्रिकोनी पठाराचा पूर्व व दक्षिण बाजूचा कांहीं प्रदेश सोडून राहिलेल्या भागास प्राचीनकाळीं दक्षिणापथ व दंडकारण्य अशीं नांवें होतीं. याच प्रदेशास पुढें महाराष्ट्र असें नांव पडलें. सुरतेपासून गोव्यापर्यंतच्या कोंकणपट्टीचाही महाराष्ट्रांत समावेश होतो. या महाराष्ट्राच्या मर्यादा म्हटल्या म्हणजे पश्चिमेस अरबीसमुद्र, उत्तरेस सातपुडापर्वत आणि पूर्वेस वैनगंगानदी व वैनगंगा आणि वर्धा यांचे संगमापासून माहूर, सोलापूर, विजापूर यांचे बाजूनें गोव्यापर्यंत जाणारी नागमोडी हद्द ह्या होत.

हजारों वर्षांपूर्वी आर्य लोकांनीं सारें उत्तर हिंदुस्थान व्यापिलें. पण दुर्गम विंध्य पर्वताच्या दक्षिणेस मात्र त्यांचा प्रवेश बराच काळ झाला नाहीं. पुढें अगस्त्य मुनीनें विंध्यास आपणापुढें नमस्कार घालावयास लाविलें, अशी कथा आहे. अगस्त्य मुनीनेंच विंध्य पर्वतामधून प्रथम वाट काढून त्याचे दक्षिणेस आपला आश्रम बांधिला आणि त्या-

नंतर दंडकारण्यांत आर्यांची वसाहत होऊं लागली. अयोध्येचा राजपुत्र रामचंद्र हा आपला भाऊ लक्ष्मण व बायको सीता यांसह याच दंडकारण्यांत येऊन चौदा वर्षे राहिला होता. त्यानें गोदावरीच्या कांठीं जनस्थानांत आपला आश्रम बांधिला होता. हें जनस्थान म्हणजे नासिक असें समजतात.

यावेळीं दंडकारण्यांत व त्याचे दक्षिणेकडील प्रदेशांत मधून मधून एका जातीचे धिप्पाड, कुरूप व क्रूर लोक राहात होते. त्यांस पुराणांत राक्षस असें म्हटलें आहे. राक्षसांचा राजा रावण याची राजधानी लंका बेटांत होती. दुसरेही एका जातीचे लोक दक्षिणेंत राहात होते. ते शरिरानें बारीक, चपळ व सुस्वभावी होते. त्यांस पुराणांत वानर असें म्हटलें आहे. या वानरांच्या मदतीनें रामचंद्रानें रावणाचा व सर्व राक्षसां संहार केला.

आर्य लोकांनीं दंडकारण्यांतील झाडी तोडून जमीन लागवडीस आणिली, रस्ते तयार केले, शहरें व गांवें वसविलीं आणि जेथें पूर्वी घोर अरण्य होतें तेथेंच सुमारें पंचवीसशें वर्षांपूर्वी लोकांनीं गजबजलेला, बलाढ्य व संपन्न असा महाराष्ट्र देश उदयास आला.

महाराष्ट्रांतील प्राचीन भाषेचें नांव महाराष्ट्री असें होतें. ती त्या काळच्या सर्व प्राकृत भाषांत श्रेष्ठ होती. तिच्यापासूनच आपली मराठी भाषा झाली आहे. महाराष्ट्रांत राहणारे ते मराठे. मराठा ह्या शब्दांत ब्राह्मणांपासून कुणब्यांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. ‘ मराठा तितुका मेळवावा’ या रामदासाच्या वचनांत मराठा शब्दाचा हाच अर्थ आहे. महाराष्ट्र म्हणजे महान्—श्रेष्ठ—राष्ट्र. हें नांव हजारों वर्षे या देशास चालत आलें आहे आणि या थोर नांवास साजेल असाच महाराष्ट्राचा इतिहास उज्वल आहे.

## २. महाराष्ट्रांतील प्राचीन राजवंश.

महाराष्ट्रांत प्रथम वसाहत करणारे आर्य बहुतेक सोमवंशांतले होते. सोमवंशांतील यदूच्या वंशजांचीं राज्यें महाराष्ट्रांत असल्याचा उल्लेख महाभारतांत आढळतो. सोमवंशांतल्याच भोज कुळांतील राजांनीं विदर्भ म्हणजे वऱ्हाड देशावर राज्य केलें. पण आर्यांचें जें कुळ महाराष्ट्रांत सर्वत्र पसरलें होतें, त्याचें नांव रट्ट असें होतें. यांसच पुढें महारट्ट म्हणूं लागले व महारट्ट म्हणजेच मराठे. या महारट्टांचीं म्हणजे मराठ्यांचीं अनेक स्वतंत्र राज्यें महाराष्ट्रभर पसरलेलीं होतीं. पुढें राष्ट्रकूट म्हणून एक राजवंश प्रसिद्धीस आला, तो या रट्टांपैकींच होता. राठोड म्हणून रजपुतांचें एक प्रसिद्ध कुल आहे. ते राठोड म्हणजे राष्ट्रकूटच होत.

इसवी सनापूर्वी पहिल्या शतकांत महाराष्ट्रावर शालिवाहनांचा अंमल बसला. यांचा पुराणांत अंध्रभृत्य म्हणून उल्लेख आहे. यांची राजधानी पैठण येथें होती. यांनीं ३०० वर्षें राज्य केलें. या काळांत महाराष्ट्राची मोठी भरभराट झाली. शालिवाहनांनीं शक नामक परकीय लोकांपासून देशाचें रक्षण केलें यामुळें शकांच्या वर्षगणनेस 'शालिवाहन शक' असें नांव पडलें. हाच शक महाराष्ट्रांत अद्यापि चालत आहे.

शालिवाहनांनंतर मराठ्यांचीं अनेक लहान लहान राज्यें महाराष्ट्रांत पसरलीं होतीं. पुढें सहाव्या शतकांत चालुक्य कुळाचे हातीं सत्ता गेली. ती २०० वर्षें टिकली. या कुळांत पुलकेशी हा मोठा विख्यात राजा झाला. यानें माळवा व सारें दक्षिण हिंदुस्थान जिंकलें व सगळें उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत करणाऱ्या कनोजच्या हर्ष राजाचाही पराभव केला. याच्या वेळीं सन ६३९ त ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी महाराष्ट्रांत आला होता. त्यानें येथील लोकांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

महाराष्ट्रांतील रीतरिवाज साधेपणाचा व प्रामाणिकपणाचा आहे. लोक बांध्यानें उंच, अभिमानी, जोमदार आणि लढवय्ये आहेत. जो कोणी त्यांचे उपयोगीं पडतो त्यानें त्यांच्या कृतज्ञतेविषयीं खुशाल भरंवसा ठेवावा. पण ज्याचे हातून त्यांचा अपराध घडतो त्याचा सूड उगविल्याशिवाय ते कधींही राहात नाहींत. कोणी त्यांचा अपमान केला तर तो डाग घालविण्यासाठीं ते आपले प्राणही धोक्यांत घालतील. संकटांत पडलेल्या माणसानें त्यांस हाक मारली तर ते त्याच्या मदतीस एकदम धाव घेतील. त्यासमयीं आपलें काय होईल हा विचारही ते विसरतात ! ते आपल्या शत्रूला आगाऊ सूचना देतात आणि मग चिलखत घालून व भाला हातीं घेऊन त्यावर तुटून पडतात. ते शत्रूचा पाठलाग करितात. पण जे शरण येतील त्यांस मारीत नाहींत. ''

आठव्या शतकांत राष्ट्रकूटांचा अमल सुरू झाला आणि दहावे शतकाचे अखेरीस पुन्हां चालुक्यांचे हातीं सत्ता आली. यावेळीं त्यांची राजधानी मोंगलाईत कल्याण येथें होती. या कुळांतील विक्रमार्क हा राजा विशेष प्रसिद्ध आहे.

बाराव्या शतकाचे शेवटीं यादवांचें कुल उदयास आलें. त्यांची राजधानी देवागिरी येथें होती. या वंशांतील राजा रामदेवराव ह्याचा हेमाद्रि म्हणून मोठा शूर व विद्वान् प्रधान होता. त्यास हेमाडपंत असें म्हणत यानेच मोडी लिपी प्रथम काढली असें म्हणतात. प्रख्यात साधु ज्ञानेश्वर याच रामदेवाचे वेळीं होऊन गेला. त्याचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे मराठी भाषेंतील अद्वितीय रत्नच होय. या रामदेवाचेच वेळीं मुसलमानांचा दाक्षिणेंत प्रथम प्रवेश झाला.

वरील राजवंशांशिवाय मौर्य, शिलाहार, कदंब, कलचुरी, पल्लव, इत्यादि अनेक वंशांचीं लहान लहान राज्यें महाराष्ट्रांत व त्याचे आसपास होऊन गेलीं. आज मराठ्यांमध्यें मोरे, शेलार, कदम, चुरी, पालवे, जाधव,

चाळके वगैरे घराणीं आहेत. हे वास्तविक त्या थोर राजवंशांचेच अवशेष आहेत.

---

## ३. मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश.

हिंदुस्थानाचे वायव्येस अफगाणिस्थान म्हणून देश आहे. तेथील लोकांस अफगाण किंवा पठाण असें म्हणतात. या पठाणांनीं इसवीसन एक हजाराच्या सुमारास हिंदुस्थानावर स्वाऱ्या सुरू केल्या. आणि पेशावर, पंजाब वगैरे प्रांत काबीज करून दिल्लीस गादी स्थापिली. पुढें लवकरच साऱ्या उत्तर हिंदुस्थानांत यांचें साम्राज्य पसरलें.

तेराव्या शतकाचे अखेरीस देवगिरी येथें रामदेवराव यादव राज्य करीत असतां दिल्लीच्या बादशहाचा शूर व धाडशी पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी हा आठ हजार सैन्यानिशीं एलिचपुरावरून अचानक देवगिरीवर चालून आला. आपल्यावर परचक्र येणार हें रामदेवाच्या ध्यानींमनींही नव्हतें. शिवाय त्याचा पुत्र शंकरदेव सैन्यासह दूर गेला होता. तरी देखील रामदेवराव अल्लाउद्दिनास आडवा झाला. पण अल्लाउद्दिनानें अशी खोटीच कंडी पिकविली होती कीं, " आपली फौज म्हणजे दक्षिणेवर चालून येणाऱ्या बादशहाच्या मोठ्या लष्करांतील आघाडीची तुकडी होय. " या कंडीवर रामदेवरावाचा विश्वास बसला म्हणून तो देवगिरीचे किल्ल्यांत जाऊन राहिला. तेव्हां अल्लाउद्दिनानें देवगिरी शहर लुटलें व किल्ल्यास वेढा दिला.

देवगिरीवरील या संकटाची बातमी शंकरदेवास लागतांच तो त्वरेनें तिकडे येऊं लागला. तेव्हां थोडीशी फौज किल्ल्याचे बंदोबस्तास ठेवून अल्लाउद्दीन त्यावर चालून गेला. या लढाईंत मुसलमानांचा पराभव होऊन ते पळूं लागले. इतक्यांत अल्लाउद्दिनाची एक तुकडी मागें होती ती

रणांगणाकडे येऊं लागली. तेव्हां जो धुराळा उडाला त्यावरून दिल्लीचें मोठें लष्कर येणार होतें तेंच हें आलें, असें मराठ्यांस वाटून ते घाबरले आणि एकदम जयाचें पारडें फिरलें.

इकडे किल्ल्यांत घाईघाईनें सामान भरतांना चुकून धान्याऐवजीं मिठाची पोतीं भरलीं गेलीं होतीं. ही चूक रामदेवरावास समजली तेव्हां आपला फार वेळ निभाव लागणें शक्य नाहीं असें जाणून त्यानें अल्लाउद्दिनाशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं त्यानें अल्लाउद्दिनास सहाशें मण मोतीं, दोन मण रत्नें, एक हजार मण रुपें, चार हजार रेशमी कापडाचीं ठाणें, आणि अनेक मूल्यवान् वस्तु द्याव्या, एलिचपूर परगणा द्यावा आणि दर साल खंडणी पाठवावी. याप्रमाणें अपार संपत्ति पदरीं पडतांच अल्लाउद्दिन वेढा उठवून निघून गेला.

अल्लाउद्दीन मोठा घातकी होता. त्यानें ही संपत्ति पाहण्याच्या मिषानें आपल्या चुलत्यास बोलावून त्याचा खून करविला आणि दिल्लीची गादी बळकाविली. पुढें त्यानें सन १३०७ त आपला सरदार मलिक काफर यास देवगिरीवर पाठवून रामदेवाचा पुन्हां पराभव केला. यानंतर दोन वर्षांनीं रामदेवराव वारला. त्याचा पुत्र शंकरदेव खंडणी देईना, म्हणून मलिक काफरानें पुन्हां स्वारी करून देवगिरी घेतली आणि त्याचें राज्य उध्वस्त करून टाकिलें. पुढें सन १३१५ त अल्लाउद्दिन मरण पावल्यावर रामदेवाचा जांवई हरपाळ यानें आपलें स्वातंत्र्य स्थापण्याचा प्रयत्न केला; पण त्यास यश आलें नाहीं. तो पराभव पावून शत्रूचे हातीं सांपडला आणि त्यांनीं हाल हाल करून त्याचा प्राण घेतला. अशा प्रकारें सन १३१८ त महाराष्ट्रांतील मराठ्यांच्या अखेरच्या राज्याची समाप्ति झाली आणि तो देश मुसलमानांच्या ताब्यांत गेला.

## ४. लहरी महंमद तघलघ.

अल्लाउद्दिनाच्या मृत्यूनंतर दहाच वर्षांनीं महमद तघलघ दिल्लीच्या गादीवर बसला. या बादशहाचे कारकीर्दींत महाराष्ट्रांत एका स्वतंत्र मुसलमानी राज्याची स्थापना झाली. यास्तव या बादशहाच्या कारकीर्दीची आपणास थोडीशी माहिती असणें अवश्य आहे.

महमद तघलघ हा मोठा विद्वान् व सदाचरणी असून शूर व चतुर सेनापति होता. पण तो अत्यंत लहरी, उतावळा, स्वच्छंदी व जुलमी असल्यामुळें प्रजेस फार त्रास झाला, चोहोंकडे बंडाळी माजली आणि शेवटीं त्याच्या अवाढव्य राज्याचीं छकलें उडालीं.

एकदां या बादशहाचे खजिन्यांत पैशाचा फारच तुटवडा पडला, म्हणून त्यानें तांब्याचे तुकडे पाडले व ते सोन्याचे नाण्यांऐवजीं चालवावे असा हुकूम केला. याचा परिणाम असा झाला कीं, लोक खासगी रीतीनें तसले तुकडे पाडून त्यांनीं सरकारी कर भरूं लागले. यामुळें खजिन्यांत सोन्याच्या नाण्यांऐवजीं तांब्याच्या तुकड्यांचे ढीग पडले. तसेंच परदेशचे व्यापारी तांब्याच्या तुकड्यांनीं येथील उंची माल खरेदी करून परदेशांत सोन्याचे नाण्यांनीं विकीत. यामुळें ते कुबेरासारखे गबर झाले; पण हिंदुस्थानचा व्यापार बसला. शेवटीं लोक तांब्याचे तुकडे हातीं धरीनातसे झाले, तेव्हां बादशहाचे डोळे उघडले !

एकदां बादशहाचा मुक्काम देवगिरीस पडला असतां तेथील सृष्टिसौंदर्य व चांगली हवा पाहून तो खूष झाला. शिवाय दक्षिणेंत वारंवार बंडाळी होत असल्यामुळें बंदोबस्तासाठीं आपण कायमचेंच येथें राहावें असें त्यास वाटलें. लगेच त्यानें देवगिरीस दौलताबाद असें नांव ठेवून एक प्रचंड किल्ला बांधिला. आणि दिल्लींतील आबालवृद्ध सर्व लोकांस आपलीं घरेंदारें सोडून ताबडतोब दौलताबादेस येण्याचा हुकूम केला. या लोकांचे

अपरंपार नुकसान झालें, वाटेंत अतोनात हाल झाले आणि शेवटीं दौलताबादेस इतक्या लोकांचा समावेश होईना म्हणून त्यांस परत दिल्लीस जाण्याचा हुकूम झाला !

एकदां एका प्रांतांतील प्रजा जबर करामुळें वैतागून आपलीं घरेंदारें सोडून रानावनांत जाऊन राहिली. हें बादशहास समजलें, तेव्हां त्यानें मोठ्या सैन्यानिशीं त्या जंगलास वेढा दिला आणि तो आवळीत आवळीत शिकार पकडावी त्याप्रमाणें त्या लोकांस आंत पकडून सर्वांची कत्तल उडविली.

बादशहाच्या असल्या कृत्यांमुळें चोहोंकडे बंडाळी होऊन अनेक प्रांत स्वतंत्र झाले. त्यांत दक्षिण हिंदुस्थानांत दोन राज्यें स्थापन झालीं. एक महाराष्ट्रांत मुसलमानांचें. यास बहामनी राज्य असें म्हणतात. याचे ताब्यांत कृष्णानदीच्या उत्तरेकडील सारा मुलूख होता. दुसरें कर्नाटकांत हिंदूंचें. यास विजयानगरचें राज्य असें म्हणतात. तें अत्यंत प्रबल असून कृष्णानदीपासून समुद्रापर्यंत सारा दक्षिणभाग त्यांत मोडत होता.

## ५. बहामनी राज्य व त्याचे पांच विभाग.

दिल्लीस महमद तघलघाचे दरबारीं गंगू नांवाचा एक ब्राह्मण ज्योतिषी असून तो बादशहाचे मर्जींतला होता. त्या ब्राह्मणाचे पदरीं हसन म्हणून एक गुलाम होता. त्याचे चांगले गुण पाहून त्या ब्राह्मणानें त्यास गुलामगिरींतून मुक्त केलें आणि त्याचा दरबारांत प्रवेश करून दिला. तेथें लवकरच तो नांवालौकिकास चढून त्यास जाफरखान असा किताब मिळाला. महमद तघलघ देवगिरीस राजधानी करण्याकरितां गेला तेव्हां जाफरखान त्याचे बरोबर होता. पुढें बादशहाच्या सैन्यानें बंड केलें

तेव्हां जाफरखान त्याचा पुढारी झाला व बराच मुलूख काबीज करून त्यानें सन १३४७ त कलबुर्गा येथें स्वतंत्र गादी स्थापिली.

याप्रमाणें हसन हा महाराष्ट्राचा बादशहा झाला तेव्हां त्यानें गंगू ब्राह्मणाचे स्मरणार्थ आपले नांवापुढें 'कांगो' हें पद जोडलें. तसेंच बहामनी नांवाचा इराणांत एक थोर बादशहा होऊन गेला. त्याशीं आपला संबंध जोडण्याचे हेतूनें त्यानें 'बहामनी' हें दुसरें पद आपल्या नांवापुढें जोडलें. अशा प्रकारें त्याचें नांव 'हसन कांगो बहामनी' असें झालें. त्याच्या राज्यास बहामनी राज्य असें म्हणतात.

बहामनी राज्य सुमारें दीडशें वर्षे चांगलें चाललें. शेवटल्या पांच बादशहांचे कारकीर्दींत महमद गवान म्हणून मोठा हुशार व शूर प्रधान होता. त्याचे कर्तबगारीमुळें बहामनी राज्याचा विस्तार नर्मदेपासून कृष्णेपर्यंत आणि अरबीसमुद्रापासून बंगालचे उपसागरापर्यंत झाला. शेवटला बादशहा गादीवर बसला तेव्हां केवळ नऊ वर्षांचा होता. त्याचा महमद गवानानें प्रतिपाळ करून राज्याचा उत्तम बंदोबस्त केला. पण पुढें त्याच कृतघ्न बादशहानें दारूच्या धुंदींत गवानास ठार करण्याचा हुकूम केला! मारेकरी आंगावर धावून आले तेव्हां तो ७८ वर्षे वयाचा वृद्ध प्रधान मक्केकडे तोंड करून गुडघे टेकून बसला आणि अत्यंत शांत चित्तानें त्यानें तो प्राणांत करणारा प्रहार सहन केला! महमद गवानाच्या मृत्यूनंतर लवकरच राज्यांत बखेडे होऊन त्याचीं पांच छकलें झालीं.

१. सन १४८७ त महमद निजामशहा यानें अहमदनगर येथें स्वतंत्र गादी स्थापिली. या राज्यास निजामशाही असें म्हणतात. हें राज्य सन १६३७ त दिल्लीच्या शहाजहान बादशहानें बुडविलें.

२. सन १४८४ त वऱ्हाडचा सुभेदार इमाद उल्मुल्क हा स्वतंत्र

झाला. त्याच्या राज्यास इमादशाही असें म्हणतात. हें राज्य पुढें ९० वर्षांनीं अहमदनगरच्या बादशहानें जिंकिलें.

३. सन १४८९ त विजापूर येथें अदीलशहानें स्वतंत्र गादी स्थापिली. त्याचे राज्यास अदीलशाही असें म्हणतात. हें राज्य सन १६८७ त दिल्लीच्या औरंगजेब बादशहानें बुडविलें.

४ सन १५१२ त गोवळकोंड्याचा सुभेदार कुतूबशहा स्वतंत्र झाला. त्याच्या राज्यास कुतुबशाही असें म्हणतात. हें राज्यही औरंगजेबानेंच सन १६८७ त बुडविलें.

५ महमद गवानानंतर झालेला प्रधान बेरीद यानें राहिलेलें राज्य आटोपलें. त्यास बुरीदशाही असें म्हणतात. त्याची राजधानी बेदर येथें होती. हें राज्य अल्पकाळांतच नष्ट झालें.

या पांच राज्यांपैकीं अहमदनगर व विजापूर येथील राज्यें कांहीं काळ विशेष प्रबल होतीं. महाराष्ट्राचा उत्तर भाग अहमदनगरचे निजामशाहींत मोडत होता आणि दक्षिण भाग विजापूरकरांचें ताब्यांत होता. यामुळें मराठ्यांचे इतिहासांत या दोन राज्यांचा संबंध फार आला आहे.

---

## ६. बहामनी राज्याचे वेळची महाराष्ट्रांतील लोकांची स्थिति.

महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश होण्यापूर्वी मराठ्यांचेंच राज्य होतें. अर्थात् त्यावेळीं शिपाई व सरदार मराठेच असत. क्वचित् ब्राह्मण सरदारांचींही नांवें आढळतात. मुख्य प्रधानासुद्धां राज्यांतील इतर सारे कामदार बहुधा ब्राह्मण असत. अशा रीतीनें ब्राह्मण व मराठे मिळून मुलकी व लष्करी कारभार चालवीत. पुढें मुसलमानांचें राज्य झालें तरी बहुतेक

मुलकी कामदार पूर्वीप्रमाणें ब्राह्मणच असत व लष्करांतही मराठ्यांचा मोठा भरणा असे. यामुळें महाराष्ट्रांतील क्षात्रतेज किंवा राज्यकारभार चालविण्याचें ज्ञान मुळींच लोपलें नाहीं.

त्याकाळीं महाराष्ट्रांत ग्रामव्यवस्था फार उत्तम असे. दरगांवांत देशमुख किंवा पाटील म्हणून मुख्य अधिकारी असे. देशपांडे किंवा कुलकर्णी म्हणून दुसरा अधिकारी असे, तो लेखी व हिशेबी काम पाही. गांवाच्या साऱ्या गरजा तेथेंच भागल्या जात, तंटेबखेड्यांचा निवाडा तेथल्याच शिष्ट लोकांच्या सभेकडून होई. या सभेस ग्रामपंचायत असें म्हणत. सरकारांत जो वसूल जावयाचा तेवढा गांवकामगारांनीं पाठविला कीं सरकारचा गांवाशीं कांहीं संबंध नसे. राज्यांत कितीही घालमेली झाल्या, किंबहुना राज्य बदललें, तरी या ग्रामव्यवस्थेस बिलकूल धक्का लागत नसे. यामुळें लोक सुखी असत. कित्येक देशमुखांकडे अनेक गांवचा अधिकार असे. ते आपल्या हाताखालीं थोडीबहुत स्वारशिबंदीही बाळगीत आणि प्रसंग पडेल तेव्हां सारा गांव त्यांचे हाकेसरसा धावून येई.

सह्याद्रीचा घाटमाथा मुसलमानांच्या प्रत्यक्ष अमलांत असा कधींच गेला नाहीं. या प्रदेशांत अनेक मजबूत डोंगरी किल्ले होते. सारा प्रदेश अगदीं दुर्गम होता व रस्ते मुळींच नव्हते म्हटलें तरी चालेल. सह्याद्रींतून निघणाऱ्या डोंगरांच्या दर दोन ओळींमधील खोऱ्यास मावळ असें म्हणतात. एका पुणें जिल्ह्यांतच २४ मावळें प्रसिद्ध होतीं. दर मावळांत दहावीस खेडीं व एखादा तरी डोंगरी किल्ला असावयाचाच. दर मावळावर एकेका देशमुखाची सत्ता असे. हे देशमुख म्हणजे त्या डोंगरी मुलखांतले छोटेखानी राजेच होते.

महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश झाला त्याच सुमारास प्रख्यात साधु ज्ञानेश्वर हा होऊन गेला. तेव्हांपासून पुढें ४०० वर्षेपर्यंत म्हणजे रामदास तुकारामापर्यंत शेकडों साधुसंतांची मालिकाच लागून राहिली आहे. हे

संत सर्व जातींत व महाराष्ट्राच्या सर्व भागांत निर्माण झाले. मुसलमानांच्या हातून हिंदुधर्मास कमज्यास्त मानानें उपसर्ग पोंचत होताच. अशावेळीं या संतांनीं " धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥ " असें आपलें ध्येय ठेवून सर्व लोकांत धर्मसंरक्षणाची आस्था उत्पन्न केली. सर्व लोकांचें ऐक्य घडवून आणलें आणि परमेश्वरावर भरंवसा ठेवून प्रयत्नांची शिकस्त केल्यास यश येईलच येईल, असा विश्वास त्यांचे ठिकाणीं उत्पन्न केला. याचा पुढें चांगला परिणाम झाला.

बहामनी राज्य फुटल्यानंतर अहमदनगरचें व विजापूरचें हीं दोन राज्यें प्रबळ होतीं. यांच्या एकमेकांशीं व आसपासच्या राज्यांशीं नेहमीं लढाया चालत, यामुळें त्यांस मराठे सरदार व शिपाई चाकरीस ठेवण्याची फार जरूर पडे. प्रत्येक मराठा सरदार आपल्या पदरीं शेकडों स्वार बाळगी. कित्येक मातबर सरदारांपाशीं त्यांचें स्वतःचें दहादहा हजारहीं सैन्य असे व त्यांस मोठ्या जहागिरी असत. यावेळीं मराठ्यांचीं पुष्कळ घराणीं उदयास आलीं. त्यांतलीं दोन घराणीं निजामशाहीचे अखेरीस विशेष गाजलीं. एक भोसले आणि दुसरें जाधव. यांची हकिकत पुढें येईलच.

---

## ७. निजामशाहींतील दोन प्रसिद्ध माणसें.

### चांदबिबी आणि मलिकंबर.

चांदबिबी ही अहमदनगरच्या निजामशहाची मुलगी, व विजापूरचा प्रसिद्ध बादशहा अल्ली अदिलशहा याची बायको. ती आपल्या नवऱ्यास राज्यकारभारांत मदत करी व लढाईचे वेळींही स्वार होऊन त्याजबरोबर जात असे. तिचा कारभार अत्यंत चोख असल्यामुळें सर्व लोकांचे

मनांत तिजविषयीं पूज्यबुद्धि वसत असे. पतीच्या मरणानंतर ती अहमदनगरास जाऊन राहिली. पुढें सन १५९५ त अकबर बादशहाचा मुलगा मुराद यानें अहमदनगरास वेढा दिला. तेव्हां तेथील बादशहा नुकताच वारला असून तेंथे बेबंदशाही माजली होती. अशा वेळीं हें परचक्र आल्यामुळें लोक फार घाबरले आणि त्यांनीं वृद्ध चांदबिबीस राजप्रतिनिधि होण्याची विनंती केली. तिनें मोठ्या धैर्यानें ती जबाबदारी स्वीकारिली, तटाची डागडुजी केली आणि स्वतः सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. पुढें मोंगलांनीं सुरुंग लावून तटास खिंडार पाडलें व ते आंत घुसूं लागले; पण इतक्यांत चांदबिबी आंगांत चिलखत चढवून व हातीं तरवार घेऊन धांवत आली. तिचा तो आवेश पाहून तिच्या सैन्यासही स्फुरण चढलें आणि तें मोंगलांवर तुटून पडलें. शेवटीं मुरादाचा निरुपाय होऊन तो वेढा उठवून निघून गेला! परंतु दुर्दैवानें पुढें लवकरच एका बंडखोरानें या अत्यंत थोर स्त्रीचा खून केला!

चांदबिबीनंतर लवकरच अहमदनगर येथें मलिकंबर नांवाचा वजीर उदयास आला. त्यानें आपल्या चातुर्यानें व शौर्यानें सुमारें ३० वर्षें निजामशाहीचें रक्षण केलें. मलिकंबर हा जमाबंदीच्या कामांत मोठा वाकबगार होता. यानें जमिनीची मोजणी केली, प्रतबंदी ठरविली आणि साऱ्याची चांगली पद्धत लावून दिली. यामुळें रयतेचें कल्याण झालें. मराठे सरदारांस मलिकंबराचा मोठा आधार असे. मराठ्यांची लढण्याची एक विशेष पद्धत होती, तीस 'गनिमीकावा' असें म्हणतात. या पद्धतीस मूळ मलिकंबरानेंच उत्तेजन दिलें. गनिमी काव्याच्या लढाईंत मलिकंबराएवढा सेनापति साऱ्या हिंदुस्थानांत कोणी झाला नाहीं. मराठे सरदारांपाशीं पायदळ नसे. सारे स्वारच असत व त्यांजपाशीं सामानही अगदीं बेताचें असे. त्यांचे घोडे लहान पण अत्यंत चपळ व धन्यासारखेच कंटक असत. मराठे स्वार केवळ कांदाभाकर खाऊन किंवा

प्रसंगीं शेतांतील चार कणसें चोळून निर्वाह करीत व रात्र पडेल तेथें घोड्याचा लगाम हातांत धरून उघड्या जमिनीवर निजत ! तरवार व भाला हीं त्यांचीं हत्यारें असत. ते शत्रूसमोर तळ देऊन कधीही बसत नसत, किंवा समोरासमोर मोठी लढाईही फारकरून देत नसत. आड-वाटांनीं अचानक येऊन छापा घालावा, मोठी कत्तल उडवावी व शत्रूंची जमवाजमव होतांच दशदिशांनीं पळून जावें; शत्रूंस दाणा वैरण मिळूं देऊं नये, त्यांचें सामानसुमान व घोडे लुटून न्यावे आणि भोवतीं घिरट्या घालून शत्रूंस सतावून सोडावें; कधीं कधीं लढाईचा आव दाखवून लव-करच पळ काढावा आणि शत्रु पाठलाग करूं लागून त्यांची पांगापांग झाली कीं एकदम उलटून त्यांची कत्तल उडवावी. अशी मराठ्यांची पद्धत होती. या युद्धपद्धतीसच ‘ गनिमी काव्याची लढाई ’ असें म्हणतात.

मलिकंबराच्या वेळीं मराठ्यांचीं अनेक कुळें उदयास आलीं. भोसले व जाधव याच वेळीं वैभवास चढले. या दोन कुळांचा संयोग होऊनच स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज जन्मास आले.

---

## ८. चंद्रसूर्यवंशांचा संयोग.

सूर्यवंशांतील क्षत्रियांत उदेपूरचें राजघराणें प्रमुख आहे. या घरा-ण्यांतील भोसाजी नांवाचा पुरुष वऱ्हाडांत येऊन राहिला. त्याच्या नांवा-वरून त्याच्या वंशजांस भोसले असें नांव पडलें. या घराण्यांतील मालोजी भोसले प्रथम वेरूळचे आसपासच्या गांवांचा पाटील होता. तो पुढें लुकजी जाधवराव याच्या वशिल्यानें निजामशाही राज्यांत शिलेदारी करूं लागला. जाधव हे यदुकुळांतील म्हणजे चंद्रवंशांतील क्षत्रिय होत. यांचें घराणें फार दिवसांपासून प्रख्यात होतें. स्वतः लुकजी जाधवराव दहा हजार स्वारांचा

मनसबदार होता. मालोजीस पुष्कळ वर्षे पुत्र नव्हता म्हणून त्याची स्त्री दीपाबाई हिनें अहमदनगरच्या शहासरीफ नामक पीरास नवस केला. पुढें त्यांस दोन मुलगे झाले. ते त्या शहासरीफाच्या कृपेनें झाले म्हणून त्यांनीं त्यांचीं नांवें शहाजी आणि सरीफजी अशीं ठेविलीं.

शहाजी मोठा देखणा व हुशार होता. तो पांच वर्षांचा असतां एकदां आपल्या बापाबरोबर लुकजी जाधवरावाकडे रंगपंचमीच्या समारंभास गेला होता. जाधवरावाची जिजाऊ म्हणून तीन वर्षांची मुलगी होती तीही त्यांचे जवळ बसली होती. लवकरच हीं दोन मुलें एकमेकांशीं खेळूं लागलीं व तेथील तबकांतला गुलाल परस्परांवर उधळूं लागलीं! ही मौज पाहून जाधवरावास प्रेमाचें भरतें आलें. त्यानें दोन्ही मुलांस मांडीवर घेतलें आणि 'हा नवरा तुला हवा का' म्हणून आपल्या मुलीस विचारिलें. मग दोन्ही मुलांकडे पाहून तो मंडळीस म्हणाला—'पहाहो! हा जोडा किती चांगला शोभतो!' यावर मालोजीनें 'जाधवराव काय बोलतात तें ऐका' म्हणून सर्वांस बजाविलें.

पुढें एक दोन दिवसांनीं जाधवराव भोजनाचें आमंत्रण देण्यास मालोजीकडे गेला. तेव्हां त्यानें निक्षून सांगितलें कीं, आतां तुमचें आमचें भोजन लग्नांत होईल, मध्यें होणार नाहीं!

ही सर्व हकिकत ऐकून जाधवरावाचे बायकोस मोठा राग आला. जाधवराव म्हणजे केवढे मोठे सरदार आणि त्यांची मुलगी यःकश्चित् शिलेदाराच्या मुलास द्यावयाची! हें तिला कोठून खपणार? जाधवरावानेंही मुलगी देण्याचें साफ नाकारिलें.

केवळ आपल्या गरिबीमुळें जाधवराव आपणाकडे मुलगी देत नाहींत याचें मालोजीस मोठें वैषम्य वाटलें. पण तो मानी वीर होता. हें लग्न घडवून आणीनच आणीन असा पण करून तो वेरुळास गेला. तेथें

सुदैवानें त्यास जमिनींत अपार द्रव्य सांपडलें. तेव्हां त्यानें मोठीं धर्मकृत्यें केलीं. आणि हजारपांचशें स्वार पदरीं ठेविले.

मालेजीच्या बायकोचा भाऊ वणगोजी नाईक निंबाळकर मोठा शूर होता. यामुळेंच 'राव वणंगपाळ | बारा वजिरांचा काळ' अशी म्हण पडली होती. हा वणगोजी विजापूरच्या राज्यांत धुमाकूळ घालीत होता. त्यास मालेजीनें मदत करून मोठ्या पराक्रमानें विजापूरकरांच्या फौजेचा पराभव केला. यामुळें मालेजीच्या शौर्याची मोठी कीर्ति होऊन लवकरच ती निजामशहाचे कानीं गेली. निजामशहास मालोजीसारख्या शूर सरदाराची मदत हवीच होती. म्हणून त्यानें त्याचा गौरव केला. बादशहास ही लग्नाची भानगड समजली तेव्हां त्यानें मालोजीस पांच हजार स्वारांची मनसब, राजे हा किताब, शिवनेरीचा किल्ला आणि पुणें, सुपें व चाकण या परगण्यांची जहागीर देऊन जाधवरावापेक्षांही वरच्या दर्जास चढविलें. तेव्हां लुकजी जाधवराव आनंदानें मुलगी देण्यास कबूल झाला. मग शहाजी व जिजाबाई यांचें मोठ्या थाटानें लग्न झालें. या समारंभास बादशहा स्वतः हजर होता. अशा प्रकारें चंद्रसूर्यवंशांचा संयोग होऊन त्यापासून पुढें स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज जन्मास आले.

## ९. स्वराज्यसंकल्पक शहाजीराजे भोसले.

सन १७२० त मालोजी वारला आणि त्याची मनसबदारी शहाजीस मिळाली. शहाजीचा पराक्रम पाहून मलिकंबराचा त्यावर पूर्ण विश्वास बसला. आणि लवकरच शहाजी हा निजामशाहीचा सरलष्कर म्हणजे सेनापति झाला.

सन १७२६ त मलिकंबर वारला. त्यापूर्वींच लुकजी जाधवराव व दुसरे कित्येक सरदार निजामशाहीचा पडता काळ पाहून मोंगलांस जाऊन मिळाले होते. यामुळें निजामशाहीच्या संरक्षणाचा सारा भार एकट्या शहाजी-वर पडला. लवकरच जाधवराव व मोंगल शहाजीवर चालून आले. तेव्हां तो गनिमी काव्यानें लढत लढत कोंकणांत उतरला व तेथेंही शत्रूनें पिच्छा पुरविल्यामुळें पुन्हां देशावर आला. यावेळीं त्याची स्त्री जिजाबाई त्याबरोबर होती. ती गरोदर असल्यामुळें तीस सैन्याबरोबर मजल मारवेना. म्हणून शहाजीनें तीस शिवनेरी येथें बंदोबस्तानें ठेविलें व तो पुढें निसटला.



इकडे शिवनेरीस जिजाबाईनें तेथील देवी शिवाई हीस नवस केला कीं, मला पुत्र झाल्यास त्यास तुझें नांव ठेवीन. त्या-प्रमाणें तिला पुत्र झाला. तेव्हां तिनें त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें ( १६३० ).* हा शि-वाजी मराठी राज्याचा संस्थापक होय.

मराठ्यांचीं अनेक कुळें व वि-शेषत: भोसले निजामशाहींतच उदयास आले होते. यामुळें त्यांस निजामशाही म्हणजे जसें कांहीं आपलेंच राज्य असें वाटे. म्हणूनच शहाजीनें निजामशाहीच्या बचावासाठीं भगी-रथ प्रयत्न चालविला होता. पण स्वत: निजामशहा नीच होता. त्यानें

* शिवाजीचा जन्म सन १६२७ त झाला असें जुन्या इतिहासांतून लिहिलें आहे. पण अलीकडे मिळालेल्या साधनांवरून १६३० हा सनच विद्वानांनीं मान्य केला आहे.

लुकजी जाधवराव, त्याचे मुलगे व नातू या सर्वांस दरबारांत बोलावून विश्वासघातानें मारेकरी घालून टार केलें. तेव्हां शहाजीचें मन विटलें आणि त्यानें निजामशहाशीं असलेला आपला संबंध तोडून टाकला.

मग शहाजीनें पुण्यापासून नाशकापर्यंत मुलूख व किल्ले काबीज केले आणि या प्रांतावर स्वतंत्रपणें आपला अंमल सुरू केला. परंतु मोंगल सरकार फार बलाढ्य होतें. त्याशीं वैर करून आजच निभाव लागणार नाहीं असें पाहून त्यानें मोगलांची चाकरी धरिली. इतक्यांत निजामशहाचा खून झाला. तेव्हां शहाजीनें मोगलांचा पक्ष सोडला आणि एक नवाच बादशहा निजामशाहीच्या राज्यावर बसवून तें चालू ठेवण्याचा मोठा प्रयत्न केला. तीन वर्षेंपर्यंत त्यानें मोंगलांस दाद दिली नाहीं. पण दिल्लीचा बादशहा स्वतः मोठें सैन्य घेऊन दक्षिणेंत आला व विजापूरकरही त्यास मिळाले. तेव्हां शहाजीचा निरुपाय होऊन निजामशाहीचा अंत झाला ( १६३६ ). यावेळीं झालेल्या तहांत असें ठरलें कीं, विजापूरकरांनीं शहाजी राजे यांस सैन्यानिशीं आपल्या पदरीं बाळगावें आणि पुणें व सुपें ह्या प्रांतांची जहागीर त्याकडे राहावी.

विजापूरकरांनीं शहाजीस कर्नाटकांत दुसरी मोठी जहागीर देऊन तिकडे पाठविलें. तेव्हां आपण स्वतः साधल्यास कर्नाटकांत स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न करावा आणि इकडे महाराष्ट्रांत पुणें प्रांतीं आपला पुत्र शिवाजी यास ठेवून त्याजकडून तसाच प्रयत्न करवावा असें त्यानें योजिलें व त्याप्रमाणें त्यानें शिवाजी, जिजाबाई व त्यांबरोबर दादाजी कोंडदेव वगैरे कसलेले मुत्सद्दी यांस पुणें प्रांतीं ठेविलें. याप्रमाणें विजापूरच्या राज्याच्या दोहों अंगांस एका मेळानें एकदम स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न करण्याची योजना शहाजीनें मोठ्या चातुर्यानें आंखिली म्हणून त्यास ‘ स्वराज्यसंकल्पक ’ असें नांव देणें योग्य होय. पुढें त्याचा पुत्र शिवाजी यानें आपल्या विलक्षण कर्तबगारीनें ही योजना सिद्धीस नेली.

# छत्रपति शिवाजी महाराज.

## १०. स्वराज्यसंस्थापनेची तयारी.

शिवाजीचें बालपण जिजाबाई व दादाजी कोंडदेव यांच्या संगतींत गेलें. जिजाबाई ही मोठी महत्त्वाकांक्षी, दूरदर्शी व धर्मनिष्ठ बाई होती. गाय, ब्राह्मण व देव यांविषयीं शिवाजीचे मनांत जी इतकी पूज्यबुद्धि वसत होती व तो जो स्वधर्माचा कट्टा संरक्षक बनला, तें जिजाबाईच्याच शिक्षणाचें फल होय. ती शिवाजीला रामायण आणि महाभारत यांतील कथा सांगे. त्या ऐकून त्या बालवीराचे आंगीं वीरश्रीचा संचार होई. पितृकुलाकडून तो श्रीरामाचा वंशज होता आणि मातृकुलाकडून श्रीकृष्णाशीं त्याचा संबंध पोचत होता. अशाप्रकारें रामायण आणि महाभारत यांतील या दोन थोर नायकांचें रक्त त्याच्या आंगांत खेळत असल्यामुळें त्यांच्याप्रमाणें आपणही थोर पराक्रम करावा, दुष्टांचें पारिपत्य करावें आणि स्वराज्य स्थापून स्वधर्माचें संरक्षण करावें. अशी महत्त्वाकांक्षा त्याचे अंतःकरणांत बालपणींच उत्पन्न झाली.

दादाजी कोंडदेव हाही मोठा करारी व धर्मनिष्ठ असून राज्यकारभारांत कसलेला मुत्सद्दी असल्यामुळें राजगुरु होण्यास सर्वस्वी योग्य होता. त्यानें शिवाजीस राजपुत्राला योग्य असें सर्व प्रकारचें उत्तम शिक्षण दिलें. दांडपट्टा खेळणें, भाला फेंकणें, निशाण मारणें, घोड्यावर बसणें इत्यादि कलांत शिवाजी लवकरच पटाईत झाला. तसेंच राज्यकारभाराचेंही ज्ञान त्यानें दादाजीच्या देखरेखीखालीं संपादिलें. पुणें प्रांत उजाड झाला होता तो दादाजीनें लागवडीस आणिला. त्या प्रांतीं मावळे लोक रहात. ते मोठे प्रामाणिक, उद्योगी, चपळ व कंटक असत. त्यांचें दादाजीनें

प्रांताच्या बंदोबस्तासाठीं एक पथक तयार केलें. चोहोंकडे चौक्या पहारे बसविले आणि हद्दींतील सर्व किल्ल्यांची डागडुजी करून त्यांवर शिबंदी ठेविली. या व्यवस्थेमुळें चोहोंकडे आबादानी होऊन प्रजा सुखी झाली.

वरील व्यवस्था करतांना दादाजी आपल्याबरोबर शिवाजीस नेत असे व साऱ्या गोष्टी समजून सांगत असे. तसेंच राज्यांतील तंटेबखेडे पंच नेमून त्यांसमक्ष दादाजी तोडी, त्या वेळींही शिवाजी हजर असे. यामुळें शिवाजी लवकरच राज्यकारभारांत निष्णात झाला.

सह्याद्रींत अनेक मावळें असून ती एकेका देशमुखाचे ताब्यांत होतीं. या सर्व देशमुखांस आपणाकडे वळविण्याचा उद्योग शहाजीच्या अनुमतीनें दादाजी कोंडदेवानें केला. व पुढें ‘ हिंदवी स्वराज्य ’ स्थापल्यावर त्याशीं इमानें इतबारें वागण्याचा करार त्यानें युक्तिप्रयुक्तीनें सर्वांकडून लिहून घेतला. शिवाजीही या देशमुखांच्या तरुण मुलांच्या भेटी घेई, प्रमुख लोकांच्या सभा भरवी आणि त्यांस आपले बेत समजून देई. अशा प्रकारें शिवाजीनें हा सारा मावळ प्रांत लवकरच आपल्या भजनीं लाविला व सर्व लोकांस ‘ हिंदवी स्वराज्य ’ स्थापावयाचे या एका विचारानें भारून टाकिलें. या सर्व खटपटी जिजाबाई, दादाजी कोंडदेव वगैरे मुत्सद्दी आणि खुद्द शहाजी यांच्या विचारानेंच चालल्या होत्या. सन १६३९ पूर्वीच शिवाजीच्या नांवाचा राजशिक्का तयार करण्यांत आला होता. त्यावरील लेख असा आहे.

**प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥**
**शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भाति यशस्विनी ॥**

अर्थ—हा प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारा व सर्व विश्वाला वंद्य झालेला शहाजीचा पुत्र शिवाजी ह्याचा यशस्वी शिक्का शोभत आहे.

---

## ११. स्वराज्याचें तोरण.

शिवाजीच्या भोंवतीं मावळांतील देशमुखांचे तरुण मुलगे आणि जिवास जीव देणारे मावळे यांचा मोठा मेळा जमला. त्यांत तीन इसम प्रमुख होते. १ एसाजी कंक, २ तानाजी मालुसरे आणि ३ बाजी पासलकर. यांच्या विचारानें शिवाजीनें प्रथम आसपासचे किल्ले काबीज करण्याचें ठरविलें. किल्ला ताब्यांत असला म्हणजे भोंवतालचे मुलुखावर सत्ता चालवितां येते व प्रसंगीं शत्रूपासूनही आपला बचाव करितां येतो. हें किल्ल्यांचें महत्त्व शिवाजी जाणून होता.

प्रथमारंभीं सन १६४६ त शिवाजीनें तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचें तोरणच बांधिलें. या किल्ल्याची डागडुजी करीत असतां त्यास एक मोहोरांचा हांडा सांपडला. तेव्हां शिवाजीस देवी प्रसन्न आहे, ती त्यास द्रव्य देते, अशी प्रसिद्धि होऊन त्याच्यावर लोकांची अधिकच भक्ति बसली. मग शिवाजीनें तें द्रव्य खर्चून राजगड किल्ला बांधिला. इतक्यांत सन १६४७ त दादाजी कोंडदेव वारला. त्यानें मरतांना शिवाजीस उपदेश केला कीं, “ गोब्राह्मणांचा प्रतिपाळ करण्याचा जो उद्योग तुम्हीं आरंभिला आहे, तो तसाच चालवून धर्मस्थापना करा. यांत देव तुम्हांस यश देईल.”

यानंतर शिवाजीनें सुपें ताब्यांत घेऊन चाकण, कोंडाणा व पुरंदर हे किल्ले हस्तगत केले. कल्याणचा सुभेदार विजापूरकरांकडे खजिना पाठवीत होता तो लुटून आणला. बोरघाटांतील राजमाची, लोहगड वगैरे किल्ले घेऊन तो कोंकणांत उतरला आणि तळें व घोसाळें हे किल्ले घेऊन थेट राजापुरापर्यंत स्वारी करून आला.

या कोंकणच्या स्वारींत शिवाजीस दोन अलभ्य लाभ झाले. १. सदा विजयी प्रख्यात भवानी तरवार. ही गोवळकर सांवतांनीं त्यास अर्पण

केली. आणि २. राजापुरास पाडाव केलेल्या लोकांत बाळाजी म्हणून एक मुलगा होता. तोच पुढें बाळाजी आवजी चिटणीस या नांवानें प्रसिद्धीस आला. त्यानें व त्याच्या वंशजांनीं मराठी राज्याची अमूल्य सेवा केली.

शिवाजीचा सेवक आबाजी सोनदेव यानें कल्याण प्रांत काबीज करून तेथील सुभेदारास कुटुंबासुद्धां पकडलें व त्याच्या सुनेस शिवाजीकडे पाठविलें. शिवाजीनें भर दरबारांत तिजकडे पाहून म्हटलें, " माझी आई अशी रूपवती असती तर मीही अधिक रूपवान् झालों असतों. " असें बोलून त्यानें तीस वस्त्रालंकार देऊन सन्मानानें परत पाठविलें व स्त्रियांस त्रास दिल्याबद्दल आबाजी सोनदेवास दोष दिला.

शिवाजीच्या वरील कृत्यांमुळें विजापूरकरांस राग आला. त्यांनीं शहाजीस पकडून एका लहान कोठडींत टाकलें आणि धाक घातला कीं, " शिवाजीस लवकर ताळ्यावर आण, नाहीं तर या कोठडीला हवा येण्यास लहान झरोका आहे तोही बंद करून टाकूं ! "

ही बातमी ऐकून शिवाजी मोठ्या चिंतेंत पडला. तो मोठा पितृभक्त होता. यामुळें त्यास हें सहन करवेना आणि स्वराज्यस्थापनेचा उद्योगही सोडून देववेना. अशी विवंचना येऊन पडली. पण कितीही मोठें संकट येवो त्यांतून युक्तीनें मार्ग काढण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं वसत होतें. त्यानें विजापूरकरांहून समर्थ जे दिल्लीचे बादशहा त्यांजकडे संधान बांधिले आणि त्यांजकडून विजापूरकरांस धाक घालून शहाजीची सुटका केली. या प्रसंगी शिवाजीचा मुत्सद्दीपणा उत्तम दिसून आला.

---

## १२. अफझुलखानाचा वध.

( सन १६५९ )

शहाजीची कोठडींतून सुटका झाली तरी त्यास ४ वर्षें विजापुरांतच

राहावें लागलें. पुढें त्याची कर्नाटकांत रवानगी झाली, तेव्हां शिवाजीनें आपला उद्योग पुन्हां आरंभिला.

जावळीचा राजा चंद्रराव मोरे मोठा बलाढ्य होता. तो आपणास विजापूरकरांचा मांडलिक म्हणवी व शिवाजीविरुद्ध त्यांस मदतही करी. शिवाजीनें त्यास सामोपचारानें वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तो सारा व्यर्थ गेला. शेवटीं शिवाजीनें त्याचें पारिपत्य करावयाचें ठरविलें. त्याच्या दोघां सरदारांनीं जावळींत जाऊन भर दरबारांत चंद्रराव मोरे व त्याचा भाऊ यांस ठार मारिलें, आणि शिवाजीनें हल्ला करून सारा जावळीप्रांत काबीज केला. मग त्यानें बंदोबस्तासाठीं प्रतापगडचा किल्ला बांधला व तेथें देवीची स्थापना केली. हीच शिवाजीची आराध्य देवता प्रतापगडची भवानी होय.

शिवाजीनें मोऱ्यांस धुळीस मिळविलें तेव्हां विजापूरचे बादशहास मोठी चिंता पडली. पण त्याचा अफझुलखान म्हणून एक बलाढ्य सरदार होता, त्यानें शिवाजीस जिवंत धरून आणतों किंवा ठार तरी करितों, अशी प्रतिज्ञा केली आणि तो मोठें सैन्य घेऊन वाई येथें आला. शिवाजी प्रतापगडावर होता. त्यास तह करण्याच्या मिषानें भेटीस बोलावून पकडावें असा बेत योजून खानानें त्याजकडे वकील पाठविला. तेव्हां शिवाजीनें नम्रतेनें निरोप धाडला कीं आपण जावळीस यावें म्हणजे भेटी होतील.

भेटीकरतां प्रतापगडाचे पायथ्याशीं भव्य मंडप घातला होता. सड्या स्वाऱ्यांच्याच भेटी व्हाव्या असें ठरलें होतें. म्हणून खान आपली फौज जावळी खोऱ्यांत ठेवून बंडू सैद यास बरोबर घेऊन सडाच मंडपांत येऊन बसला होता. खान मोठा धिप्पाड असून फार बळवान् होता. त्यापुढें शिवाजी केवळ पोर दिसत होता. तेव्हां तो एकटा सांपडल्यास त्यास आपण सहज धरून नेऊं अशी खानास घमेंड वाटत होती.

शिवाजीवर आज मोठाच आणीबाणीचा प्रसंग होता. पण तो पुरा

सावध होता. त्यानें भवानीचें दर्शन घेतलें. जिजाबाईचा आशीर्वाद घेतला. आंगांत चिलखत चढवून वर झगा घातला. डोकीस जिरेटोप चढवून वर पागोटें घातलें. उजव्या हातांत भवानी तरवार, बाहींत बिचवा व डाव्या हातांत वाघनखें अशीं हत्यारें घेतलीं आणि जिऊ महाला व संभाजी कावजी या जिवाच्या संवगड्यांस बरोबर घेऊन तो गडाखालीं उतरला.

शिवाजी येतांच खान त्यास सामोरा गेला. आणि भेटत असतां खानानें त्यास डाव्या बगलेंत आवळून त्याचे कुशीवर तरवार चालविली. पण शिवाजीचे आंगांत चिलखत असल्यामुळें तो बचावला. लगेच शिवाजीनें खानाचे पोटांत वाघनखें खुपसुन त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं. तेव्हां खानानें त्यास सोडलें व त्याचे डोक्यावर तरवारीचा प्रहार केला. पण जिरेटोप असल्यामुळे शिवाजीस फारशी इजा झाली नाहीं. मग शिवाजीनें भवानीच्या एका तडाक्यानें खानाचा प्राण घेतला. इतक्यांत बंडू सैद यास जिऊ महल्यानें ठार केलें आणि खानाचें शीर कापून घेऊन ते वेगानें प्रतापगडावर दाखल झाले.

जावळी खोऱ्यांत खानाचें सैन्य होतें. त्याच्या दोहों बाजूंस नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे सैन्यासह दबा धरून बसले होते. ते प्रतापगडावरून इशारत मिळतांच त्या सैन्यावर तुटून पडले आणि थोड्याच वेळांत त्यांनीं त्या साऱ्या सैन्याचा निःपात उडविला.

---

## १३. नरवीर बाजी प्रभु.

शिवाजीस माणसाची पारख फार मोठी असून त्यानें ब्राह्मण, परभू, मराठे इत्यादि हरएक जातींतील कर्तबगार माणसें वेंचून त्यांचा मोठा संग्रह केला होता. अशा शेंकडो नररत्नांचें साह्य असल्यामुळेंच त्यास

स्वराज्यस्थापनेचें कार्य करितां आलें. शिवाजीनें हिरडस मावळ जिंकिलें, तेव्हां तेथील देशमुखाचा सेवक बाजी प्रभु याचें शौर्य व स्वामिनिष्ठा पाहून त्यास सन्मानपूर्वक आपल्या पदरीं ठेविलें. या नरवीरानें एकदां आपला बळी देऊन शिवाजीचे प्राण वांचविले. तो प्रसंग असा:——

अफझुलखानाच्या वधानंतर शिवाजीनें पन्हाळा किल्ला घेतला आणि विजापुरापर्यंत स्वारी केली. तेव्हां बादशहानें सिद्दी जोहर नामक सरदारास त्यावर पाठविलें. सूड घेण्याच्या इच्छेनें अफझुलखानाचा मुलगा फाजलखान हाही त्याबरोबर आला होता.

यावेळीं शिवाजी पन्हाळ्यावर होता. त्यास सिद्दीने अचानक वेढा दिला. आतां शिवाजी खास आपल्या हातीं लागतो असें सिद्दीस वाटलें. शिवाजीनेंही आपलें कांहीं चालत नाहीं असें भासवून तहाचें बोलणें लाविलें आणि उद्यां किल्ला खालीं करून देतों असें कबूल करून तो गडावर परत गेला. तीन महिने सारखा पहारा करून खानाचे लोक कंटाळले होते. आतां किल्ला स्वाधीन झालाच असें मानून त्या रात्रीं ते गाफील राहिले. पण शिवाजीची हिकमत त्यांस माहीत नव्हती. तो मध्यरात्रीच्या सुमारास मावळ्यांची एक तुकडी घेऊन वेढ्यांतून निसटून विशाळगडाकडे निघून गेला !

बऱ्याच वेळानें ही बातमी मुसलमानांस लागली. लगेच फाजलखान घोडेस्वार घेऊन पाठलागास निघाला. सकाळीं नऊ वाजतां शिवाजी विशाळगडाचा घाट चढत असतां त्यास शत्रु पाठीवर आल्याचें दिसलें. नरवीर बाजी प्रभु त्याजबरोबर होताच. त्यास शिवाजी म्हणाला, "तुम्हीं या घोडखिंडींत शत्रूस थोपवून धरावें. आम्ही किल्ल्यावर पोंचतांच तोफेची इशारत करूं. मग तुह्मीं निघून यावें." त्यावर बाजी प्रभूनें उत्तर दिलें, "स्वामींनीं निघून जावें. मीं गनीम थोपवून धरतों. ही खिंड चढूं देत नाहीं."

थोड्याच वेळांत शत्रूचे घोडेस्वार खिंड चढूं लागले, त्यांस बाजी प्रभूनें


पिटाळून लाविलें. मग शत्रूचें पायदळ येऊन थडकलें, त्यानें केलेले दोन हल्ले बाजी प्रभूनें परत फिरविले. इतक्यांत तिसरा हल्ला आला. यावेळेपर्यंत बाजी प्रभूचे बहुतेक लोक पडले होते, तथापि तो वीरश्रीनें लढतच होता. आतां त्यासही गोळी लागली. इतक्यांत किल्ल्यावरील तोफेचा आवाज त्याचे कानी पडला. त्यावरोबर ' मीं आपलें कर्तव्य बजावलें ' अशी गर्जना करून त्या नरवीरानें रणांगणीं देह ठेविला.

विजापुरच्या बादशहाचा निरुपाय झाला, तेव्हां त्यानें शिवाजीशीं तह करून द्या अशी शहाजीस विनंती केली. मग पितापुत्रांची जेजुरीच्या खंडोबाच्या देवळांत भेट झाली. तेथून मुक्कामापर्यंत शिवाजी शहाजीच्या पालखीचा दांडा धरून अनवाणी चालला होता ! शहाजी दोन महिने इकडे होता. त्या मुदतींत शिवाजीनें किल्ले, कचेऱ्या वगैरे सर्व त्यास दाखविलें. पुत्रानें स्वपराक्रमानें मिळविलेलें तें वैभव पाहून शहाजीस किती धन्यता वाटली असेल बरें ? मग तह ठरला. त्याप्रमाणें शिवाजीनें आजवर जिंकलेला सारा मुल्ख त्याजकडे कायम राहिला. त्यावेळीं कल्याणपासून गोव्यापर्यंत कोंकणपट्टी आणि भीमेपासून वारणेपर्यंत १०० मैल रुंदीचा घाटमाथा इतका मुल्ख शिवाजीचे ताब्यांत होता.

---

## १४. शाएस्तेखानाची तारांबळ.

संकटें येऊं लागलीं म्हणजे चोहोंकडून एकदम येतात, असें म्हणतात. सन १६५९ व ६० या दोन वर्षांत शिवाजीवर अशींच चोहोंकडून संकटें कोसळलीं. विजापूरचे प्रख्यात सरदार अफझुलखान व सिद्दीजोहर यांनीं दोनदां त्याचे प्राणावरचा प्रसंग आणिला आणि त्याच वेळीं दिल्लीच्या औरंगजेब बादशहानें त्याचा नाश करण्यासाठीं मुद्दाम आपला मामा शाएस्तेखान यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें. हा शाएस्तेखान


खडकवासला तलाव
मुठा नदी
पुणें
शिवाजीचा वाडा
पर्वती
खडकवासलें
डोणजें
कात्रज तलाव
सिंहगड
कात्रज घाट

चाकणचा किल्ला घेऊन पुण्यापर्यंत आला आणि तेथें तळ देऊन आपण स्वतः खुद्द शिवाजीच्या वाड्यांत राहिला !

विजापूरकरांशीं तह होईतों शिवाजीस मोंगलांकडे पाहण्यास सवड झाली नाहीं. तो तह होतांच त्यानें मोंगलांचा समाचार घेण्याचें ठरविलें. त्याचा पेशवा मोरोपंत पिंगळे पायदळानिशीं जुन्नरच्या उत्तरेकडील किल्ले घेण्यास गेला आणि घोडेस्वारांचा सरदार नेताजी पालकर थेट औरंगाबादेपर्यंत मोगलांचा मुलूख मारून परत आला. स्वतः शिवाजी कोंडाण्यावर होता. त्यानें शाएस्तेखानाची खोड मोडण्याची एक युक्ति योजिली. तीवरून त्याचें विलक्षण साहस व संकटांत उडी घेण्याची तयारी उत्तम दिसून येते.

एके रात्रीं शिवाजी कोंडाण्याचे वाटेनें लोक ठेवीत ठेवीत पुण्यापर्यंत आला आणि निवडक पंचवीस लोकांनिशीं एका वरातीचे मिरवणुकींत मिसळून शहरांत शिरला. मग सामसूम झाल्यावर ते लोक खान राहात होता त्या वाड्यांत शिरले. इतक्यांत खानाच्या बायका घाबरून उठल्या. त्यांनीं खानास जागें केलें, पण वाड्यांत शत्रु शिरले हें ऐकतांच त्याची भीतीनें तारांबळ उडाली. त्याने दिवा मालवला आणि पळून जाण्यासाठीं खिडकींतून उडी टाकली. पण तितक्यांत वार लागून त्याचें एक बोट तुटलें. प्राणांवर आलें होतें तें बोटावरच गेलें म्हणावयाचें ! शेजारचे दालनांत खानाचा मुलगा होता तो मात्र ठार झाला. अशी दंगल उडवून शिवाजी क्षणांत तेथून निसटला व कोंडाण्यास सुखरूप जाऊन पोंचला.

इकडे मोगलांचें सैन्य सज्ज होऊन शिवाजीच्या पाठलागास निघालें. पण त्याला शिवाजीनें चांगलेंच चकविलें. त्यानें कात्रजच्या वाटेनें बैलांचे शिंगांस व झाडांस पोत बांधवून ठेविले होते व आपण परत जातांना कर्णे वाजवून खूण करितांच ते पेटविण्यांत यावे अशी तजवीज करून

ठेविली होती. खानाच्या सैन्यानें कात्रजकडे हे पेटलेले पोत पाहिले तेव्हां शिवाजी इकडेच गेला असें समजून तें तिकडे गेलें. सकाळीं त्यास आपली चूक समजली. तेव्हां मग तें सिंहगडाकडे वळलें.

शत्रु तोफांचे माऱ्यांत येईतों शिवाजीनें अगदीं हालचाल केली नाहीं आणि मग एकदम भडिमार सुरू केला. त्यामुळें खानाच्या सैन्याचा फार संहार उडाला. खुद्द खानाचा हत्ती गोळा लागून ठार झाला, तेव्हां त्यानें घाबरून माघार घेतली. शिवाजीच्या ह्या साहसामुळें खानास त्याचा इतका वचक बसला कीं तो तत्काळ पुण्यांतून छावणी उठवून दूर निघून गेला !

---

## १५. ठकास महाठक.

शाएस्तेखानाच्या पराभवानंतर शिवाजीची गडबड अधिकच वाढली. त्यानें सुरतेवर छापा घालून अपार संपत्ति मिळविली आणि मक्केस जाणारीं कांहीं जहाजें पकडून त्यांपासून मोठा खंड घेतला. याच सुमारास सन १६६४ त शहाजी मरण पावला. तेव्हां शिवाजीनें राजा हा किताब धारण करून आपल्या नांवाचें नाणें पाडलें. या कृत्यामुळें औरंगजेबानें दिलीरखान व जयसिंग हे दोन नामांकित सरदार त्यावर पाठविले. दक्षिणेंत येतांच जयसिंगानें कोंडाण्यास व दिलीरखानानें पुरंदरास वेढा दिला. पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी यानें मोठें शौर्य गाजविलें. शेवटीं तो रणांत पडला, तरी पुरंदर मोगलांचे हातीं लागला नाहीं.

तथापि शिवाजीवर हें मोठेंच संकट आलें होतें. मोंगलांच्या अफाट सैन्यापुढें त्याच्या चिमुकल्या सैन्यांचा फार दिवस टिकाव लागणें शक्य नव्हतें. म्हणून शिवाजीनें आपल्या ३२ किल्ल्यांपैकीं २० मोंगलांस देऊन

त्यांशीं तह केला. या तहानें शिवाजीस विजापूरचे राज्यांत चौथाई व सरदेशमुखी[1] वसूल करण्यास परवानगी मिळाली, हा मात्र मोठा लाभ झाला.

यानंतर जयसिंगानें विजापुरावर स्वारी केली. तींत शिवाजीनें त्यास फार मदत केली, म्हणून संतुष्ट झाल्यासारखें दाखवून औरंगजेबानें शिवाजीस भेटीस बोलाविलें. शिवाजीचे मनांतही एकदां बादशहाचे दरबारची स्थिति सूक्ष्मदृष्टीनें पहावयाची होतीच. म्हणून त्यानें तें आमंत्रण स्वीकारलें आणि मोरोपंत पेशवे वगैरे मुत्सद्यांवर राज्यकारभार सोपवून तो आपला मुलगा संभाजी, तानाजी मालुसरे, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी वगैरे खाशी मंडळी आणि निवडक एक हजार सैन्य घेऊन आग्र्यास गेला. तेथें दरबारांत त्यास स्वतंत्र राजाप्रमाणें न वागवितां हलक्या सरदारांत उभें करण्यांत आलें या अपमानामुळें शिवाजी लाल होऊन त्याचे मुखांतून क्रोधाचे उद्गार निघाले. तेव्हां त्याचें तें स्वरूप पाहून बादशहानें एकदम दरबार बरखास्त केला !

शिवाजी मुक्कामावर पोंचतो तोंच त्याचे वाड्याभोंवतीं पांच हजार शिपायांचा पहारा बसला ! शिवाजीस मोठ्या शिताफीनें कैद केल्याबद्दल बादशहास हर्ष झाला असेल, पण शिवाजी त्या ठकास महाठक भेटला. येथें बळाचा उपयोग नाहीं, युक्तीनेंच कार्य साधलें पाहिजे, हें त्यानें तत्काळ ओळखलें.

थोड्या दिवसांनीं शिवाजीच्या सैन्यानें हवा पाळत नाहीं अशी सबब सांगून दक्षिणेंत परत जाण्याविषयीं बादशहाची परवानगी मागितली. बादशहास तें इष्टच वाटलें. त्यानें आनंदानें परवानगी दिली. मग त्यांपैकीं कांहीं लोक वेष पालटून आग्र्यासच राहिले व बाकीचे दक्षिणच्या

---

१ चौथाई म्हणजे वसुलाचा चौथा हिस्सा आणि सरदेशमुखी म्हणजे वसुलाचा दहावा हिस्सा.

वाटेवर जागोजाग जाऊन राहिले. इकडे शिवाजीनें आपण सरदारी पतकरून आग्र्यासच कायमचे राहण्यास तयार आहों असे बादशहास निरोप पाठविले, अमीर उमरावांच्या भेटी घेण्याची सुरवात केली आणि त्यांकडे नजर म्हणून मेवामिठाईचे पेटारे पाठविण्याचा प्रघात पाडला. पहारेकरी प्रथम प्रथम हे पेटारे तपाशीत, पण रोज मिठाईच जाते असें पाहून ते पुढें पेटारे तपाशीतनासे झाले.

मग शिवाजीनें आजारी पडल्याचे सोंग केलें. यामुळें पहारेकऱ्यांची वाड्यांत येरझार कमी झाली. असे दहापंधरा दिवस गेले. मग एक दिवशीं संध्याकाळीं शिवाजी एका पेटाऱ्यांत व संभाजी दुसऱ्या पेटाऱ्यांत बसले. नित्याप्रमाणे तपासणी न होतांच हे पेटारे बाहेर पडले. भोई हे वेषांतर केलेले मराठेच होते. त्यांनीं पूर्वसंकेताप्रमाणें पेटारे शहराबाहेर नेले. तेथें तानाजी वगैरे जिवाची मंडळी होतीच. त्यांसह शिवाजी व संभाजी वेषांतर करून रातोरात मथुरेकडे निघून गेले.

इकडे हिंरोजी फर्जंद शिवाजीचा पोशाक करून त्याचे अंथरुणावर निजून राहिला होता. तो सकाळीं लवकर उठून ‘महाराज फार आजारी आहेत, मी औषध आणण्यास जातों, तुह्मी कोणी आंत जाऊन गडबड करूं नका ’ असें पहारेकऱ्यांस सांगून बाहेर पडला आणि त्यानें थेट दक्षिणची वाट धरिली ! याप्रमाणें एकही माणूस हातीं लागूं न देतां शिवाजी व त्याचे संवगडी बादशहाचे हातावर तुरी देऊन पांच हजार शिपायांच्या पाहऱ्यांतून निसटून गेले !

बादशहानें शिवाजीस पकडण्यासाठीं दक्षिणच्या वाटेवर लोक पाठविले. पण शिवाजी कसला वस्ताद ! तो सरळ दक्षिणेकडे न जातां बैराग्याच्या वेषानें काशीयात्रा करून जगन्नाथावरून सावकाश रायगडास सुखरूप जाऊन पोंचला ( १६६६ ). वाटेंत मथुरेस मोरोपंत पेशव्यांचे

मेहुणे होते, त्यांजकडे संभाजीस ठेविलें होतें. ते पुढें त्यास दक्षिणेंत घेऊन आले.

## १६. गड आला पण सिंह गेला !

आग्र्याहून सुटून आल्यावर एक दोन वर्षे शिवाजीस स्वस्थता मिळाली. मोगलांनीं त्याची पुणें प्रांतांतील जहागीर परत देऊन त्याचें राजा हें पद मान्य केलें होतें आणि विजापूरकरांनीं त्यास दरसाल ३ लक्ष रुपये व गोवळकोंडेकरांनीं ५ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल करून त्याशीं तह केले होते. या स्वस्थतेचा उपयोग शिवाजीनें राज्यकारभाराची उत्तम व्यवस्था लावण्यांत केला. पण ही स्वस्थता फार दिवस टिकली नाहीं. औरंगजेबाच्या कपटी स्वभावामुळें मोगलांशीं झालेला तह लवकरच मोडला आणि शिवाजीनें पुन्हा त्यांचे मुलखावर हल्ले सुरू केले.

एकदां जिजाबाई प्रतापगडावर बसली असतां तिची नजर ईशान्येस कोंडाण्याकडे गेली. पुण्याच्या इतका जवळचा हा किल्ला शत्रूचे हातीं असावा हें तिला बरें वाटलें नाहीं. तिनें ताबडतोब शिवाजीस बोलावून ‘ एवढा कोंडाणा मला दे ’ असें मागणें केलें !

शिवाजी मोठा मातृभक्त होता. त्यास तिचें मागणें अमान्य करवेना. पण कोंडाणा किल्ला फार मजबूत होता. शिवाय तेथील किल्लेदार उदेभान हा मोठा शूर असून त्याजपाशीं रजपूत व पठाण मिळून १८०० लोकांची शिबंदी होती. यामुळें शिवाजी मोठ्या विचारांत पडला. शेवटीं त्यानें आपला बालमित्र तानाजी मालुसरे याजवर ही कामगिरी सोंपविली.

या वेळीं तानाजी आपल्या गांवीं होता. तेथें त्याचा मुलगा रायबा

याचें लग्न ठरलें होतें. घरांत वऱ्हाड्यांची गडबड सुरू होती. हळदी देखील लागल्या होत्या. इतक्यांत शिवाजीकडून हा खलिता येऊन पोंचला. तो पाहून तानाजी म्हणाला, " आतां आधीं लगीन कोंडाण्याचें, मग रायबाचें करीन." असें म्हणून तो स्वामिभक्त मराठा वीर मुलाचें लग्न तसेंच टाकून एक हजार मावळ्यांनिशीं कोंडाणा घेण्यास निघाला.

रात्र पडतांच तानाजीनें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल्या आणि आपला भाऊ सूर्याजी यास म्हटलें, " तुम्ही एक तुकडी घेऊन दक्षिणेस कल्याण दरवाज्यापाशीं या. आम्ही दुसरीकडून वर चढून तो दरवाजा उघडतों." असें सांगून तानाजी स्वतः दुसरी तुकडी घेऊन किल्ल्याचे पश्चिम अंगास गेला. या बाजूस फार उंच तुटलेला कडा असल्यामुळें इकडून शत्रु वर येण्याचा मुळींच संभव नव्हता. म्हणून इकडे फारसा बंदोबस्त नव्हता. ही बातमी तानाजीनें आधींच काढून ठेविली होती. त्या कड्याखालीं येतांच तानाजी आणि कांहीं मावळे घोरपडीच्या साह्यानें तो कडा चढून वर गेले. लगेच त्यांनीं मेखा ठोकून कांहीं दोर खालीं सोडले व त्यांवरून ३०० मावळे हां हां म्हणतां वर चढून गेले.

इतक्यांत किल्ल्यांतील लोकांस चाहूल लागून ते धावून आले आणि घनघोर संग्राम सुरू झाला. स्वतः तानाजी आणि उदेभान यांची गांठ पडली आणि ते एकमेकांचे प्रहार लागून ठार झाले. इतक्यांत कल्याण दरवाज्यानें सूर्याजी आंत शिरला आणि त्यानें मोठ्या वीरश्रीनें रजपुतांचा व पठाणांचा पराभव करून कोंडाणा किल्ला सर केला (१६७०).

सूर्याजीनें एका गवताचे गंजीस आग लावून दिली. तो जाळ पाहतांच किल्ला सर झाल्याचें शिवाजीस समजलें व मोठा आनंद झाला. पण सकाळीं युद्धाची कच्ची बातमी येऊन तानाजी पडल्याचें समजलें,

तेव्हां आपला बालमित्र हरपल्याबद्दल शिवाजीस अनिवार दुःख झालें आणि त्याचे तोंडांतून उद्गार निघाले कीं, "गड आला पण माझा सिंह गेला!" मग तानाजीचे स्मरणार्थ शिवाजीनें कोंडाण्याचें नांव सिंहगड असें ठेविलें.

---

## १७. नरवीरांची जोडी.

### प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते.

शिवाजीचे पदरीं मोरोपंत पेशवे, तानाजी मालुसरे वगैरे किती तरी रणशूर योद्धे होते. पण त्याचे नामांकित सेनापति म्हटले म्हणजे प्रतापराव गुजर आणि त्याचे पश्चात् हंबीरराव मोहिते हे होत.

सिंहगड जिंकल्यावर लवकरच सूर्याजीनें पुरंदर सर केला. मोरोपंत पिंगळे कल्याण प्रांत घेऊन बागलाणांत शिरला. प्रतापराव गुजरानें खानदेशची खंडणी घेतली आणि स्वतः शिवाजीनें सुरतेवर हल्ला केला. तेव्हां औरंगजेबानें महाबतखान नामक सरदारास मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत पाठविलें.

गुजराथचे वाटेवर सालेर नांवाचा मजबूत किल्ला आहे. तो किल्ला म्हणजे गुजराथचें द्वारच होय. याच वाटेनें शिवाजीनें सुरतेवर हल्ला केला होता. म्हणून मोंगलांनीं या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां शिवाजीनें मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांस त्या किल्ल्याचे मदतीस पाठविलें. प्रतापराव आधीं पोचला. त्यानें मोंगलांशीं थोडा वेळ लढून माघार घेतली आणि मोगल पाठलाग करूं लागून पांगतांच एकदम उलटून त्यांवर निकराचा हल्ला केला. इतक्यांत मोरोपंतही येऊन पोचला. मोंगलांचा पूर्ण पराभव होऊन त्यांचे २२ सरदार व १० हजार लोक रणांत पडले व

पुष्कळ पाडाव झाले. शिवाय दीडशें हत्ती, सहा हजार उंट व सहा हजार घोडे मराठ्यांचे हातीं लागले !

सालेरच्या ह्या युद्धाचें महत्त्व फार मोठें आहे. आजवर मराठे गनिमी काव्यानेंच लढत. समरांगणावर मोंगलांशीं मोठी लढाई अशी ही प्रथम च त्यांनीं केली व तींत मोंगलांचा पूर्ण पराभव केला. यामुळें मराठ्यांस पक्का आत्मविश्वास आला आणि मोंगलांस त्यांची मोठी दहशत बसली. याचें प्रत्यंतर लवकरच आलें. औरंगजेबानें महावतखानास परत बोलावून दुसरा सरदार पाठविला, तो मराठ्यांस भ्याला आणि न लढतांच त्यांशीं तह करून स्वस्थ बसला !

हा तह होतो तोंच विजापूरचा बादशहा मरण पावून तेथें बेबंदशाही झाली. या संधीचा शिवाजीनें पूर्ण फायदा घेतला. त्यानें पन्हाळा सर केला, अण्णाजी दत्तानें हुबळी शहर लुटलें आणि प्रतापराव गुजरानें विजापुरापर्यंत खंडणी घेतली ! विजापूरचें मोठें सैन्य चालून आलें, पण प्रतापरावानें त्यास अडचणीच्या जागीं कोंडलें. तेव्हां विजापूरकरांचा सेनापति त्यास शरण आला आणि पुन्हां मराठ्यांचे वाटेस जाणार नाहीं असें त्याजपासून कबूल करून घेऊन प्रतापरावानें त्यास जाऊं दिलें. पण ही त्याची दया त्यास पुरती भोवली. तो सेनापति लवकरच नवें सैन्य घेऊन चालून आला. तेव्हां प्रतापरावानें संतापून घाईघाईनें त्यावर हल्ला केला. पण स्वतः प्रतापराव रणांत पडला व त्याचे लोक पळूं लागले. इतक्यांत हंसाजी मोहिते ह्या सरदारानें वीरश्रीचें भाषण करून मराठ्यांस मागें फिरविलें आणि शत्रूस विजापुराकडे पिटाळून लाविलें. संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव हे सरदार याच लढाईत प्रथम चमकले. त्यांनीं पुढें थोर पराक्रम केला. हंसाजी मोहित्याच्या पराक्रमानें खूष होऊन शिवाजीनें त्यास हंबीरराव असा किताब दिला आणि आपला सेनापति नेमिलें.

## १८. राज्याभिषेकाचा महोत्सव.

मागें सांगितल्याप्रमाणें मोंगल शिवाजीशीं तह करून स्वस्थ बसले. आणि आतां विजापूरकरांनींही त्याच्या वाटेस जाण्याचें सोडलें. याप्रमाणें शिवाजीनें इ० सन १६४६ त तोरणा किल्ला घेऊन ज्या हिंदवी स्वराज्या-चें तोरण बांधिलें, त्याची आतां स्थिर पायावर संस्थापना झाली. या कार्यास शिवाजीला २८ वर्षें भगीरथ प्रयत्न करावा लागला. या मुदतीत त्यानें किती लढाया केल्या, किती छापे घातले, किती हिकमती लढविल्या, आणि कितीदां स्वतः प्राणसंकटांत उडी घेतली याची गणती नाहीं. धन्य त्या महापुरुषाची व त्याच्या निःसीम साह्यकर्त्यांची !

या वेळीं सुरतेपासून कारवारपर्यंत कोंकणपट्टी व तापीपासून तुंगभद्रे-पर्यंत देश इतका शिवाजीच्या राज्याचा विस्तार होता. त्याचें आरमार प्रबल होतें, सैन्य जय्यत तयार होतें, खजिना भरलेला होता व साऱ्या राज्याची सुव्यवस्था लागलेली होती. आतां फक्त राज्याभिषेक करून छत्र चामरें धारण करावयाचींच काय तीं राहिलीं होतीं.

आपणास राज्याभिषेक करवावा असें शिवाजीच्या मनांत येण्यास अनेक कारणें होतीं. 'हिंदवी स्वराज्य' स्थापन झाल्याची जाणीव त्याच्या साह्यकर्त्यांशिवाय इतर सामान्य लोकांस अद्यापि नीटशी आली नव्हती. दिल्लीचे व विजापूरचे बादशहा कागदोपत्रीं तरी शिवाजीचा स्वतंत्र हिंदू राजा म्हणून उल्लेख करीत नव्हते. इतकेंच नव्हे तर निंबाळकर, जाधव, घाटगे इत्यादि जुन्या अमदानींतले मराठे सरदारही अजून भोसल्यांस आपणासारखे सरदारच मानीत होते. शिवाजी हा महाराष्ट्राचा स्वतंत्र हिंदू राजा आहे, अशी जाणीव त्यांस आली नव्हती. ही जाणीव त्यांस यावी म्हणून काशीचे प्रख्यात पंडित गागाभट्ट यांचे हातून आपणास

मोठ्या समारंभानें रायगड येथें राज्याभिषेक करवून ' छत्रपति शिवाजी महाराज ' सिंहासनावर विराजमान झाले.

या महोत्सवाचे प्रसंगीं शिवाजीनें मोठा दानधर्म केला. त्यानें आपली सुवर्णतुला केली, तीस १६ हजार होन लागले. ते सारे धर्म केले. तसेंच सरदार व मानकरी यांस उंची पोषाक व अलंकार देऊन त्यांचा बहुमान केला. आणि एक नवा शक सुरू केला. त्यास ' राज्याभिषेक शक ' असें म्हणतात. तो मराठी दप्तरांतील कागदपत्रांतून आढळतो.

शिवाजीनें यापूर्वींच अष्टप्रधानांची योजना केली होती. पण त्यांचीं नांवें फारसी होतीं. तीं या वेळीं बदलून संस्कृत ठेवण्यांत आलीं. तीं नांवें अशीं:—१. मुख्यप्रधान—याची लष्करी व मुलकी सर्व कारभारावर देखरेख असे. या वेळीं मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा होता.

२. सेनापति—या पदावर हंबीरराव मोहिते होता.

३. अमात्य—याची वसुलावर देखरेख असे.

४. सचीव—याजकडे सर्व दप्तरांचें काम असे. हें पद अण्णाजी दत्तोकडे होतें.

५. सुमंत—याजकडे परराज्याशीं व्यवहार करण्याचें काम असे.

६. मंत्री—हा राजाचा खासगी कारभार पाही.

७. न्यायाधीश—हा न्यायाची व्यवस्था ठेवी. आणि

८. पंडितराव हा धार्मिक भानगडींची विल्हेवाट लावी.

शिवाजीला राज्याभिषेक झाला तेव्हां राजमाता जिजाबाई अगदीं वृद्ध होती. ती पुढें बारा दिवसांनींच वारली. तिनें ज्यावर त्याच्या जन्मापासून आपली सारी आशा ठेविली व ज्यास स्वतः शिक्षण देऊन स्वराज्यस्थापना करण्यास समर्थ बनविलें, त्या प्रियपुत्रावर छत्रें चामरें झळकतांना पाहून त्या माऊलीस केवढी धन्यता वाटली असेल बरें !

# १९. दक्षिणदिग्विजय.

शहाजीनें आपली महाराष्ट्रांतील जहागीर शिवाजीच्या स्वाधीन केली. तीस शिवाजीनें स्वराज्याचें भव्य स्वरूप दिलें. शहाजीची कर्नाटकांत तंजावराकडे दुसरी फार मोठी जहागीर होती. ती त्याचे पश्चात् त्याचा दुसरा मुलगा व्यंकोजी याजकडे आली. पण तो विजापूरकरांचा अंकित म्हणविण्यांतच भूषण मानीत राहिला! महाराष्ट्रांत जसा दादाजी कोंडदेव तसा कर्नाटकांत शहाजीचा दिवाण, प्रख्यात मुत्सद्दी, रघुनाथ नारायण हणमंते हा होता. त्यानें आपली शिकस्त केली. पण व्यंकोजीपुढें तें पालथ्या घागरीवर पाणी झालें. शेवटीं रघुनाथपंत कंटाळून शिवाजीकडे आला. त्याच्या सांगण्यावरून दक्षिणेकडे मोठें राज्य सहज स्थापतां येईल असें शिवाजीस दिसून आलें. तेव्हां तो लगेच पाऊणलाख फौज घेऊन दक्षिणदिग्विजयास निघाला.

शिवाजीनें प्रथम गोवळकोंड्यास जाऊन तेथील बादशहाशीं सख्य केलें. त्या बादशहानें मराठ्यांच्या शौर्याची मोठी कीर्ति ऐकिली होती. म्हणून एके दिवशीं तो शिवाजीस म्हणाला, "माझ्या हत्तीशीं झुंजेल असा वीर तुमचे लष्करांत कोणी आहे काय?" यावर शिवाजीनें उत्तर दिलें, 'हत्ती तर सोडा, मग पाहूं!' बादशहानें आपला सर्वांत मस्त हत्ती सोडला. तेव्हां शिवाजीनें एसाजी काळे यास खूण केली. मग एसाजीनें हत्तीशीं दोन तीन झटापटी करून मोठ्या शिताफीनें एका घावासरशी त्याची सोंड सपशेल उतरली! दुसऱ्या एका प्रसंगीं बाळाजी आवजी याची विलक्षण हुषारी बादशहास दिसून आली. तेव्हां तो शिवाजीस म्हणाला, 'तुमचा एवढा चिटणीस आम्हांस द्या.' यावर शिवाजीनें हास्यपूर्वक उत्तर दिलें, 'एक एक माणूस मिळवून माळेस मणी लाविले आहेत, ते माळेचे मणी कसे काढतां येतील?'

पुढें शिवाजी तुंगभद्रा उतरून पूर्वेस थेट मद्रासेकडे गेला. आणि तिकडील सर्व किल्ले त्यानें जिंकिले. यांतच जिंजीचा प्रख्यात किल्ला होता. मग शिवाजीनें वडिलार्जित जहागिरीचा वांटा मागण्याच्या मिषानें कर्नाटकावर स्वारी केली. तेव्हां व्यंकोजीनें, आम्ही बादशहाचे चाकर, तुमचा या जहागिरींत कांहीं संबंध नाहीं, असा निरोप पाठविला व शिवाजीच्या तिकडील सैन्यावर हल्ला केला. पण त्यांत त्याचाच पूर्ण पराभव झाला. तथापि शिवाजीनें त्याची सारी जहागीर त्याजकडेच ठेविली. मग शिवाजीनें पश्चिम कर्नाटकाकडे वळून बंगलूर, कोलार वगैरे परगणे काबीज केले आणि तुंगभद्रेच्या उत्तरेकडील प्रांताची खंडणी वसूल केली. याप्रमाणें दक्षिण दिशेचा विजय करून शिवाजी निघाल्यापासून अठरा महिन्यांनीं महाराष्ट्रांत परत आला.

पूर्व कर्नाटकांत जिंजीकडे जिंकलेल्या मोठ्या राज्याची व्यवस्था शिवाजीनें रघुनाथपंत हणमंते याजकडे सोपविली. ती त्यानें फारच उत्तम ठेविली. पुढें औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी केली असतां मराठी राज्यावर मोठेंच गंडांतर आलें. त्या प्रसंगीं या जिंजीच्या राज्याच्याच आश्रयामुळें मराठ्यांचा बचाव झाला.

---

## २०. शिवाजीची राज्यव्यवस्था.

दक्षिणदिग्विजय केल्यानंतर शिवाजीनें विजापूरकरांस साह्य करून त्यांचें मोंगलांपासून रक्षण केलें. हेंच त्याचें शेवटलें मोठें कृत्य होय. यानंतर लवकरच त्यास गुडघी नांवाचा रोग होऊन तो सन १६८०त रायगड येथे मरण पावला.

शिवाजी हा अत्यंत साहसी, शूर व हिकमती होता. तसाच महाबुद्धिमान्,

दूरदर्शी व दक्ष होता. तो जात्या अत्यंत कंटक असून भूक, तहान व कष्ट सोसण्यांत कोणासही हार जात नसे. शिवाय तो सदाचरणी व अत्यंत धर्मनिष्ठ होता. रामदास हे त्याचे गुरु होते. व तुकारामाचीं कीर्तनें ऐकावयास तो मोठ्या भक्तीनें जात असे. सारांश, शिवाजी म्हणजे अनेक लोकोत्तर गुणांचें भांडारच होतें.

शिवाजीनें नुसतें राज्यसंपादनच केलें असें नाहीं. तर उत्तम राज्यव्यवस्थाही केली. त्यानें राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं पाडून तीं अष्टप्रधानांकडे दिलीं आणि स्वतः त्यांत कामाची उत्तम पद्धत लावून दिली.

शिवाजीचें सैन्य फार जय्यत असे. त्यांत पायदळ व घोडदळ असे दोन प्रकार असत. पायदळांत कोंकणांतील हेटकरी असत, ते अचूक नेम मारीत व मावळे असत, ते उत्तम तरवार चालवीत. हे सारे लोक मोठे चिवट व डोंगरांवर चढण्यांत मोठे पटाईत असल्यामुळें किल्ले सर करण्यास पायदळाचा मोठा उपयोग होई. शिवाजीच्या घोडदळांत शिलेदार व बारगीर असे दोन प्रकार असत. शिलेदारांपाशीं घोडा व हत्यारें स्वतःचीं असत. बारगिरांस तीं सरकारांतून मिळत. लांबच्या स्वाऱ्या करण्यांत घोडेस्वारांचा विशेष उपयोग होई.

सैन्यांतील जुन्या लोकांपैकीं लायक जामीन घेतल्याशिवाय शिवाजी कोणासही सैन्यांत घेत नसे. यामुळें चांगल्या माणसांचीच निवड होई. त्याच्या सैन्याची शिस्त फारच कडक असे. लूट करण्याची सर्वांस सक्त मनाई होती. शिवाजी शत्रूचा खजिना लुटी, मोठ्या सावकारांपासून नियमित खंड घेई व चौथाई वगैरे हक्क वसूल करी. पण त्याच्या सैन्यापासून गरीब रयत, स्त्रिया किंवा मशिदी वगैरे धार्मिक स्थानें, यांस बिलकूल उपद्रव पोंचत नसे.

शिवाजीच्या किल्ल्यांचा बंदोबस्त फारच उत्तम असे. दर किल्ल्यावर

दाणावैरण व दारूगोळा भरपूर भरलेला असे. पुरेशी शिबंदी असून एक मराठा ‘ हवालदार ’ मुख्य अधिकारी असे. आणि त्याचे मदतीस लेखी काम करण्यास ब्राह्मण जातीचा ‘ सबनीस ’ आणि सामानाची वगैरे व्यवस्था पाहण्यास प्रभु जातीचा ‘ कारखानीस ’ असे दोन अधिकारी असत.

शिवाजी आपल्या कामदारांस मोठे पगार देई व विशेष कामगिरी-बद्दल मोठीं बक्षिसें देई. पण जहागिरी देत नसे. वंशपरंपरा चालणाऱ्या जहागिरींच्या योगानें राज्य विस्कळीत होतें हें त्यानें ओळखिलें होतें.

शिवाजीनें वसुलाची चोख व्यवस्था केली होती. दर गांवचा वसूल पाटील कुलकर्णी करीत. अनेक खेड्यांवर मिळून ‘ तालुकदार ’ असत व अनेक तालुकदारांवर ‘ सुभेदार ’ असत. असे राज्याचे १२ सुभे असून एकंदर वसूल ५० लक्ष रुपये होता. जमिनीच्या उत्पन्नावर $\frac{२}{५}$ पेक्षां अधिक कर कधींही घेतला जात नसे. व या करावांचून रयतेवर दुसरा कोणताही कर नव्हता. याशिवाय शिवाजीनें न्यायाची उत्तम व्यवस्था केली, विद्येस उत्तेजन दिलें व देवस्थानांस मोठीं वर्षासनें करून दिलीं.

याप्रमाणें शिवाजीनें महाराष्ट्रांत हिंदवी स्वराज्याची स्थापना करून त्याची उत्तम राज्यव्यवस्था लावून दिली. शिवाजी हा राज्यस्थापना करणारा शेवटला हिंदू राजा होय. याच्या तोडीचा पुरुष यानंतर साऱ्या हिंदुस्थानांत आजवर कोणी झाला नाहीं.

---

# छत्रपति संभाजी महाराज.

## २१. संभाजीचा वध.

शिवाजी मरण पावला तेव्हां संभाजी पन्हाळ्यावर नजरकैदेंत होता. तो बापासारखाच शूर होता पण दुर्गुणी व व्यसनी होता. म्हणून त्याचा

धाकटा भाऊ राजाराम यास गादीवर बसविण्याचा मुत्सद्दीमंडळीनें बेत केला. पण संभाजीनें मोठ्या धाडसाने आपली सुटका करून घेतली व सेनापति हंबीरराव मोहिते त्यास मिळाला. तेव्हां सहजच त्यास गादी प्राप्त झाली.

गादीवर बसतांच संभाजीनें आपणाविरुद्ध कारस्थान करणारांचा भयंकर सूड उगविला. मुख्यप्रधान मोरोपंत पिंगळे आणि सुमंत जनार्दनपंत हणमंते यांस कैद केलें. सचीव अण्णाजी दत्तो व चिटणीस बाळाजी आवजी यांस हत्तीच्या पायीं दिलें आणि राजारामाची आई सोयराबाई हीस भिंतींत चिणून ठार मारिलें! अशा प्रकारें त्यानें शिवाजीच्या वेळच्या साऱ्या कर्त्या माणसांची वाट लाविली.

संभाजीची सारी भिस्त कलुशा नामक एका कनोजी ब्राह्मण मांत्रिकावर होता. मंत्रसामर्थ्यानें आपण शत्रूचा नाश करूं अशी तो बढाई मारी व संभाजीचा त्यावर विश्वास बसे. लवकरच राज्यांत कलुशा करील तें कारण आणि बांधील तें तोरण असें होऊन गेलें.

तथापि संभाजीनें आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या चारपांच वर्षांत मोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. त्यानें जंजिऱ्याच्या सिद्दीचें पारिपत्य केलें आणि गोव्याच्या पोर्तुगीजांवर स्वारी करून फोंडा घाटांत त्यांचाही पूर्ण पराभव केला.

इतक्यांत मराठी राज्यावर एक फारच मोठें संकट येऊन कोसळलें. दक्षिण देश जिंकून आपल्या राज्यास जोडावयाचा ही औरंगजेब बादशहाची फार दिवसांची महत्त्वाकांक्षा शिवाजीमुळें आजवर निष्फळ झाली होती. आतां तो शिवाजीचा अडथळा नाहींसा झाला होता. ही संधि साधून स्वतः औरंगजेब बादशहा दक्षिणेवर चालून आला. त्यानें चार लक्ष सेना बरोबर घेतली होती. बाजारबुणगे होते तें निराळेंच! त्याचे

सैन्यांत अफगाणिस्तान व पंजाब येथील धिप्पाड लोक होते. घोडेही तसेच धिप्पाड होते. जय्यत तोफखाना होता. अपार खजिना त्याचे बरोबर होता. आणि सर्व सामानसुमान दुहेरी होतें. पुढील मुक्कामावर तंबू ठोकून सारी सिद्धता झाली म्हणजे मागील मुक्काम हाले ! आणि या सैन्याचा मुक्काम म्हणजे एक मोठें शहरच भासे. अशा डौलानें औरंगजेबाची स्वारी सन १६८३ त दक्षिणेंत दाखल झाली.

दक्षिणेंत येतांच औरंगजेबानें प्रथम मराठ्यांवर शस्त्र धरलें. त्याचा एक मुलगा महाराष्ट्रांत घुसला. पण प्रतापराव गुजरानें त्यास गनिमी काव्यानें सतावून सोडल्यामुळें त्यास माघार घ्यावी लागली. दुसरा मुलगा कल्याण प्रांतांतून कोंकणांत शिरला. पण त्यानें तो प्रांत उजाड करून आपलेच पायावर दगड पाडून घेतला. त्याचे सैन्यास तेथें दाणावैरण मिळेना. तशांत मराठ्यांनीं सारे वाट अडवून धरले. शेवटीं मोठ्या शर्तीनें तें सैन्य कसेंबसें देशावर आलें.

इकडे संभाजीनें भडोच शहर लुटलें आणि मराठ्यांची दुसरी एक टोळी बऱ्हाणपुरापर्यंत मोगलांचा मुलूख मारून आली. औरंगजेबास दक्षिणेंत येऊन तीन वर्षें होऊन गेलीं तरी महाराष्ट्र हातीं येण्याचा कांहींच रंग दिसेना. तेव्हां कंटाळून त्यानें मराठ्यांचा नाद सोडला आणि विजापूर व गोवळकोंडें यांकडे मोर्चा वळविला. त्यानें तीं राज्यें सन १६८७ त खालसा केलीं.

मध्यंतरीं संभाजीस चांगली फुरसत मिळाली होती. पण तिचा त्यानें दुरुपयोग केला. तो कलुशाचे पूर्ण आधीन होऊन ऐषआरामांत दंग राहिला. इतक्यांत विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें बुडवून औरंगजेब महाराष्ट्रावर आला. संभाजी संगमेश्वर येथें विलासांत दंग असल्याची वार्ता मोंगलांस समजली. लगेच त्यांच्या एका सरदारानें अचानक छापा

घालून त्यास पकडलें आणि तुळापूर येथें बादशहाच्या छावणींत हजर केलें. बादशहानें मुसलमान हो म्हणजे जीवदान देतों असें संभाजीस सांगितलें. पण संभाजी कसा झाला तरी वीराचा बच्चा होता.त्यास हा अपमान सहन झाला नाहीं. त्यानें उलट जबाब दिला कीं, तूं आपली मुलगी मला दे, म्हणजे मी मुसलमान होईन. हें उत्तर ऐकून बादशहा खवळला. त्यानें संभाजीचे डोळे काढविले, जीभ तोडविली आणि हाल हाल करून वध केला.

संभाजीच्या वधानें मराठ्यांस मोठा वचक बसेल व महाराष्ट्रदेश हां हां म्हणतां हस्तगत होईल अशी औरंगजेबाची कल्पना होती. पण हे त्याच्या मनचे मांडे मनांतच राहिले.

# छत्रपति राजाराम महाराज.

## २२. जिंजीस प्रयाण.

संभाजीच्या वधामुळें साऱ्या महाराष्ट्रांत हाहाकार उडाला. व सर्व लोक औरंगजेबावर अत्यंत चिडून गेले. सारीं कर्तीं माणसें रायगडास गोळा झालीं आणि जिवांत जीव आहे.तों स्वराज्यासंरक्षणार्थ झटावयाचें अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली.

संभाजीची बायको एसूबाई आणि पुत्र शिवाजी ( शाहू ) हीं रायगडास राहिलीं आणि राजाराम व इतर मंडळी निरनिराळ्या किल्ल्यांच्या बंदोबस्तास लागली. परंतु औरंगजेबानेंही आपली शिकस्त चालविली होती. त्यानें आपल्या अफाट सेनेच्या अनेक टोळ्या करून सारें महाराष्ट्र व्यापिलें आणि किल्ल्यांमागून किल्ले त्याचे हातीं पडूं लागले.

बादशहाचा सरदार झुलपिकारखान यानें रायगडास वेढा घातला. गडकऱ्यांनीं त्यास बरेच दिवस दाद दिली नाहीं. पण शेवटीं सूर्याजी पिसाळ म्हणून एक नीच माणूस वाईची देशमुखी मिळविण्याच्या आशेनें शत्रूस फितूर झाला ! त्यानें शत्रूस चोरवाटा दाखविल्या. तेणें-करून किल्ला त्यांचे हातीं जाऊन एसूबाई व शाहू मोंगलांच्या हातीं लागलीं.

रायगड पडला तेव्हां राजाराम, खंडो बल्लाळ, प्रल्हाद निराजी वगैरे मंडळीनें जिंजीस जाऊन तिकडील राज्य सांभाळावें आणि इकडे रामचंद्र-पंत बावडेकर यानें इतर मंडळीसह महाराष्ट्रांत राहून इकडील राज्य सांभाळण्याची पराकाष्ठा करावी असा विचार ठरला.

राजाराम व त्याचे बरोबरची मंडळी लिंगायत यात्रेकरूंच्या वेषानें रांगण्यावरून निघाली, ती गोकर्णावरून बंगलोर येथें पोंचली. तेथें धर्मशाळेंत ते उतरले असतां अल्प चुकीमुळें त्यांवर मोठा कठीण प्रसंग गुजरला. राजाराम पाय धूत असतां साहजीकपणें दुसऱ्या इसमानें त्याच्या पायांवर पाणी घातलें. तें पाहून तेथील इतर लोक आपसांत कुजबुजले कीं, ‘ हे यात्रेकरू म्हणवितात पण दुसऱ्याकडून पाय धुऊन घेतात. तेव्हां कोणी वेषांतर केलेले लोक असावे.’

लोक कुजबुजले हें ठीक चिन्ह नाहीं, असें जाणून खंडो बल्लाळानें सर्वांस निरनिराळ्या वाटांनीं त्वरित निघून जाण्याचा इशारा दिला आणि तो स्वतः तीन चार इसमांसह तेथेंच राहिला. राजाराम पळाला आहे त्यास शोधून पकडावें, असे औरंगजेबानें चोहोंकडे हुकूम पाठविले होतेच. यामुळें ही कुजबूज फौजदाराचे कानी जातांच त्यानें धरणें पाठविलें. तेव्हां खंडो बल्लाळ म्हणाला, ‘ आम्ही यात्रेकरू; रामेश्वरास जातों. दुसरे कोणी वाटेचे वाटसरू येथें उतरले होते ते आपल्या वाटेनें गेले. त्यांचा

आमचा कांहीं संबंध नाहीं.' फौजदारानें खंडो बल्लाळ व त्याचे साथीदार यांचे डोक्यावर तीन तीन मण वजनाचे धोंडे दिले, राखेचे तोबरे दिले, तरी त्यांचें एकच उत्तर ! 'आम्ही यात्रेकरू, आम्हांस कांहीं माहिती नाहीं.' तेव्हां ते खरेच यात्रेकरू आहेत असें वाटून त्यांस सोडून देण्यांत आलें. मग ते पुढील लोकांस जाऊन मिळाले. अशाप्रकारें राजाराम व त्याचे साह्यकर्ते जिंजीस जाऊन पोंचले.

---

## २३. स्वराज्यसंरक्षणाची पराकाष्ठा.

जिंजी प्रांताची व्यवस्था उत्तम होती व जिंजीचा किल्लाही विस्तीर्ण असून मजबूत होता. तेथें पोचल्यावर प्रल्हाद निराजी वगैरे मंडळीनें तेथून राज्याचीं सूत्रें हालविण्यास सुरवात केली. त्यांनीं संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांस सैन्यासह महाराष्ट्रांत पाठविलें. यांशिवाय जे कोणी सरदार व शिलेदार बादशहास त्रास देतील त्यांस मोठमोठे किताब व इनामें देण्याची सुरवात केली. हीं इनामें सारीं बादशहाचे मुलखांत दिलीं जात. अर्थातच तीं मिळविण्याकरितां ते ते सरदार बादशाही मुलखांत घुसून धुमाकूळ उडवीत. या इनामांच्या व वतनांच्या आशेनें महाराष्ट्रांतील साऱ्या कर्तबगार लोकांचे आंगीं वीरश्रीचें वारें संचारलें आणि प्रत्येकजण शक्य तितके लोक हाताखालीं बाळगून स्वतंत्रपणें महाराष्ट्रांत संचार करूं लागला. अशाप्रकारें लवकरच अशी स्थिति प्राप्त झाली कीं, बादशहाच्या सैन्याचा तळ असेल तेवढाच प्रदेश त्याचे ताब्यांत असावयाचा. बाकी सर्वत्र अंदाधुंदी चालावयाची ! यामुळें बादशहास मुळींच वसूल मिळेनां, दाणावैरण मिळेना आणि उत्तरेंतून खजिना व धान्य

आणवावें तर तेंही धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनीं मधल्या-मधेंच लुटावें ! असा प्रकार सात आठ वर्षे चालला होता.

मराठ्यांच्या ह्या धावटळीचें मूळ जिंजी येथें होतें. तो जिंजीचा किल्ला काबीज करून राजारामास पकडण्यासाठीं औरंगजेबानें झुलपिकारखानास पाठविलें होतें. पण मराठ्यांनीं गनिमीकाव्याच्या योगानें अनेक वर्षें त्यास धूळ चारिली. शेवटीं एकदांचा जिंजीचा किल्ला त्याचे हातीं गेला. पण काय ! राजाराम व त्याचे साह्यकर्ते त्यापूर्वींच निसटून महाराष्ट्रांत येऊन दाखल झाले होते.

आतां राजारामानें उघड्या मैदानांत सातारा येथें राजधानी केली आणि महाराष्ट्रांत अधिकच गडबड मांडली. एकदां तर त्यानें मोठी फौज जमवून बागलाण, खानदेश, वऱ्हाड येथवरचा मुलूख काबीज केला. पण या स्वारीच्या दगदगीनें त्यास नवज्वर होऊन तो सन १७०० मध्यें सिंहगड येथें मरण पावला.

राजाराम मरण पावतांच औरंगजेबास मोठें अवसान आलें. त्यानें उत्तरेकडून मोठमोठ्या नव्या फौजा आणविल्या. आणि मराठ्यांचे सारे किल्ले काबीज करून त्यांचीं पाळें मुळें खणून काढण्याचा निश्चय केला. पण राजारामाची स्त्री ताराबाई मोठी कर्तबगार बाई होती. ती हंबीरराव मोहित्याची मलगी होती. तिनें आपला अल्पवयस्क मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून स्वराज्यसंरक्षणाचा आटोकाट प्रयत्न केला. औरंगजेबानें स्वतः पांच वर्षे खपून मराठ्यांचे सारे किल्ले घेतले. पण रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक प्रतिनिधि आणि शंकराजी नारायण सचीव यांनीं एकामागून एक ते सारे परत घेतले. तसेंच धनाजी जाधव वगैरे मराठे सरदारांनीं गुजराथ, बऱ्हाणपूर येथपर्यंत भराऱ्या मारून आपल्या गनिमीकाव्याच्या योगानें मोगलांस पुरें भंडावून सोडलें.

औरंगजेब आतां ९० वर्षांचा म्हातारा झाला होता. मराठ्यांस जिंकण्याची त्याची सारी आशा नष्ट झाली होती. तो आस्ते आस्ते माघार घेत होता. मराठे त्याजवर चोहोंकडून छापे घालीतच होते. अशा स्थितींत तो अहमदनगरास जाऊन पोचला आणि तेथें सन १७०७ त मरण पावला.



याप्रमाणें औरंगजेब बादशहानें हिंदुस्थानच्या अफाट साम्राज्यांतील सारी साधनसंपत्ति खर्चीं घालून महाराष्ट्र देश जिंकण्यासाठीं उणीं पुरीं पंचवीस वर्षे शिकस्तीचा प्रयत्न केला. पण शिवाजीच्या तालमेंत तयार झालेला महाराष्ट्र तितक्यासह पुरून उरला. महाराष्ट्रानें यावेळीं स्वराज्यसंरक्षणासाठीं ही जी वीरत्वाची शर्थ केली, तीस जगाच्या इतिहासांत जोड मिळावयाची नाहीं.

---

# २४. छत्रपति शाहू महाराज.

औरंगजेब मरण पावतांच त्याचा मुलगा अजीमशहा हा गादी बळकावण्यासाठीं दक्षिणेंतील सारी फौज घेऊन दिल्लीकडे निघाला. यामुळें सहजच मराठ्यांस जोर चढला. तेव्हां त्यांच्यांत दुफळी व्हावी व ते कमजोर व्हावे अशा हेतूनें अजीमशहानें शाहूस महाराष्ट्राची जहागीर देऊन सोडून दिलें.

शाहू दक्षिणेंत येत असतां वाटेंत एकेक मराठा सरदार त्यास मिळून

त्याची फौज वाढूं लागली. पुढें तो अहमदनगरावरून पारद येथें आला. तेथील पाटील ताराबाईच्या पक्षाचा होता. तो शाहूबरोबर लढला, पण शाहूचीच फत्ते झाली. इतक्यांत पाटलाकडील एका बाईनें एक लहान मूल शाहूच्या पालखींत टाकून म्हटलें, 'जे अपराधी होते ते मारले गेले. हें मूल आपणास वाहिलें आहे. यास वांचवावें.' शाहूनें तें मूल ठेवून घेतलें व तेथें प्रथम फत्ते झाली म्हणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोसले असें ठेविलें. हा फत्तेसिंग अक्कलकोटच्या संस्थानिकांचा मूळ पुरुष होय.

ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी व कर्तबगार बाई होती. तिचा नवरा राजाराम यानें व त्याचे पश्चात् स्वतः तिनें अत्यंत परिश्रमानें स्वराज्याचें संरक्षण केलें होतें. तें राज्य आयतेंच शाहूस मिळावें हें तिला बरें वाटलें नाहीं. तिनें हा खरा शाहू नव्हे, कोणी तोतया आहे, असा पुकारा केला आणि धनाजी जाधव व परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यांस त्यावर पाठविलें. त्यांनीं शाहूस खेडकडूसपाशीं गांठलें.

धनाजी जाधवाबरोबर खंडो बल्लाळही होता. त्यानें गुप्तपणें तपास काढून हा खराच शाहू अशी खात्री करून घेतली. शाहू हा वडील घराण्यांतला असल्यामुळें राज्याचा खरा मालक होता. म्हणून धनाजी जाधव त्यास मिळाला. एकट्या प्रतिनिधीनें युद्ध केलें पण त्यांत त्याचाच पराभव झाला. पुढें शाहूनें लवकरच सातारा काबीज करून सन १७०८ त आपणास राज्याभिषेक करून घेतला.

यावेळीं मराठे सरदारांत दुफळी झाली होती. कांहीं सरदार शाहूस मिळाले होते. पण बरेचसे ताराबाईस अनुकूल होते. यामुळें तिचा पक्ष प्रबळ होता. पण राजारामाची दुसरी बायको राजसबाई म्हणून होती, तिनें कांहीं सरदारांस अनुकूल करून ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी यांस कैद केलें आणि आपला पुत्र संभाजी यास कोल्हापूर येथें गादीवर बसविलें. पुढें शिवाजी कैदेंतच वारला व त्याच्या एका मुलाचा खून

झाला. त्याच्या दुसऱ्या मुलास मात्र ताराबाईनें गुप्तपणें पळवून वांचविलें. तोच शाहूच्या मागून गादीवर आलेला रामराजा होय.

ताराबाईचा कांटा मधल्यामधें निघाला तरी महाराष्ट्रांत स्वस्थता झाली नाहीं. औरंगजेबाची स्वारी सुमारें पंचवीस वर्षें महाराष्ट्रांत होती. त्या मुदतींत मराठे सरदारांस अगदीं स्वतंत्रपणें वागण्याचें वळण लागलें होतें. प्रत्येकजण पावसाळा संपतांच आपले स्वार घेऊन बाहेर पडे व साधेल तेथें लुटालूट करी. त्या प्रसंगास तें इष्टच होतें. कारण, त्यामुळेंच औरंगजेब जेरीस आला. पण औरंगजेबाचे मृत्यूनंतरही स्वस्थता न होतां तेंच वळण कायम राहिलें.

अनेक मराठे सरदार थोडाबहुत मुलूख बळकावून स्वतंत्रपणें वागत होते. दमाजी थोरात हिंगणगांवच्या गढींत राहून आसपासचा मुलूख लुटीत होता. कृष्णराव खटावकरानें माण देश व्यापला होता. उदाजी चव्हाण मिरजेकडे स्वतंत्रपणें चौथाई घेत होता. वाडीच्या खेम सांवतानें दक्षिण कोंकणांत दंगा मांडला होता आणि कान्होजी आंग्रे यानें उत्तर कोंकण बळकावलें होतें. शाहूची सत्ता मान्य करावयास कोणीच कबूल नव्हता. पण याही प्रसंगांतून महाराष्ट्रास बचावून नेणारा एक कर्तबगार पुरुष निर्माण झाला. तो बाळाजी विश्वनाथ भट हा होय.

---

# बाळाजी विश्वनाथ पेशवे.

## २५. बाळाजी विश्वनाथाचा उदय.

बाळाजी विश्वनाथ हा मूळचा श्रीवर्धनचा देशमूख. श्रीवर्धन हें गांव जंजिऱ्याच्या सिद्दीचे ताब्यांत होतें. त्या सिद्दीशीं बाळाजीचें न पटल्या-

मुळें तो राजारामाचे कारकीर्दीत देशावर आला. बाणकोटाजवळ वेळास म्हणून गांव आहे तेथील बाळाजी महादेव भानू व त्याचे दोघे भाऊ हेही बाळाजी विश्वनाथाबरोबर देशावर आले. या भानूंनीं बाळाजी विश्वनाथ व त्याचे वंशज यांची एकनिष्ठपणें सेवा केली. याच भानूंच्या घराण्यांत पुढें नाना फडणीस हा प्रख्यात मुत्सद्दी जन्मला.

बाळाजीनें प्रथम भोर येथें सचिवाकडे नोकरी धरिली. तेथें अंबाजीपंत पुरंदऱ्याशीं त्याचा स्नेह जमला. मग ते दोघे धनाजी जाधवाच्या पदरीं राहिले. बाळाजी मोठा कर्तबगार असल्यामळें लवकरच त्याचा उत्कर्ष झाला. सन १६९९ त तो पुण्याचा सरसुभेदार होता व लवकरच धनाजी जाधवाच्या हाताखालीं दिम्मत सेनापति झाला. पुढें शाहू सुटून आला, तेव्हां विशेषतः बाळाजी विश्वनाथाच्याच खटपटीनें धनाजी जाधव त्यास मिळाला आणि तेणेंकरून त्याचा पक्ष बळावून त्यास गादी प्राप्त झाली.

गादीवर बसतांच शाहूनें धनाजी जाधवास सेनापति नेमिलें व वसुलाचें कामही त्यासच सांगितलें. धनाजीनें ही वसुलाची सारी व्यवस्था बाळाजी विश्वनाथावर सोंपविली. ती त्यानें फारच उत्तम प्रकारें केली. म्हणून शाहूनें धनाजीच्या पश्चात् बाळाजीलाच स्वतंत्रपणें वसुलाचे कामावर मुख्य अधिकारी नेमिलें.

धनाजीच्या मागून त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव सेनापति झाला. पण वसुलाचें काम त्यास न मिळतां बाळाजी विश्वनाथास मिळालें, यामुळें तो बाळाजीचा फार द्वेष करी. एकदां शाहूनें ताराबाईच्या कांहीं सरदारांचें पारिपत्य करण्यास चंद्रसेन व बाळाजी विश्वनाथ या दोघांस पाठविलें होतें. तेथें एके दिवशीं चंद्रसेनानें कुरापत काढून बाळाजीचे पथकावर हल्ला केला. पण बाळाजी निसटून गेला आणि त्यानें शाहूच्या कानावर ही हकिकत घातली. इतक्यांत चंद्रसेनानें शाहूस निरोप पाठविला कीं, ' बाळाजी

विश्वनाथास आमचे हवालीं करावें. नाहीं तर आम्हांस आपले पाय अंतरतील!' पण शाहूनें या धमकीस भीक घातली नाहीं. तेव्हां चंद्रसेन ताराबाईस जाऊन मिळाला! हा चंद्रसेन पुढें मोगलांचे व त्यानंतर निजामाचे पदरीं राहून मराठ्यांच्या राज्यास फार भोवला. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ म्हणतात तो असाच.

याच सुमारास दुसरेही पुष्कळ सरदार ताराबाईस मिळाल्यामुळें शाहूची बाजू अगदींच लंगडी पडली होती; पण ती बाळाजीनें सांवरली. त्यानें स्वतःच्या हिमतीवर मोठें सैन्य उभारलें, तेव्हां शाहूनें त्यास 'सेनाकर्ते' असा किताब दिला. मग बाळाजीनें आसपास स्वतंत्रपणें वागणाऱ्या सरदारांवर स्वाऱ्या करून त्यांस वठणीस आणिलें.

प्रथम तो हिंगणगांवच्या दमाजी थोरातावर चालून गेला. तेव्हां दमाजीनें त्यास शरण येऊन तह करण्याकरितां म्हणून गढींत बोलाविलें आणि विश्वासघातानें कैद केलें. मग शाहूनें थोरातास मोठी रकम भरून बाळाजीस सोडविलें! पुढें कांहीं काळानें बाळाजीनें पुन्हां हल्ला करून हिंगणगांवची गढी पाडली व दमाजीस कैद केलें.

मध्यंतरीं बाळाजीनें कृष्णराव खटावकराचा पराभव करून माणदेश काबीज केला. इतक्यांत कान्होजी आंग्रयावर शाहूनें आपला पेशवा बहिरोपंत पिंगळे यास पाठविलें होतें, त्यास आंग्रयानें कैद केलें. तेव्हां शाहूनें बाळाजीची आंग्रयावर रवानगी केली. आंग्रे मोठा प्रबल होता. तो शाहूचे पक्षास मिळेल तर फार उत्तम होईल, असें जाणून बाळाजीनें मोठ्या युक्तीनें त्यास वश केलें. आंग्रयानें शाहूची सत्ता मान्य केली आणि बहिरोपंतास सोडलें. बाळाजीनें असा मोठा विजय मिळविल्यामुळें शाहूनें सन १७१३ त त्यास पेशवाईचीं वस्त्रें देऊन त्याचा मोठा गौरव केला.

## २६. साम्राज्यवृक्षाचें बीजारोपण.

पेशवेपद मिळण्यापूर्वी बाळाजी विश्वनाथानें मोठी कामगिरी केली होती. पण तीपेक्षांही फारच महत्त्वाचीं अशीं दोन कृत्यें त्याचे हातून पुढें पार पडलीं. एक त्यानें दिल्लीहून स्वराज्याच्या सनदा आणिल्या आणि दुसरें नवीन राज्यव्यवस्था लावून सर्व मराठ्यांचा एकजीव केला. या कृत्यांनीं त्यानें मराठ्यांच्या साम्राज्यवृक्षाचें बीजारोपणच केलें. पुढें लवकरच या वृक्षाच्या फांद्या साऱ्या हिंदुस्थानांत पसरल्या.

यावेळीं दिल्लीस राज्याचीं सारीं सूत्रें अबदुल्ला आणि हुसेन अल्ली या दोन सय्यद बंधूंच्या हातीं गेलीं होतीं. बादशहास त्यांचा डोईजडपणा सहन होत नव्हता. म्हणून त्यानें त्यांस फोडून त्यांचा नाश करण्याचा बेत केला. त्यानें अबदुल्ला यास आपली वजिरी देऊन हुसेनअल्लीस दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें व लगेच त्यावर वाटेंत हल्ला करण्याविषयीं गुजराथच्या सुभेदारास हुकूम केला. मग बऱ्हाणपुराजवळ त्यांची लढाई झाली; पण तींत हुसेन अल्लीसच विजय मिळाला.

मग हुसेन अल्लीनें मराठ्यांस दक्षिणच्या साही सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी देण्याचा करार करून त्यांच्या मदतीनें दिल्लीवर स्वारी केली. यावेळीं स्वतः बाळाजी विश्वनाथ व सेनापति खंडेराव दाभाडे मराठ्यांची मोठी सेना घेऊन दिल्लीस गेले होते. तेथें पोंचतांच हुसेन अल्लीनें बादशहास ठार करून दुसरा नवा बादशहा गादीवर बसविला आणि त्याजकडून मराठ्यांस कराराप्रमाणें सनदा करून दिल्या.

पेशवे सनदा घेऊन जातील तेव्हां त्यांवर हल्ला करून सनदा लांबवाव्या असा दरबारच्या मंडळींनें गुप्त कट केला होता. त्याची गुणगूण मराठ्यांस लागली. यावेळीं बाळाजी विश्वनाथावर तर मराठ्यांची सारी भिस्त होती. म्हणून बाळाजीपंत भानु हा पेशव्याचा पोशाक करून त्याचे

पालखींत बसला आणि बाळाजी विश्वनाथ सनदा घेऊन दुसऱ्याच बाजूनें निसटून गेला. इकडे मारेकऱ्यांनीं पालखीवर हल्ला करून हाच पेशवा असें समजून बाळाजीपंत भानूस ठार केलें. याप्रमाणें या भानूनें स्वामिकार्यार्थ आपला देह अर्पण केला.

बाळाजी विश्वनाथानें दिल्लीहून तीन सनदा आणिल्या. एक दक्षिणचे सहा सुभे म्हणजे वऱ्हाड, खानदेश, औरंगाबाद, बेदर, विजापूर आणि हैद्राबाद यांच्या चौथाईची. दुसरी ह्या साही सुभ्यांच्या सरदेशमुखीची आणि तिसरी शिवाजीनें जिंकलेल्या मुलुखाच्या पूर्ण मालकीची म्हणजे स्वराज्याची. या तीन सनदांच्या आधारानें पुढें मराठ्यांनीं आपलें साम्राज्य वाढविलें.

बाळाजीचें दुसरें महत्त्वाचें कृत्य म्हटलें म्हणजे त्यानें नवीन राज्य-व्यवस्था केली हें होय. शिवाजीनें अष्टप्रधान नेमून केलेली राज्यव्यवस्था संभाजीच्या वेळींच मोडली होती. पुढें राजारामाला निरनिराळ्या सर-दारांस जहागिरी देणें भाग पडलें. ह्या जहागिरी काढून घेणें तर आतां शक्य नव्हतें. म्हणून बाळाजीनें शाहूकडून त्याच जहागिरी त्यांस देवबि-ल्या आणि प्रत्येक जहागीरदारानें ठराविक खंडणी शाहूस द्यावी, जहागि-रीचा उत्तम बंदोबस्त ठेवून उत्पन्नाचा हिशेब द्यावा आणि शाहूच्या व त्याच्या मुख्य प्रधानांच्या संमतीशिवाय परशत्रूशीं लढाई किंवा तह करूं नये, अशा त्यांस अटी घातल्या. या व्यवस्थेप्रमाणें कोंकणांत आंग्रे, वऱ्हाडांत भोसले, गुजराथेंत दाभाडे आणि कृष्णा व वारणा यांचे मधील मुलखांत प्रतिनिधि हे अधिकारी कायम झाले.

पुढें स्वराज्याच्या सनदा आणिल्यावर बाळाजीनें वसुलाची उत्तम व्यवस्था लावून दिली. तिच्या योगानें सर्व सरदारांस राज्याच्या प्रत्येक प्रांतांत थोडथोडे हक्क मिळाले. एकाचा जो फायदा तोच सर्वांचा असें झालें आणि त्यांच्यांतील आपसांतली चुरस नाहींशी होऊन साम्राज्याचा

विस्तार करण्यास सर्वांस मोठें उत्तेजन मिळालें. याप्रमाणें सर्व मराठे सरदारांचें शाहूच्या छत्राखालीं ऐक्य करण्याचें महत्कार्य केल्यावर लवकरच सन १७२० त बाळाजी विश्वनाथ मरण पावला.

# थोरले बाजीराव पेशवे.

## २७. बाजीरावाची निजामावर स्वारी.

बाळाजी विश्वनाथास दोन मुलगे होते. बाजीराव आणि चिमाजी अप्पा. यांचें एकमेकांवर इतकें प्रेम होतें कीं त्यांस रामलक्ष्मणांची उपमा शोभते. बाळाजी विश्वनाथानें दमाजी थोरातावर स्वारी केली तेव्हां-पासून स्वारींत काय किंवा दरबारांत काय बाजीराव हा आपल्या बापा-बरोबर असेच. यामुळें त्यास लढाईचें व राजकारणाचें जणूंकाय बाळक-डूंच मिळालें होतें.. बाजीरावाचे गुण शाहूच्याही नजरेस आले होते. म्हणून त्यानें सन १७२० त बाळाजी विश्वनाथाचे मागून त्यासच पेश-वाईचीं वस्त्रें दिलीं.

पेशवाई प्राप्त होतांच बाजीरावानें खानदेशावर स्वारी करून थकलेली खंडणी वसूल केली आणि एकदोन वर्षांत माळव्यावर तीन स्वाऱ्या केल्या. ही त्याची धडाडी व शौर्य पाहून सारे मराठे सरदार त्यास वचकूं लागले.

पण यावेळीं बाजीरावास निजाम उल्मुल्क हा एक नवाच शत्रु उत्पन्न झाला. निजाम उल्मुल्क हा मोठा धूर्त व कावेबाज होता. त्यानें सन १७२० त दक्षिणची सुभेदारी बळकावली. पुढें बादशहानें त्यावर फौज पाठविल्यामुळें तो एकदां मोठ्या पेंचांत आला होता. तेव्हां मराठ्यांचा दक्षिणेंतील चौथाईचा व सरदेशमुखीचा हक्क कबूल करून त्यानें बाजी-

रावाची मदत घेतली आणि मोंगल सैन्याचा नाश करून तो सन १७२४ त हैद्राबादच्या राज्याचा मालक झाला.

निजामानें अडचणीच्या प्रसंगीं मराठ्यांचा चौथाईसरदेशमुखीचा हक्क मान्य केला खरा, पण तो त्यास लवकरच जाचूं लागला. मराठे दरसाल त्याचे राज्यांत शिरून गांवोगांवचा वसूल स्वतः करीत, यामुळें निजामाचे सत्तेस बाध येई. म्हणून एकदां बाजीराव दूर गेला आहे अशी संधि साधून निजामानें श्रीपतराव प्रतिनिधीस वऱ्हाडांत जहागीर देऊन खूष केलें आणि त्याच्या मार्फत शाहूकडून 'मराठ्यांनीं हैद्राबादच्या आसपासच्या मुलखांत वसूल करावयास येऊं नये' अशी सवलत मिळविली.

या कृत्यामुळें बाजीरावास प्रतिनिधीचा मोठा राग आला. मग पेशवे व प्रतिनिधि यांचा बेबनाव झाला असें पाहून निजामानें मराठ्यांमध्यें आणखी फूट पाडण्याचा उद्योग आरंभिला. चंद्रसेन जाधव वगैरे कांहीं सरदार त्यास आधींच मिळाले होते. त्यांच्या मार्फत त्यानें कोल्हापुरच्या संभाजी राजास हाताशीं धरलें व शाहूस निरोप धाडला कीं, 'तुम्हीं व संभाजी राजे यांपैकीं खरा वारस कोण हें आधीं ठरवा. मग खऱ्या वारसास मी खंडणी वसूल करूं देईन.'

हा मगरुरीचा निरोप ऐकून शाहूनें बाजीरावास निजामाची खोड मोडण्याची आज्ञा केली. मग निजाम व त्याचे साह्यकर्ते एक होण्यापूर्वींच बाजीराव त्वरेनें त्याच्या जालना प्रांतांत शिरला. तेथून माहुरावरून औरंगाबादेस जाऊन त्यानें बऱ्हाणपुराकडे गेल्याची हूल दाखविली. पण गुप्तपणें खानदेशांतून थेट गुजराथेंत उतरून तेथली खंडणी वसूल केली! बाजीराव बऱ्हाणपुराकडे गेला असें समजून निजाम तिकडे गेला. तेथें पोचल्यावर बाजीरावानें आपणास खूपच चकविल्याचें त्याच्या ध्यानांत आलें. मग निजाम रागानें पुण्याकडे वळला. पण इतक्यांत बाजीराव त्याच्या राज्यांत घुसल्यामुळें त्यास मागें परतावें लागलें. मग बाजीरावानें

त्यास पालखेड येथें अशा अडचणीच्या जागीं कोंडलें कीं त्यास दाणावैरण मिळेना व प्यावयास पाणीही मिळेना ! तेव्हां निजामानें निरुपाय होऊन बाजीरावाशीं तह केला ( सन १७२८ ). या तहांत असें ठरलें कीं, "निजामानें आपल्या सर्व मुलखांत मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी वसूल करूं द्यावी. हा वसूल करण्यास सोईचे असे कांहीं किल्ले त्यांचे ताब्यांत द्यावे आणि कोल्हापूरचे संभाजीस पन्हाळ्यावर पोचवावें. मग शाहूनें त्याशीं पाहिजे तसा करार करावा. त्यांत निजामानें मध्यें पडूं नये."

याप्रमाणे निजामाची खोड मोडून बाजीराव साताऱ्यास परत आला.

---

## २८. बाजीरावाचे नवे सरदार.

### शिंदे, होळकर, पवार आणि बुंदेले.

१ नीरा नदीच्या कांठीं जेजुरीजवळ होळ म्हणून गांव आहे. तेथील चौगुल्याचा मल्हारी नांवाचा मुलगा होता. त्याच्या लहानपणींच त्याचा बाप वारला म्हणून तो आपल्या मामाकडे राहून त्याचीं मेंढरें राखूं लागला. एके दिवशीं दुपारीं मेंढरें चारणीस लावून मल्हारी निजला असतां एका नागानें त्याजवर आपल्या फडेची छाया केली. यावरून मल्हारी हा पुढें राजा होणार असें भाकित करण्यांत आलें व तें खरें ठरलें. मल्हारी मोठा झाल्यावर शिलेदारी करूं लागला. माळव्याचे स्वारींत त्याचा विशेष पराक्रम दिसून आला. तेव्हां बाजीरावानें त्यास योग्यतेस चढविलें आणि लवकरच तो मेंढरें राखणारा मल्हारी मोठी फौज पदरीं बाळगणारा 'सुभेदार मल्हारराव होळकर' झाला !

२ शिंदे हे पूर्वीचे सातारा जिल्ह्यांतील कोरेगांवाजवळील कण्हेरखेडचे पाटील. या कुळांतील राणोजी शिंदे हा बाजीरावापाशीं हुजऱ्या होता.

तेथें त्याची विलक्षण स्वामिनिष्ठा दिसून आली. एके दिवशीं बाजीराव कचेरीस गेला असतां तेथें कामानिमित्त त्यास फार वेळ लागला. तो कचेरींतून बाहेर येतो तों राणोजीस डुलकी लागली होती. पण त्यानें आपल्या धन्याचे जोडे उराशीं घट्ट धरून ठेविले होते! पुढें बाजीरावानें राणोजीस मल्हारराव होळकराचे हाताखालीं पागेचा अधिकारी नेमिलें. त्यानंतर लवकरच राणोजीचा उत्कर्ष होऊन तो मल्हारराव होळकराच्या बरोबरीचा सरदार झाला.

३ उदोजी पवार हा स्वतःच्या हिमतीवर माळव्यांत खंडणी घेत असे. त्यास बाजीरावानें आश्रय देऊन आपल्या हाताखालीं घेतलें. पुढें शिंदे, होळकर व पवार यांनीं माळव्यांत कायमचें ठाणें दिलें. व ते अनुक्रमें ग्वाल्हेर, इंदूर व धार येथें राहूं लागले. माळव्याच्या खंडणीपैकीं पेशव्यांस ४५ टक्के, शिंदेहोळकरांपैकीं प्रत्येकास २२॥ टक्के आणि पवारास राहिलेले १० टक्के मिळत असत.

४ पेशव्यांनीं माळव्यांत मोठी गडबड उडविल्यामुळें बादशहानें अहमदखान बंगष या सरदारास माळव्याचा सुभेदार नेमिलें. त्यानें माळव्यांत येतांच एकदम बुंदेलखंडावर स्वारी केली. तेथील राजा छत्रसाल अत्यंत वृद्ध होता. त्यानें बाजीरावास मदतीस येण्याविषयीं पत्र लिहिलें. त्यांत पुढील दोहरा होता.

**जो गत ग्राहगजेंद्रकी सो गत भइ है आज ॥**
**बाजी जात बुंदेलकी राखो बाजी लाज ॥ १ ॥**

अर्थ—मागें मगरानें गजेंद्रास पकडलें असतां त्याची जशी अवस्था झाली, तशीच आज माझी झाली आहे. आज बुंदेलखंडाची अब्रू जात आहे. यास्तव हे बाजीरावा, जसें श्रीविष्णूनें त्या गजेंद्राचें रक्षण केलें, तसें तूं माझें रक्षण करून लाज राख.

हें पत्र हातीं पडतांच बाजीरावानें त्वरेनें बुंदेलखंडांत जाऊन जैतपूर

येथें बंगषाचा मोड केला ( १७२९ ) आणि छत्रसालाच्या राज्याचें रक्षण केलें. तेव्हां त्यानें बाजीरावास आपला तिसरा मुलगाच मानून त्यास आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला. या स्वारींत, गोविंदा खेर म्हणून बाजीरावाचा एक शागीर्द होता, त्यानें चांगला पराक्रम केला. म्हणून बाजीरावानें त्यासच या नव्या मुलखाचा सुभेदार नेमून झांशी येथें ठेविलें. हाच पुढें गोविंदपंत बुंदेले या नांवानें प्रसिद्धीस आला.

बाजीरावाची शिंदेहोळकरांवर मोठी भिस्त होती. प्रत्येक आणी-बाणीच्यां प्रसंगीं ते त्याजबरोबर असावयाचेच. एकदां बाजीराव निजाम-उल्मुल्कास भेटावयास औरंगाबादेस गेला होता. त्यावेळीं त्याचेबरोबर फौज नव्हती. कांहीं खिजमतगार मात्र होते. मग कामाचीं बोलणीं संपल्यावर निजाम बाजीरावास विनोदानें म्हणाला, "आतां तुम्ही आमच्या हातांत सांपडलां आहां. तुमचे ते शिंदेहोळकर कोठें आहेत? आतां तुम्हांस आम्हीं दगा केल्यास कसें होईल?" यावर बाजीरावानें उत्तर केलें, "तुम्ही निजाम आहां. तुम्ही असा विश्वासघात करणार नाहीं. केलाच तर माझे शिंदेहोळकर येथेंही प्रगट होतील व जेथें माझें शीर, तेथेंच त्यांचींही शिरें पडतील!" इतक्यांत खिजमतगारांत शिंदे होळकर उभे होते त्यांनीं पुढें होऊन निजामास मुजरा केला. त्याबरोबर निजाम चपापला.

---

## २९. आपसांतील कलह.

निजामाशीं चाललेल्या युद्धांतून मोकळा होतांच बाजीरावानें गुजराथे-कडे लक्ष पुरविलें. तेथें कांहीं मराठे सरदार वरचेवर धुमाकूळ घालीत. यामुळें तेथील मोगल सुभेदार त्रासून गेला आणि पेशवे जर गुजराथेंत शांतता ठेवतील तर तेथील चौथाई व सरदेशमुखी देण्याचा करार करून

देण्यास तो तयार झाला. सर्व प्रांतांवर चौथाईसरदेशमुखीचे हक्क कायमचे बसविण्यासाठीं तर बाजीरावाची सारी धडपड सुरू होती. म्हणून त्यानें सुभेदाराचें म्हणणें मान्य केलें आणि २५०० स्वार गुजराथेंत ठेवून तेथील बंदोबस्त केला.

इकडे बाजीरावानें गुजराथचा बंदोबस्त केला हें तेथें धुमाकूळ घालणाऱ्या मराठे सरदारांस आवडलें नाहीं. सेनापति खंडेराव दाभाड्याचा पुत्र त्रिंबकराव हा त्यांत मुख्य होता. त्यास निजामानें फूस देऊन मदत करण्याचें कबूल केलें व बाजीरावाविरुद्ध उठविलें. कंठाजी कदम बांडे, आनंदराव पवार वगैरे मातबर सरदारही त्यास सामील झाले होते. मग त्रिंबकराव ३५ हजार सैन्य बरोबर घेऊन निजामास मिळण्यासाठीं दक्षिणेकडे येऊं लागला. हें वर्तमान बाजीरावास समजलें तेव्हां त्यानें दाभाडे व निजाम यांचा मिलाफ होण्यापूर्वींच दाभाड्यास गांठण्यासाठीं एकदम गुजराथेकडे कूच केलें. निजामास मिळून गृहकलह माजविण्यांत अर्थ नाहीं म्हणून दाभाड्याची समजूत घालण्याचा बाजीरावानें पुष्कळ प्रयत्न केला; पण तो सारा व्यर्थ गेला. तेव्हां बाजीरावास निरुपायानें त्यावर शस्त्र धरणें भाग पडलें.

या वेळीं बाजीरावाजवळ काय ती ८ हजार फौज होती. तरी मुळींच न कचरतां त्यानें एकदम लगट करून डभईजवळ दाभाड्यावर हल्ला केला. मग घनघोर युद्ध झालें. त्यांत स्वत: त्रिंबकराव दाभाडे गोळी लागून पडला. त्याचे दुसरेही बरेच सरदार कामास आले. कांहीं कैद झाले व बाकीचे पळून गेले.

यानंतर कांहीं दिवसांनीं शाहूनें त्रिंबकराव दाभाड्याचा धाकटा भाऊ यशवंतराव याचें बाजीरावाशीं सख्य करून दिलें. त्यावेळीं अर्धी गुजराथ दाभाड्याकडे राहावी व अर्ध्या गुजराथचा वसूल पेशव्यांचे मार्फत सरकारांत यावा असें ठरलें. पण ह्या यशवंतरावाचे आंगीं कांहींच कर्तबगारी नस-

त्यामुळें त्यास गुंडाळून त्याचा कारभारी दमाजी गायकवाड हाच स्वतंत्रपणें गुजराथचा कारभार पाहूं लागला.

याप्रमाणें महाकारस्थानी निजाम उल्मुल्कानें त्रिंबकराव दाभाडे वगैरे मराठे सरदारांस चिथावून बाजीरावाचा परस्पर पाडाव करण्याचा केलेला नवा डावही सपशेल फसला. तेव्हां त्या धूर्त निजामानें बाजीरावाची भेट घेऊन त्याशीं सख्य केलें.

---

## ३०. बाजीरावाचे तीन महापराक्रम.

### १ सिद्दीचा बंदोबस्त. २ दिल्लीवर स्वारी, व ३ निजामाचें पारिपत्य.

१. सिद्दीचा बंदोबस्तः—निजामाचे चिथावणीवरून सन १७२६ त जंजिऱ्याच्या सिद्दीनें मराठ्यांचे मुलखांत दंगा मांडला. आणि कान्होजी आंग्रे व सिद्दी यांचे झगडे सुरू झाले. पण १७२९ त कान्होजी वारला व त्याच्या मुलांत तंटे सुरू झाले, यामुळें सिद्दीस जोर चढला. शेवटीं स्वतः बाजीरावास तिकडे जावें लागलें.

बाजीराव कोंकणांत उतरतांच सिद्दीचे किल्ले एकामागून एक मराठ्यांचे हस्तगत होऊं लागले आणि शिवाजीच्या वेळेपासून अजिंक्य म्हणून गाजलेला समुद्रांतील मजबूत किल्ला जंजिरा, हा देखील बाजीरावानें सर केला! मग त्यानें तेथें सिद्दीच्या घराण्यांतील आपणास अनुकूल अशा एका इसमास गादीवर बसविलें (१७३३).

२ दिल्लीवर स्वारीः—सिद्दीचा बंदोबस्त करून बाजीराव माळव्यांत गेला आणि तेथील चौथाईसरदेशमुखीच्या सनदा देण्याविषयीं त्यानें दिल्लीच्या बादशहाकडे मागणी केली. बादशहा बाजीरावाचा पराक्रम जाणून होता. म्हणून तो दरसाल उक्ते १३ लक्ष रुपये देण्यास कबूल झाला व

तेवढ्यानें बाजीराव नच ऐकेल तर त्यास देण्यासाठीं माळव्याच्या सनदाही त्यानें आपल्या वकिलापाशीं गुप्तपणें देऊन ठेवल्या. बाजीरावास ही बातमी होतीच. म्हणून त्यानें आपल्या मागण्या अतोनात वाढविल्या. " सारा माळवा व चंबळचे दक्षिणेकडील सारा मुलूख द्यावा; बंगालची खंडणी घेण्याचा हक्क द्यावा; मथुरा, प्रयाग व गया हीं शहरें द्यावीं, वगैरे मागण्या तो मागूं लागला !

बादशाहानें या मागण्या नाकारल्या व युद्धाची जंगी तयारी चालविली. हें बाजीरावास कळतांच तो एकदम बुंदेलखंडांतून आग्र्याचे दक्षिणेस यमुना नदीवर येऊन थडकला. मग बादशहाचे सारे मोठमोठे सरदार आग्र्यास दाखल झाले. पण बाजीराव त्यांस झुकांडी देऊन अचानक दिल्लीजवळ येऊन दाखल झाला आणि त्यानें तेथील बादशाही फौजेचा पूर्ण पराभव केला. मग आग्र्याकडील बड्या फौजेस पाठीवर घेऊन गनिमीकाव्यानें तिशीं लढावें असा बेत करून बाजीराव मागें परतला. पण इतक्यांत त्यास निकडीनें दक्षिणेंत जावें लागल्यामुळें तो बेत तसाच राहिला.

३ निजामाचें पारिपत्य:—बाजीरावानें दिल्लीवर स्वारी करून जी गडबड उडविली, तीमुळें आज नाहीं उद्यां बाजीराव माळवा प्रांत गिळंकृत करील अशी बादशहास भीति पडली. म्हणून त्यानें निजाम उल्मुल्कास दिल्लीस बोलावून माळवा व गुजराथ या प्रांतांचा कारभार त्यावर सोंपविला. मग निजाम बाजीरावाचें पारिपत्य करण्याची प्रतिज्ञा करून जंगी तोफखाना व ३४ हजार सैन्य घेऊन निघाला व माळव्यांत आला. इतक्यांत बाजीरावानेंही नर्मदापार होऊन त्यास गांठलें. तेव्हां निजाम भोपाळच्या किल्ल्याकडे हटला. पण बाजीरावानें त्यावर एकदम हल्ला करून त्याचे सैन्यास भोपाळ शहरांत लोटलें व त्यास चोहोंकडून वेढा दिला ! अशाप्रकारें निजाम मोठ्या पेचांत पडला. बाहेरून मदत येण्याची त्याची आशा खुंटली व उपाशीं मरण्याचा प्रसंग आला. तेव्हां सैन्यासह

बाहेर पडून जंगी तोफखान्याचे जोरावर मराठ्यांची फळी फोडून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण मराठ्यांचें सैन्य थोडें असतांही त्यांनीं चोहोंकडून निजामाचे सैन्यावर हल्ले सुरू केले व त्यास दाणावैरण मुळींच मिळूं दिली नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन निजामानें बाजीरावाशीं तह केला. आणि आपल्या हातानें लिहून दिलें कीं, " मी तुम्हांस बादशहाकडून माळवा प्रांताची सनद, नर्मदा व चंबळा यांचे मधील सारा मुलूख व सैन्याच्या खर्चाबद्दल ५० लक्ष रुपये देववीन ! " ( १७३८ ).

---

## ३१. बाजीरावाचा पाठीराखा-चिमाजीअप्पा.

बाजीरावाचा भाऊ चिमाजीअप्पा हा त्याच्या सारखाच शूर असून त्याची बाजीरावास हरएक प्रसंगीं फार मोठी मदत होत असे. बाजीराव आपल्या शत्रूंचा मिलाफ होण्यापूर्वीं त्यांतील मुख्यावर तुटून पडे, तेव्हां इतर शत्रूंस आडवून धरण्याचें जोखमीचें काम चिमाजीअप्पा फारच उत्तम प्रकारें बजावी. बाजीरावानें दाभाड्यावर हल्ला केला, तेव्हां चिमाजी अप्पानेंच निजामास अडवून धरलें. बाजीरावानें दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां इकडे निजामास गडबड करूं न देण्याची कामगिरी चिमाजी अप्पानेंच पार पाडली आणि बाजीरावानें निजामास भोपाळच्या वेढ्यांत कोंडलें, तेव्हां निजामाचे राज्यांतून त्यास मदत मिळूं न देण्याची तजवीज चिमाजीअप्पानेंच राखिली. सारांश, बाजीरावाच्या विजयाचें बरेंच श्रेय चिमाजीअप्पासही दिलें पाहिजे. असा अद्वितीय पाठीराखा मिळाला हें बाजीरावाचें मोठें सुदैव होय.

चिमाजीअप्पानें पोर्तुगीजांपासून सारा ठाणे जिल्हा सोडविला व वसईचा किल्ला सर केला, यामुळें त्याची मोठी कीर्ति झाली. पोर्तुगीज

लोकांत धर्मवेड फार होतें. त्यांनीं गांवेंच्या गांवें बाटवून किरिस्तांव केलीं, देवळें फोडलीं, आणि हिंदूंचीं वतनें बुडविलीं. तेव्हां दीन प्रजेच्या रक्षणार्थ स्वतः चिमाजीअप्पा धावून आला.

थोड्याच दिवसांत मराठ्यांनीं सारा मुलूख पोर्तुगीजांचे हातून सोडविला. एक वसईचा किल्ला मात्र त्यांकडे राहिला होता. हा किल्ला मोठा मजबूत होता. आणि त्याचे पश्चिमेस व दक्षिणेस खाडी व पूर्व बाजूस चिखल असून उत्तरेकडून काय तो हल्ला करतां येत होता. यामुळें तो किल्ला लवकर सर होईना. तेव्हां चिमाजीअप्पा आपल्या सरदारांस म्हणाला, ' माझें डोकें उडवून तरी वसईच्या किल्ल्यांत टाका. ' इतका तो हट्टास पेटला होता ! शेवटीं मराठ्यांनीं सुरुंग लावून मोठ्या शर्थीनें तो किल्ला सर केला ( १७३९ ).

हा वसईचा वेढा सुरू असतां एकदां असें झालें कीं, पोर्तुगीज सरदाराची बायको होडींत बसून पळून जात होती, तीस मराठ्यांनीं पकडून चिमाजीअप्पापुढें आणिलें. तेव्हां चिमाजीअप्पानें ' हीस कशास धरून आणलें ' असें म्हणून तिला सत्कारपूर्वक परत लावून दिलें.

वसईचा वेढा चालू असतां इराणचा बादशहा नादीरशहा, यानें दिल्लीवर स्वारी केली आणि तो दक्षिणेवर चालून येणार अशी वदंता उठली. तेव्हां लगेच बाजीराव त्यास अडविण्यासाठीं निघाला आणि या परचक्रापासून देशाचें रक्षण करण्यासाठीं आतां " हिंदू मुसलमानांनीं एक झालें पाहिजे " असें त्यानें जाहीर केलें. पण इतक्यांत नादीरशहा दिल्ली लुटून इराणांत परत गेला.

यावेळीं निजाम उल्मुल्क दिल्लीस होता. त्यानें कबूल केल्याप्रमाणें माळव्याच्या सनदा अद्याप दिल्या नव्हत्या. म्हणून त्याच्या पारिपत्यासाठीं बाजीराव उत्तरेकडे जावयास निघाला. पण तो वाटेंत नर्मदातटाकीं रावेर परगण्यांत कलमडें येथें एकाएकी मरण पावला ( १७४० ). या

वेळीं त्याचें वय अवघें ४५ वर्षांचें होतें. यानंतर एका वर्षाचे आंतच चिमाजीअप्पाही निवर्तला.

बाजीराव मोठा शूर व महत्त्वाकांक्षी होता. त्याचा सारा जन्म लढायांत गेल्यामुळें त्यास अतोनात कर्ज होई व त्या त्रासामुळें त्यास कधीं कधीं जीवही नकोसा होई. पण त्याची उमेद विलक्षण होती. दिल्लीचें राज्य नामशेष करून साऱ्या हिंदुस्थानांत चौथाई सरदेशमुखीचे हक्क बसवावे आणि त्यांचे वसुलासाठीं चोहोंकडे मराठे सरदार पसरून त्यांजकडून मराठी साम्राज्याचा विस्तार करवावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण निजामाच्या विरोधामुळें, मराठे सरदारांमधील फांटाफुटीमुळें आणि विशेषतः त्याच्या अकालीं मरणामुळें ती पूर्ण झाली नाहीं.

# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे.

## ३२. बाळाजी बाजीराव पेशवा होतो.

बाजीराव मरण पावला तेव्हां त्याचा वडील मुलगा बाळाजी हा एकवीस वर्षांचा होता. तो मोठा शूर व कर्तबगार असून आपल्या वयाच्या सतराव्या वर्षापासून मोहिमांवर जाऊं लागला होता. पण त्यास पेशवाई न मिळतां ती पेशव्यांचा सावकार बाबूजी नाईक बारामतीकर यास मिळावी अशी रघूजी भोसल्यानें खटपट चालविली.

रघूजी मोठा शूर व महत्त्वाकांक्षी होता. त्यास पेशव्यांचें वर्चस्व सहन होत नव्हतें. यापूर्वींच त्यानें शाहूची किंवा पेशव्यांची परवानगी न घेतां अलाहाबाद व कटक या प्रांतांवर स्वाऱ्या करून मोठी लूट मिळविली होती. पण बाजीरावानें आपसांत वैर वाढूं नये म्हणून त्याची गय करून सामोपचारानें त्यास वळवून कर्नाटकाचे मोहिमेवर पाठविलें होतें.

बाजीराव वारल्याचें ऐकतांच रघूजी एकदम कर्नाटकांतून महाराष्ट्रांत आला आणि बाबूजी नाइकास पेशवाई मिळवून देण्याचे खटपटीस लागला. बाबूजी नाइकांत कांहींच कर्तबगारी नव्हती. तेव्हां तो पेशवा झाल्यावर मराठमंडळांत आपलें वर्चस्व स्थापतां येईल अशी रघूजीची महत्त्वाकांक्षा होती. पण शाहू सर्वांस ओळखून होता. स्वतंत्रपणें वावरूं पाहणाऱ्या मराठे सरदारांस दाबांत ठेवून राज्याचें रक्षण व विस्तार करण्याचें सामर्थ्य एका बाळाजी बाजीरावांतच आहे असें जाणून शाहूनें त्यासच पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.

पेशवाई न मिळाल्यामुळें बाबूजी नाईक चिडला आणि बाळाजीकडे कर्जासाठीं धरणें धरून बसला. यावेळीं बाळाजी मोठ्या पेचांत सांपडला होता. पण त्याचा कारभारी महादाजीपंत पुरंदरे यानें साऱ्या कर्जाची हमी घेऊन त्यास संकटांतून मुक्त केलें.

रघूजीनें बाळाजीस जो विरोध केला त्याबद्दल त्याचें शासन करण्याची संधि बाळाजीस लवकरच मिळाली. रघूजीनें बहार प्रांतावर स्वारी केली, तेव्हां तेथील सुभेदारास मदत करण्याविषयीं दिल्लीच्या बादशहानें बाळाजीस विनंती केली. बाळाजी आपणावर चालून येत आहे असें पाहतांच रघूजी डोंगरांतून पळूं लागला; पण बाळाजीनें आडवाटेनें त्यास गांठून त्याचा पूर्ण पराभव केला.

या एका कृत्यानें बाळाजीनें अनेक गोष्टी साधल्या. एक, आपल्या प्रतिपक्ष्याचा पाडाव केला. दुसरें, शाहूच्या सत्तेतून फुटून स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या मराठे सरदारांवर वचक बसविला. आणि तिसरें, या मदतीबद्दल बादशहाकडून माळवा प्रांताची सनद मिळविली. ही सनद मिळविण्याची बाजीरावाची फार इच्छा होती. ती त्याच्या मृत्यूनंतर तीनच वर्षांचे आंत बाळाजीनें पूर्ण केली. याप्रमाणें मोठा पराक्रम करून बाळाजी हिशेब देण्यासाठीं साताऱ्यास निघून गेला.

बाळाजीचा दुसरा प्रतिस्पर्धी म्हणजे बाबूजी नाईक. यानें शाहूपासून कृष्णा व तुंगभद्रा यांमधील दुआबाचा वसूल करण्याचा मक्ता घेतला होता. पण त्याचे हातून वसूल धड होईना. म्हणून बाळाजीने चिमाजी-अप्पाचा मुलगा सदाशिवराव भाऊ यास तिकडे पाठविलें. यावेळीं सदाशिव रावभाऊ केवळ १७ वर्षांचा होता, तरी त्याची हुशारी व कर्तृत्व मोठें होतें. त्यानें त्या प्रांताचा बंदोबस्त केला, तुंगभद्रेपर्यंत खंडणी वसूल केली, बहादूरभेंडा हा किल्ला सर केला आणि सावनूरचे नबाबापासून पंचवीस लक्षांचा मुलूख मिळविला ( १७४७ ).

याप्रमाणें सर्व प्रतिस्पर्ध्यांवर वचक बसविल्यानंतर बाळाजीनें सदाशिव-राव भाऊच्या मदतीनें राज्यकारभारांत पुष्कळ सुधारणा केल्या आणि शेतीस उत्तेजन दिलें. तेणेंकरून देशांत सुबत्ता होऊन गेली. बाळाजीची ही कर्तबगारी पाहून शाहूस फार समाधान वाटलें. पण पुढें लवकरच शाहू आजारी पडल्यामुळें पुन्हां बखेडे सुरू झाले.

## ३३. शाहूचा मृत्यु.

शाहू आपल्या वयाच्या सहाव्या वर्षापासून पंचविसाव्या वर्षापर्यंत मोगलांच्या नजरकैदेंत होता, यामुळें त्यास मोगलांप्रमाणेंच विलासांत राहण्याची संवय जडली होती. पुढें सुटून आल्यावर दोन चार वर्षेंच काय ती त्यानें लढायांची दगदग केली. पण जरा स्वस्थता होतांच सारा कार-भार पेशव्यांवर सोंपवून तो सातान्यास सुखानें राहूं लागला. शाहूच्या सुदैवानें त्याचे तिन्ही पेशवे एकाहून एक कर्तबगार व अत्यंत स्वामिनिष्ठ निघाले. यामुळें राज्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन शाहूस फार सुख झालें.

शाहूस दोन स्त्रिया होत्या. सकवारबाई आणि सगुणाबाई. या दोघीं-सही मूल झालें नाहीं. यामुळें पुढें पुढें शाहू उदास असे. सन १७४८ त

त्याची आवडती स्त्री सगुणाबाई वारली, तेव्हांपासून तर तो फारच उदासीन झाला व दिवसेंदिवस क्षीण होत चालला. तेव्हां आतां देहाचा भरंवसा नाहीं असें जाणून, त्यानें ताराबाईचा नातू रामराजा यास दत्तक घेण्याचें ठरविलें व सर्व प्रमुख सरदारांस सातान्यास बोलाविलें.

सकवारबाई मोठी महत्त्वाकांक्षी होती. तिला वाटलें कीं, रामराजा गादीवर येतांच ताराबाईचें प्रस्थ माजेल व आपणास कोणी पुसणार नाहीं. म्हणून ती रामराजाविरुद्ध कारस्थानें रचूं लागली. तिनें शाहूस वाड्यांत ठेवून दरवाज्यावर पहारा बसविला आणि एकदां तर बाळाजी बाजीरावावर मारेकरीही घातले ! पण बाळाजी पुरा सावध असल्यामुळें बचावला. आपल्या मागें रामराजासच गादी मिळावी अशी शाहूची इच्छा होती. त्याप्रमाणें त्यानें बाळाजी बाजीरावास स्वदस्तूरची पुढील आशयाची यादी लिहून दिली. " कोल्हापूरचें व सातारचें राज्य एक करूं नये. माझ्या मागें रामराजास दत्तक घेऊन राज्य चालवावें. तसेंच पूर्वींप्रमाणें सर्वांचें आहे तसेंच चालवून राज्याचें संरक्षण करावें. "

पुढें थोड्याच दिवसांनीं शाहू वारला ( १७४९ ). तेव्हां बाळाजीनें त्याच्या इच्छेप्रमाणें रामराजास गादीवर बसविण्याचें ठरवून सकवारबाई-च्या पक्षाकडील लोकांचा बंदोबस्त केला. आणि आपली राज्य करण्याची इच्छा सफल होत नाहीं असें पाहून ती मानी सकवारबाई सती गेली.

रामराजाचे आंगीं कांहींच कर्तबगारी नव्हती. तो गादीवर बसल्यावर लवकरच सांगोलें येथें एक लाहनसें बंड झालें. तें मोडण्यास तो सदाशिवरावभाऊबरोबर गेला होता. पण तेवढ्याच लढाईनें तो कंटाळला आणि त्यानें पेशव्यांस यादी लिहून दिली कीं, " पेशव्यांनींच सर्व राज्याचा कारभार पहावा. आपण मुळींच राजकारणांत पडणार नाहीं. साडेपासष्ट लक्षांचा मुलूख आपल्या खासगी खर्चाकरितां पेशव्यांनीं द्यावा, म्हणजे झालें. " यावरून पुढें सर्व राज्यकारभार पुण्यासच चालूं लागला.

यावेळीं ताराबाईचें वय ७० वर्षांचें होतें, तरी तिला राज्य करण्याची अनिवार इच्छा होती. तिनें अनेक मराठे सरदारांस वश केलें, निजामाकडे संधान बांधलें, दमाजी गायकवाडास मोठ्या सैन्यानिशीं बोलाविलें आणि रामराजास जेवण्यास बोलावून साताराचे किल्ल्यांत कैद करून ठेविलें! बाळाजी यावेळीं कृष्णातीरीं रायचूर येथें होता. निजामाचें पूर्ण पारिपत्य करावें असें त्यानें योजिलें होतें. त्यास सातारची ही वार्ता कळली तेव्हां तो तेरा दिवसांत चारशें मैल अंतर तोडून आला! आणि त्यानें दमाजीचा पराभव करून त्यास कैद केलें. मग आपोआपच ताराबाई स्वस्थ बसली. तिनें पुन्हां गडबड करूं नये म्हणून बाळाजीनें चंदन वंदन किल्ल्यांपाशीं दहाहजार फौज कायमची ठेवून दिली.

---

## ३४. साम्राज्याचा दक्षिणेंत विस्तार

बाळाजीच्या हातीं मराठी राज्याचीं सूत्रें पूर्णपणें येतांच त्यानें साऱ्या हिंदुस्थानांत मराठ्यांच्या साम्राज्याचा विस्तार करण्याचें अचाट काम हातीं घेतलें. त्यानें शिंदे, होळकर व आपला भाऊ राघोबादादा यांजवर उत्तर हिंदुस्थानची कामगिरी सोंपविली. व सदाशिवराव भाऊच्या मदतीनें दक्षिणेंत साम्राज्यविस्तार करण्याचें काम स्वतः आपणाकडे घेतलें.

दक्षिणेंत मराठ्यांचे राज्याच्या पूर्वेस निजामाचें विस्तीर्ण राज्य होतें. आणि खालीं कर्नाटकांत म्हैसूरचें हिंदू राज्य आणि सावनूर, कडापा, कर्नूल वगैरे ठिकाणीं नबाबाचीं राज्यें होतीं. पण या सर्वांपेक्षां हैद्राबादचा निजामच विशेष प्रबल होता.

सन १७४८ त हैद्राबादचा निजाम उल्मुल्क वारला व तेथें गादीविषयीं तंटे लागून अनेक उलाढाली झाल्या. शेवटीं फ्रेंच लोकांच्या मद-

तीनें निजामाचा तिसरा मुलगा सलाबतजंग यास गादी मिळाली. तेव्हांपासून तेथें फ्रेंचांवांचून पान हालेनासें झालें. निजामाच्या दरबारीं परक्या फ्रेंच लोकांचें वर्चस्व झालें, हें बाळाजीस आवडलें नाहीं. म्हणून त्यानें निजामाचा थोरला मुलगा गाजीउद्दीन दिल्लीस होता, त्यास आणून गादीवर बसविण्याचा बेत केला. पण वाटेंत गाजीउद्दिनास विषप्रयोग होऊन तोच मारला गेला ! याप्रमाणें आपल्या वतीचा निजाम गादीवर बसविण्याचा बाळाजीचा बेत फसला तरी सलाबतजंगानें त्यास भिऊन त्याशीं तह केला आणि तापी व गोदावरी यांमधील प्रांत दिला ( १७५२ ).

पुढें चार वर्षांनीं सलाबतजंगाचा भाऊ निजामअल्ली मराठ्यांवर चालून आला. पण बाळाजीचा मुलगा विश्वासराव व शिंदे यांनीं त्याचा शिंदखेडाजवळ पूर्ण पराभव केला. तेव्हां त्यानें मराठ्यांशीं तह करून त्यांस २५ लक्षांचा मुलूख देऊं केला ( १७५६ ).

यानंतर निजामअल्ली हा हैद्राबादचा दिवाण झाला. तो कबूल केल्याप्रमाणें मुलूख व किल्ले मराठ्यांचे हवालीं करीना. म्हणून सदाशिवराव भाऊनें स्वारी करून उदगीर येथें त्याचा पूर्ण पराभव केला. निजामाचे ११ हत्ती व १५ तोफा पाडाव झाल्या व स्वतः निजामअल्ली तर इतका घाबरून गेला कीं, त्यानें भाऊकडे आपले शिक्के पाठवून पाहिजे त्या अटींवर तह करा म्हणून विनंती केली ! मग तह ठरला. त्याअन्वयें मराठ्यांस अशीरगड, बऱ्हाणपूर, दौलताबाद, सालेर, मुल्हेर व अहमदनगर हे सहा प्रख्यात किल्ले व ६० लक्षांचा मुलूख मिळाला ( सन १७५९ ).

शिवाजीनें कर्नाटकांत स्थापन केलेलें राज्यही मधल्या धामधुमींत मराठ्यांच्या हातचें गेलें होतें. तें सोडवून तिकडे साम्राज्यविस्तार करण्यासाठीं सन १७५० पासून बहुतेक दरवर्षीं मराठ्यांची कर्नाटकावर

स्वारी होऊं लागली. लवकरच तुंगभद्रेपर्यंतचा सारा मुलूख मराठी राज्यांत सामील झाला आणि त्याचे दक्षिणेस सावनूर, कडापा व कर्नूल येथील नबाब आणि म्हैसूरचा राजा यांजपासून पुष्कळ मुलूख मराठ्यांनीं जिंकून घेतला. या लढायांत बळवंतराव मेहेंदळे व पटवर्धन सरदार यांनीं मोठा पराक्रम केला. पुढें सन १७५९ त उदगीरची लढाई जिंकल्यावर सदाशिवरावभाऊ राहिलेलें कर्नाटक जिंकण्यासाठीं तिकडेच वळणार होता. पण इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांत अहमदशहा अबदल्लीची जंगी स्वारी झाल्यामुळें त्यास तो बेत रहित करावा लागला. तथापि या वेळेपावेतों दक्षिण हिंदुस्थानांत मराठी साम्राज्याचा फारच मोठा विस्तार झाला होता.

## ३५. साम्राज्याचा उत्तर हिंदुस्थानांत विस्तार.

बाळाजी बाजीराव दक्षिणेंत मराठी साम्राज्याचा विस्तार करीत असतां सन १७५०–५१ चे सुमारास शिंदे होळकरांनीं उत्तर हिंदुस्थानांत मोठा पराक्रम गाजविला. यावेळीं दिल्लीच्या बादशहाची सत्ता अगदीं संपुष्टांत आली होती. चोंहोंकडे निरनिराळे सरदार व सुभेदार स्वतंत्र होऊं पहात होते आणि खुद्द दिल्लींतही बादशहा व त्याचा वजीर यांविरुद्ध कारस्थानें सुरू होतीं. गंगा व यमुना यांमधील अंतर्वेदींत पठाण लोकांनीं आपला अंमल बसविला होता आणि गंगेच्या उत्तरेचें रोहिलखंड हें रोहिले लोकांच्या ताब्यांत गेलें होतें. या पठाण व रोहिले लोकांनीं एक होऊन वजिराचा पराभव केला. तेव्हां त्यानें शिंदेहोळकरांपाशीं मदत मागितली.

यापूर्वीं नुकताच राणोजी शिंदे वारला होता. त्याचे मुलगे जयाप्पा व दत्ताजी आणि मल्हारराव होळकर यांनीं एकदम यमुना उतरून अंतर्वेदींतील पठाणांचा मोड केला आणि गंगेस नावांचा पूल बांधून, रोहिल-

खंडांत शिरून, रोहिले लोकांचाही पराभव केला. या कामगिरीबद्दल दिल्लीच्या बादशहाकडून मराठ्यांस मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या सर्व प्रांतांतल्या चौथाईची सनद मिळाली. पण तीबरोबरच या सर्व प्रदेशांत बंदोबस्त राखण्याची फार मोठी जबाबदारी मराठ्यांवर येऊन पडली आणि या प्रदेशांतील स्वतंत्र होऊं पाहणारे सारे मुसलमान व रजपूत लोक मराठ्यांस पाण्यांत पाहूं लागले.

यानंतर राघोबादादा सन १७५३ त अहमदाबाद काबीज करून राजपुतान्यांत खंडण्या घेत घेत जाठांच्या मुलखापाशीं आला. यावेळीं दिल्लीस फारच बखेडे माजले होते. अशा वेळीं वजिरानें मराठ्यांस सोडून जाठांची मदत घेतली. तेव्हां शिंदे होळकरांनीं वजिराचा प्रतिस्पर्धी गाजीउद्दीन यास मदत करण्याचें ठरविलें. इतक्यांत राघोबादादाही आला. तेव्हां शिंदे, होळकर व राघोबादादा या तिघांनीं सुरजमल्ल जाठाच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा दिला.

हा वेढा चालू असतां एके दिवशीं मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा व प्रख्यात साध्वी अहल्याबाई होळकरीण हिचा नवरा खंडेराव हा एकाएकीं गोळी लागून मरण पावला. तेव्हां मल्हाररावानें पुत्रशोकाचे भरांत प्रतिज्ञा केली कीं, "सुरजमल्लास ठार करीन आणि कुंभेरी खणून यमुनेंत टाकीन!" ही मल्हारप्रतिज्ञा ऐकून रजमल्लाचें धाबें दणाणलें आणि तो जयाप्पा शिंद्यास शरण गेला. शरणागताचें रक्षण करावें या धर्माप्रमाणें जयाप्पानें जाठास अभयवचन दिलें. पण यामुळें मल्हाररावास मोठा राग आला आणि पुढें शिंदेहोळकरांचें पूर्वींसारखें सख्य राहिलें नाहीं. मग जाठांपासून साठ लक्ष रुपये खंडणी घेऊन राघोबादादा व होळकर दुआबाच्या बंदोबस्तास गेले व शिंदे मारवाडाकडे वळले.

मारवाड म्हणजे जोधपूरचें राज्य. तें विजयसिंगानें बळकावलें होतें. त्याचा पराभव करून शिंद्यांनीं त्यास नागोरच्या किल्ल्यांत कोंडून धरलें.

विजयासिंगाचा कांहीं उपाय चालेना. तेव्हां त्यानें नीचपणानें जयाप्पा शिंद्यावर मारेकरी घातले. जयाप्पा स्नान करून डोळे पुशीत असतां भिकाऱ्याच्या वेषानें आलेल्या तिघा मारेकऱ्यांनीं एकदम त्याच्या कुशींत सुरे भोसकले ! आणि याच संधीस विजयसिंगानें किल्ल्याबाहेर येऊन मराठ्यांवर हल्ला चढविला.

जयाप्पा मरणोन्मुख पडला होता तरी तो खरा वीर होता. तो डोळे उघडून, जवळ दत्ताजी शोक करीत बसला होता त्यास म्हणाला, "वैरी युद्धास आला आणि तूं बायकोसारखा रडतोस ! हें क्षात्रधर्मास उचित नाहीं." या भाषणानें दत्ताजीस चीड आली. आणि त्यानें निकराचा हल्ला करून विजयासिंगास किल्ल्यांत पिटाळून लाविलें. दत्ताजी परत येतो तों जयाप्पाचें देहावसान झालें होतें. जयाप्पा मरण पावला तरी त्याचा पुत्र जनकोजी व भाऊ दत्ताजी यांनीं वेढ्याचें काम जोरांत चालू ठेविलें. शेवटीं विजयसिंगानें शरण येऊन त्यांशीं तह केला.

याप्रमाणें शिंदे, होळकर व राघोबादादा यांनीं सारा राजपुताना, गंगा व यमुना यांमधील दुआब व रोहिलखंड येथपर्यंत साम्राज्याचा विस्तार केला आणि दिल्लीस गाजीउद्दीनास वजीर करून तेथेंही आपला पगडा बसविला.

---

## ३६. अहमदशहा अबदल्लीच्या स्वाऱ्या

मराठ्यांच्या साह्यामुळें दिल्लीचा वजीर गाजीउद्दीन फार अरेरावीनें वागूं लागला. यामुळें त्याच्याविरुद्ध कारस्थानें सुरू झालीं. नजीबखान रोहिला म्हणून एक मोठा पाताळयंत्री सरदार होता. त्यानें तर गाजीउद्दीनाचे पारिपत्यासाठीं अफगाणचा बादशहा अहमदशहा अबदल्ली यास बोला-

विलें. तेव्हां अहमदशहा सन १७५६ त हिंदुस्थानांत उतरला. प्रथम त्यानें लाहोर व मुलतान हे प्रांत घेतले आणि मग दिल्ली लुटून बादशहा व गाजीउद्दीन यांस कैद केलें.

ही बातमी ऐकतांच बाळाजी बाजीरावानें राघोबादादाची उत्तर हिंदुस्थानांत रवानगी केली. पण तो पोंचण्यापूर्वींच, अबदल्ली पंजाब व मुलतान या प्रांतांच्या संरक्षणास आपला मुलगा तैमूरशहा यास ठेवून स्वदेशीं परत गेला होता. राघोबानें दिल्लीस पोंचतांच तेथें मराठ्यांचें पुन्हां वजन बसविलें (१७५७). नजीबखान रोहिल्याचें पारिपत्य करण्याचा त्याचा विचार होता. पण नजीबखानास होळकराची अंत:स्थ मदत असल्यामुळें तो बचावला. पुढें राघोबानें पंजाबप्रांताकडे मोर्चा वळविला. तेव्हां तैमूरशहा घाबरून पळून गेला आणि अटकेपर्यंत सारा मुलूख मराठ्यांचे हस्तगत झाला.

यावेळीं मराठ्यांच्या उत्कर्षाचा कळस झाला. कृष्णाकांठचे घोडे अटक नदीचें पाणी प्याले. आणि अटकेवर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकला. या स्वारींत मराठ्यांचे लष्करास अपार लूट मिळून तें कुबेर बनलें. पण राघोबाच्या भोळेपणामुळें स्वत: पेशव्यांस मात्र काडीचाही लाभ न होतां उलट एक कोट रुपये कर्ज मात्र झालें. पुढें राघोबादादा सरहद्दीचा बंदोबस्त न करितांच पावसाळा लागण्यापूर्वीं महाराष्ट्राकडे परतला.

राघोबाला वाटेंत दत्ताजी शिंदे भेटला. त्यास त्यानें नजीबखानाचें पारिपत्य करण्याविषयीं विनवून सांगितलें. मागून शिंद्यास मल्हारराव होळकर भेटला. त्यानें सांगितलें कीं, "साऱ्या हिंदुस्थानांत एक नजीबखान खळी उरला आहे. त्यास अवश्य जतन करावें. तो एकदां नाहींसा झाला कीं पेशवे निर्भय होतील व त्यांस आपली पर्वा वाटेनाशी होईल!"

हा आत्मघातकी उपदेश दत्ताजी शिंद्यास पटला व त्यानें नजीबाशीं सख्य केलें. नजीबखानानें त्यास, तुम्ही अयोध्याप्रांतावर स्वारी करा, मी


एक महिन्यांत गंगेवर पूल बांधून देतों, अशा थापा दिल्या आणि आंतून अयोध्येच्या नबाबास शिंद्याच्या पारिपत्यास बोलाविलें. बऱ्याच दिवसांनीं नजीबाचा हा विश्वासघातकीपणा दत्ताजी शिंद्यास कळून आला, तेव्हां त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्यानें लगेच कुंजपुऱ्यापाशीं यमुना उतरून नजीबाचा दुआबांतील मुलूख घेतला आणि गंगा उतरून तो रोहिलखंडांत शिरला. नजीबखानाचा पुरता नाश करावा असा त्याचा बेत होता. पण इतक्यांत नजीबखानाच्या बोलावण्यावरून अहमदशहा अबदल्ली लाहोरास येऊन थडकला. यामुळें दत्ताजीस लवकर मागें परतावें लागलें.

मल्हाराव होळकर वेळेवर न पोंचल्यामुळें अबदल्लीशीं लढण्याचा सारा भार एकट्या शिंद्यांवर पडला. तरी त्यांनीं दोनचार झटापटींत अबदल्लीचा पराभव केला. तेव्हां तो नजीबखान रोहिल्याची मदत घेऊन दिल्लीवर आला. तेथें दत्ताजी सज्ज होताच. त्यानें अबदल्लीशीं निकराची लढाई केली. पण तींत स्वतः दत्ताजी पडला व जनकोजी जखमी झाला. यामुळें शिंद्यांचा पूर्ण मोड झाला. ही बातमी पुण्यास पोंचली तेव्हां अबदल्लीच्या पारिपत्यासाठीं दक्षिणेंतून मोठी फौज पाठविणें भाग पडलें.

## ३७. पानिपतचा घनघोर संग्राम.

शिंद्यांच्या पराभवाची बातमी आली तेव्हां स्वतः सदाशिवराव भाऊ अबदल्लीच्या पारिपत्यास निघाला. त्याबरोबर विश्वासरावही होता. पुढें शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे सरदारही त्यांस मिळाले. तेव्हां त्यांजपाशीं प्रचंड सेना जमली.

भाऊची सारी मदार गोविंदपंत बुंदेल्यावर होती. त्याचा मुलूख अयोध्याप्रांतास लागून होता. म्हणून अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला यास


कुंजपुरा
हरद्वार
पानिपत
हिसार
दिल्ली
अलीगड
मथुरा
जयपूर
भरतपूर
आग्रा
गंगा नदी
इटावा
चंबळा नदी
ग्वाल्हेर
लखनौ
यमुना नदी
अलाहाबाद
झांशी
बनारस

हरप्रयत्नानें अनुकूल करावें, अशी भाऊनें गोविंदपंतास पहिली कामगिरी सांगितली. पण ती त्याचे हातून पार पडली नाहीं. नजीबखानानें सुजाची भेट घेऊन त्याचें मन अबदल्लीकडे वळविलें.

मग भाऊनें आग्रयाजवळ यमुना उतरून अबदल्ली आणि सुजा व नजीब यांच्या मध्यें घुसून दोघांस दोहोंकडे बुडवावें असा डाव योजिला आणि गोविंदपंतास आपल्या राज्यांतील साऱ्या नावा यमुनेच्या दक्षिण अंगास तयार ठेवण्याची दुसरी कामगिरी सांगितली. तीही त्याचे हातून न झाल्यामुळें नजीब व सुजा यांस अबदल्लीस जाऊन मिळतां आलें.

नंतर भाऊनें मथुरा, दिल्ली व कुंजपुरा हीं यमुनेच्या दक्षिणेचीं ठाणीं घेतलीं आणि अबदल्लीस अंतर्वेदींत कोंडण्याचा घाट घातला. पण अबदल्ली सावध होऊन एकदम यमुना उतरून अलीकडे आला. तेव्हां भाऊ कुंजपुऱ्याहून पानपतावर उतरून त्यास आडवा झाला. अशाप्रकारें भाऊनें मोठ्या शिताफीनें दिल्ली व पानिपत येथील मराठ्यांच्या फौजांमध्यें अबदल्लीस कोंडून धरलें, तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें. पण लवकरच भाऊनें टाकलेला डाव त्यावरच उलटला. अंतर्वेदींतून अबदल्लीस दाणावैरण मिळूं न देण्याची व मराठ्यांस दाणावैरण पुरविण्याची फार महत्त्वाची कामगिरी भाऊनें एकट्या गोविंदपंतावर सोंपविली होती. पण ती त्याचे आंवाक्याबाहेर होती. ही कामगिरी पार न पडल्यामुळें अबदल्लीऐवजीं मराठ्यांसच पानपतास उपाशीं मरण्याचा प्रसंग आला! शेवटीं सर्व सरदार भाऊकडे येऊन म्हणाले, “भाऊसाहेब, आम्हांस रणांत मारावें, पण अन्नावांचून मारूं नये.” तेव्हां भाऊनें सैन्याचा गोल बांधून शत्रूची कोंडी फोडून दिल्लीकडे जाण्याचा निश्चय केला.

दुसरे दिवशीं पहाटे मराठ्यांची सेना सिद्ध झाली. पण गोल बांधून शत्रूची फळी फोडून जाण्याचा ठरलेला बेत सदाशिवराव भाऊनें आयत्या वेळीं बदलला आणि एकदम शत्रूवर हल्ला करण्याचें ठरविलें. उजवीकडे

शिंदे होळकर, मध्यें भाऊ व विश्वासराव आणि डावीकडे बाकीचे सरदार उभे राहिले. बुणगें पिछाडीस होतें आणि अघाडीस सर्वांपुढें इब्राहिमखान गारद्याचा तोफखाना होता. अशा व्यवस्थेनें भाऊनें शत्रूवर हल्ला चढविला.

सकाळपासून दुपारीं दोन वाजेतों घनघोर संग्राम झाला. आणि मराठ्यांचा विजय होऊन अबदल्लीचें सैन्य पळूं लागलें. पण स्वत: अबदल्ली चारहजार लोकांनिशीं मागें राहिला होता. त्यानें या पळणाऱ्या लोकांस मागें फिरविलें आणि त्यांसह आपलें सैन्य पुन्हां युद्धास पाठविलें. इतक्यांत दैवयोगानें विश्वासराव गोळी लागून घायाळ झाला. त्याबरोबर विंचूरकरांच्या पथकांतील पठाणांनीं मराठ्यांच्या बुणग्यांत पराजय झाल्याचा पुकारा केला व त्यामुळें एकाएकीं पळापळ सुरू झाली. विश्वासराव घायाळ झाल्याचें पाहतांच भाऊनें हत्तीवरून उतरून घोड्यावर बसून शत्रूवर निकराचा हल्ला केला. पण मागल्या लोकांनीं एकदां पळावयास सुरवात केली ती केलीच. शेवटीं भाऊ त्वेषानें शत्रूवर चाल करून गर्दीत मिसळला अबदल्लीच्या लोकांनीं मराठ्यांचा पाठलाग करून प्रेतांचे ढीग पाडल. मराठ्यांचें सर्व सामान शत्रूस मिळालें. कैद केलेल्या लोकांपैकीं बायकामुलांस गिलचांनीं गुलाम केलें आणि सर्व पुरुषांची क्रूरपणानें कत्तल उडविली. याप्रमाणें पानपतावर महाराष्ट्रांतील कर्त्या लोकांची एक पिढीच्या पिढी कापली गेली. मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, नानाफडणीस वगैरे मंडळी कशीबशी पळून आली.

सदाशिवराव भाऊ पानिपतास कोंडला गेला, हें वर्तमान ऐकून स्वत: बाळाजी बाजीराव त्यास सोडविण्यासाठीं निघाला होता. तो नर्मदा उतरून येतो तों त्यास पानपतच्या अनर्थाचें वर्तमान समजलें. “ दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहरा हरवल्या, रुपये व खुर्दा यांचा पत्ताच नाहीं ” अशी मोघम बातमी प्रथम आली आणि लवकरच सविस्तर

वर्तमान समजलें. बाळाजीनें आजवर अत्यंत परिश्रम करून उभारलेला मराठ्यांच्या साम्राज्याची भव्य इमारत पानिपतावर एकदम कोसळून पडली. यामुळें बाळाजीस एवढा धक्का बसला कीं, तो भाऊ ! भाऊ ! असें ओरडूं लागला व सहा महिन्यांचे आंतच वयाच्या केवळ ४१ व्या वर्षीं पर्वती येथें मरण पावला ( १७४० ). यावेळीं बाळाजीस दोन मुलगे होते. थोरला माधवराव सतरा वर्षांचा होता व धाकटा नारायण-राव सहा वर्षांचा होता.

---

# थोरले माधवराव पेशवे.

## ३८. राघोबादादाचा कारभार.

बाळाजी बाजीराव मरण पावल्यावर लवकरच माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. पण तो लहान असल्यामुळें राघोबादादा कारभार पाहूं लागला. यावेळीं मराठ्यांची सत्ता अगदीं संपुष्टांत आली होती. दिल्लीच्या दरबारांत त्यांचें वजन नव्हतें आणि शिंदे होळकर वगैरे सरदारांच्या जहागिरींशिवाय उत्तर हिंदुस्थानांतील सारा मुलूख त्यांच्या हातचा गेला होता. अशा स्थितींत मराठ्यांचा पाडाव करण्यास ही उत्तम संधि आहे असें पाहून निजामअल्लीही त्यांजवर चालून आला. निजामाचें सैन्य निघालें तें पुण्यापासून सात कोसांवर उरळी येथें येऊन पोंचलें. पण इतक्यांत चोहोंकडून मरा सैन्य जमा होऊन त्यांनीं निजामास कोंडून धरलें. तेव्हां त्यानें निरुपाय होऊन तहाचें बोलणें लाविलें. पण राघोबा-दादानें उलट निजामासच २७ लक्षांचा मुलूख देऊन त्याशीं तह केला !

राघोबाच्या अमलास लोक लवकरच कंटाळले. पुण्याचे दरबारांत दुफळी झाली आणि राघोबानें रागावून कारभार सोडला. आपण घरीं बसलों कीं कारभार अडेल, असें त्यास वाटत होतें. पण माधवरावाची आई गोपिकाबाई मोठी कर्तबगार होती. तिनें मोठ्या शहाणपणानें कारभार चालविला. तेव्हां राघोबा व त्याचा कारभारी सखारामबापू यांनीं कांहीं मराठे सरदारांस अनुकूल करून घेतलें आणि निजामाची मदत घेऊन राघोबा पुण्यावर चालून येऊं लागला. माधवरावाची फौज व राघोबाची फौज यांची लढाई जुंपली. पण माधवरावाची फौज फारच थोडी असल्यामुळें शेवटीं तो राघोबाच्या स्वाधीन झाला आणि पुन्हां राघोबाचे हातीं कारभार गेला. मग त्यानें गोपिकाबाई व माधवराव यांस नजर कैदेंत ठेविलें आणि त्यांच्या पक्षाकडील लोकांचे अधिकार व जहागिरी काढून घेऊन त्यांस शासन केलें.

राघोबाच्या त्रासानें अनेक मराठे सरदार निजामास मिळाले. साता-रची गादी मिळविण्याच्या आशेनें नागपूरचा जानोजी भोसलाही त्यास मिळाला आणि निजामाजवळ एक लक्ष फौज जमली ! तेव्हां त्यानें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, " भीमेच्या अलीकडील सारा मुलूख आम्हांस द्यावा. आणि आम्ही सांगूं तो कारभारी नेमून राज्यकारभार चालवावा ! "

यावेळीं निजामाशीं लढण्याची ताकद मराठ्यांत नव्हती. म्हणून त्यांनीं गनिमी कावा आरंभिला. मिरजेहून मराठ्यांचें सैन्य निघालें तें चौदाव्या दिवसास औरंगाबादेस पोंचलें व लगेच वऱ्हाडांत उतरलें. निजाम व भोसले वऱ्हाडांत येतात तों मराठे औरंगाबाद, सोलापूर, तुळजापूर यां-वरून बेदरास दाखल झाले व तीन टोळ्या करून त्यांनीं तेथून हैद्राबाद-पर्यंत सारा मुलूख बेचिराख केला. मराठ्यांस गांठणें अशक्य आहे असें जाणून निजामानेंही मराठ्यांच्या मुलखाची नासाडी उडविली.

आतां मात्र मराठे शहाणे झाले. त्यांनीं निजामाकडील मराठे सरदारांस फोडून घरीं बसविलें आणि मग एकट्या निजामास राक्षसभुवना- जवळ अचानक गांठून त्याचा पूर्ण पराभव केला. तेव्हां त्यानें एकंदर ८२॥ लक्षांचा मुलूख मराठ्यांस देऊन त्यांशीं तह केला.

या लढाईत माधवरावाचें शौर्य, दक्षता व चिकाटी हे गुण उत्तम दिसून आले व विशेषतः त्याच्याच कर्तबगारीमुळें पेशव्यांस जय मिळाला. ही लढाई झाल्यावर राघोबा स्व : बसला आणि माधवरावानें राज्यकार- भार स्वतः आपल्या हातीं घेतला.

---

## ३९ हैदरअल्लीवर स्वाऱ्या.

राज्यकारभार हातीं घेतांच सन १७६४ त माधवरावानें हैदरअल्लीवर स्वारी केली. हा हैदरअल्ली प्रथम म्हैसूर येथील हिंदू राजाच्या पदरीं शिपाई होता. तो वाढतां वाढतां सन १७६० त दिवाण झाला व पुढें एकदोन वर्षांतच त्यानें म्हैसूरची गादी बळकावली. हैदर हा मोठा शूर व कावेबाज होता. पानिपतास मराठ्यांचा पराभव होतांच त्यानें त्यांच्या कर्नाटकांतील मुलुखांत हातपाय पसरण्यास सुरवात केली. म्हणून माधव- रावानें निजामाला चीत केल्यावर लगेच हैदरावर पहिली स्वारी केली.

हैदराची तयारी कांहीं कमी नव्हती. तरी त्यानें उघड्या मैदानांत न लढतां तुंगभद्रेच्या कांठीं जंगलाच्या आश्रयानें राहून मराठ्यांवर छापे घालण्याचा बेत केला. पण माधवराव तुंगभद्रा उतरून दूर चित्र- दुर्गापर्यंत गेला. तें पाहून हैदर त्याचे पाठीवर मैदानांत उतरला. तेव्हां लगेच माधवरावानें मागें उलटून त्याचा पराभव केला. मग हैदर पुन्हां झाडींत लपला. पण माधवरावानें त्यास चोहोंकडून घेरलें. तेव्हां

त्यानें शरण येऊन तुंगभद्रेच्या उत्तरेकडील सारा मुलूख मराठ्यांस परत दिला आणि दरसाल ३२ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें.

पुढें हैदर या करारप्रमाणें खंडणी देईना. म्हणून माधवरावानें दुसरी स्वारी करून त्याचा पराभव केला. तेव्हां हैदरानें तह करून बाळाजी बाजीरावाचे वेळीं मराठ्यांकडे होता तो सारा मुलूख परत दिला आणि दरसाल ३३ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें.

पुढें सन १७६९ त हैदर पुन्हां गडबड करूं लागला म्हणून माधवरावानें त्यावर तिसरी स्वारी केली. याही वेळीं हैदरानें तुंगभद्रेच्या कांठीं झाडींत दडी दिली. तेव्हां माधवरावानें कांहीं सैन्य त्याच्या पाळतीवर ठेविलें आणि आपण स्वतः त्याच्या राज्याच्या पूर्वभागांत शिरून तो सारा उध्वस्त केला. मग पावसाळा लागल्यामुळें त्रिंबकराव मामा पेठे यांस तिकडे ठेवून माधवराव पुण्यास परत आला.

विजयादशमीच्या मुहुर्तानें माधवराव पुन्हां कर्नाटकाकडे निघाला. पण वाटेंत त्याची प्रकृति फार बिघडल्यामुळें त्यास परतावें लागलें. तिकडे त्रिंबकराव मामानें श्रीरंगपट्टणापासून पांच कोसांवर हैदरास मोठ्या शिताफीनें कोंडून धरलें. हैदरानें झाडींतून निसटून जाण्याचा प्रयत्न केला. पण मराठ्यांनीं त्यावर हल्ला करून त्याचा पूर्ण पराभव केला. स्वतः हैदर जवळच्या डोंगराकडे पळून गेला. आणि त्याचा मुलगा टिपू फकिराच्या वेषानें निसटला. पण हैदराचें सर्व सामान मराठ्यांचे हातीं सांपडलें. या लढाईस मोतीतलावाची लढाई असें म्हणतात.

त्रिंबकराव मामानें यानंतर आणखी एक वर्ष तिकडेच राहून हैदराचा बहुतेक मुलुख जिंकला. पण माधवरावाचें दुखणें असाध्य झाल्याचीं पत्रें आलीं तेव्हां मामानें हैदराशीं तह केला. त्याअन्वयें शिवाजीनें कर्नाटकांत जेवढें स्वराज्य स्थापिलें होतें तेवढें सर्व मराठ्यांस परत मिळालें व ५० लक्ष रुपये खंडणी मिळाली.

# ४०. पानिपतचा सूड.

पानिपत येथें मराठ्यांचा जो संहार उडाला व त्यानंतर त्यांच्या मुलु-खावर पठाण, रोहिले, जाठ व रजपूत यांनीं जी झडप घातली, तिजबद्दल त्यांचा सूड उगवावा आणि पुन्हां तिकडे साम्राज्याचा विस्तार करावा, अशी माधवरावाची मोठी महत्त्वाकांक्षा होती. त्याप्रमाणें त्यानें सन १७६६ त राघोबादादास तिकडे पाठविलें. पण मल्हारराव होळकर वार-ल्यामुळें तो विशेष कामगिरी न करतांच परत आला. पुढें राघोबानें अर्धे राज्य मला पाहिजे असें म्हणून मोठा बखेडा केला. आणि युद्धापर्यंत पाळी आणिली. पण माधवरावानें त्यास पकडून नजर कैदेंत ठेविलें आणि अशाप्रकारें स्वस्थता झाल्यावर पुन्हां सन १७६९ त विसाजी कृष्ण बिनी-वाले यास उत्तर हिंदुस्थानांत पाठविलें. होळकराचे गादीवर साध्वी अहल्या-बाई होती. तिचा कारभारी तुकोजी होळकर व राणोजी शिंद्याचा पुत्र महादजी शिंदे हेही त्याबरोबर होते.

या फौजेनें बुंदेलखंडाचा बंदोबस्त केला, जाठांचा पराभव करून त्यां-पासून ६५ लक्ष रुपये खंडणी घेतली आणि मग पुढील वर्षी पानिपत येथील आपल्या शत्रूंकडे मोर्चा वळविला. दुआबांतील मराठ्यांचा बराच मुलूख नजीबखान रोहिल्यानें लाटला होता. तो त्यानें मराठे येतांच त्यांचे हवालीं केला. मग मराठ्यांनीं दुआबांतील पठाण सरदार अहमदखान बंगष याचा पराभव करून त्यानें मराठ्यांचा जो मुलूख बळकावला होता तो परत घेतला ( १७७१ ). याच वर्षी मराठ्यांनीं शहाअलम बादशहास दिल्लीस आणून तख्तावर बसविलें. तेव्हां बादशहानें मराठ्यांशीं पुढीलप्रमाणें करार केला. "पानिपतच्या युद्धापूर्वी मराठ्यांकडे जितका मुलूख होता तितका त्यांजकडे राहावा. चौथाईची तुंबलेली सारी बाकी मराठ्यांस मिळावी. मराठ्यांनीं बादशहाच्या शत्रूंचें पारिपत्य करावें आणि यापुढें दोघांनीं मिळून

मोहिमा करून होईल ती मिळकत सारखी वांटून घ्यावी. " याप्रमाणें करार करून घेऊन मराठ्यांनीं दिल्लीची बादशाही आपल्या मुठींत आणिली.

आतां पानिपतच्या शत्रूंपैकीं प्रमुख असे रोहिले उरले होते. त्यांच्या पारिपत्यास विसाजीपंत निघाला आणि त्यानें गंगा ओलांडून सारें रोहिलखंड पादाक्रांत केलें. रोहिले लोकांनीं पानिपत येथें मिळविलेली अपार लूट फत्तेगडावर सांठविली होती. ती सारी आतां मराठ्यांचे हातीं लागली. रोहिले लोक मोठे कडवे व शूर होते. पण यावेळीं त्यांस मराठ्यांचा इतका वचक वसला कीं, मराठे स्वार दृष्टीस पडतांच ते आपली छावणी सोडून पळूं लागत ! शेवटीं सारे रोहिले सरदार हिमालयांतील तराईच्या जंगलांत पळून गेले.

याप्रमाणें मराठ्यांनीं अल्पकाळांत पानिपतचा सूड उगवून उत्तर हिंदुस्थानांत पूर्वींप्रमाणें आपला अमल बसविला. पण इतक्यांत माधवरावाचें दुखणें विकोपास गेल्यामुळें त्यानें विसाजीपंतास त्वरेनें परत बोलाविलें.


---

## ४१. माधवरावाचा मृत्यु.

माधवराव मोठा शूर, कारस्थानी, दीर्घोद्योगी व न्यायी होता. किंबहुना यापूर्वीं झालेल्या तिन्ही पेशव्यांपेक्षांही तो कांकणभर सरस होता. पण तो शरीरानें अशक्त होता आणि तशांत त्यावर वयाच्या केवळ १७ व्या वर्षापासून कामाचा प्रचंड भार पडला. यामुळें उत्तरोत्तर त्याची प्रकृति क्षीण होऊन त्यास क्षयाची बाधा झाली.

माधवराव मोठा धर्मनिष्ठ होता. थेऊर येथील गणपति हें त्याचें आराध्य दैवत होतें. तो विशेष आजारी पडल्यापासून तेथेंच राहात असे. आपला अंतकाळ जवळ आला असें जाणून त्यानें राघोबास थेऊर येथें नेऊन सात लक्षांची जहागीर देऊन संतुष्ट केलें. आणि याउपर स्वस्थ बस-

नं.........
ता.....



श्रीमंत थोरले माधवराव पेशवे.

ण्याचें त्यापासून वचन घेतलें. तसेंच माधवरावानें प्रख्यात मुत्सद्दी सखाराममबापू यास कारभारी नेमिलें. माधवरावास मूलबाळ नव्हतेंच. त्याच्या मागून त्याचा भाऊ नारायणराव यास पेशवाई मिळावयाची होती. पण नारायणराव अजून लहान, केवळ सतरा वर्षांचा होता. तेव्हां त्यास त्रास पोचूं नये म्हणून माधवरावानें वरील व्यवस्था केली आणि मग गजानन, गजानन, असें म्हणत शांत चित्तानें इहलोकची यात्रा संपविली (१७७२). माधवरावाची स्त्री रमाबाई मोठी साध्वी होती. ती पूर्वसंकल्पाप्रमाणें सती गेली. सती जातांना तिनें नारायणरावाचा हात राघोबाच्या हातीं देऊन वडिलांप्रमाणें सर्वांचें चालवावें, असा बोध केला व नंतर शांत चित्तानें अग्नींत प्रवेश केला.

माधवराव मोठा पाणीदार असून करडा होता. यामुळें तो वयानें लहान असतांही दरबारचे मंडळीस त्याचा मोठा दरारा वाटे. त्याची दक्षताही मोठी होती. तो निरनिराळ्या खात्यांचे हिशेब अचानक तपाशी व कांहीं अफरातफर आढळल्यास कडक शासन करी. यामुळें कामें फार चोख रीतीनें चालत.

माधवराव मोठा न्यायी होता. न्यायाचे कामांत तो कोणाचीही भीडमुरवत ठेवीत नसे. त्यावेळीं सरकारी अधिकारी सरकारी सामान नेण्याआणण्यासाठीं लोकांस सक्तीनें वेठीस धरीत व त्यांस रोजमुरा देत नसत. पण माधवरावास ही चाल अन्यायाची वाटून त्यानें सक्त हुकूम सोडून ती बंद केली.

पानिपतच्या घोर अनर्थामुळें मराठ्यांचे राज्यावर केवळ आकाशच फाटलें होतें. पण माधवरावानें आपल्या अलौकिक चातुर्यानें, अद्वितीय पराक्रमानें आणि अविश्रांत परिश्रमानें केवळ दहाच वर्षांत तें उत्तम प्रकारें सांवरलें आणि लवकरच तो साऱ्या हिंदुस्थानांत मराठ्यांचें एकछत्री साम्राज्य स्थापण्याची आपल्या पित्याची इच्छा पूर्ण करील असें दिसूं

लागलें. पण महाराष्ट्राच्या दुर्दैवानें त्याजवर अकालीं मृत्यूचा घाला पडला. आणि त्याचे बरोबरच महाराष्ट्राचा भाग्यरविही मावळला.

---

# नारायणराव पेशवे.

## ४२. नारायणरावाचा खून. ( १७७३ ).

माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं, तेव्हां तो अल्लड पोर होता. त्याचे अंगीं भारदस्तपणा मुळींच आला नव्हता. यामुळें दरबारांत तोंडपुज्या हलक्या लोकांचें प्रस्थ माजलें. व सखाराम-बापूसारखे कर्ते मुत्सद्दी उदासीन झाले. राघोबा व त्याची बायको आनंदीबाई यांनीं फंदफितुरी आरंभिल्याच्या संशयावरून नारायणरावानें त्यांस कैद केलें आणि पुण्यांत ब्राह्मण व परभू यांमध्यें पडलेल्या ग्राम-ण्याचा निकाल पूर्वीच्या वहिवाटीस सोडून परभूंच्या विरुद्ध दिला. यामुळें ते लोकही त्याच्याविरुद्ध कारस्थानें करूं लागले.

या कारस्थानी मंडळीनें पेशव्यांकडील सुमेरसिंग वगैरे गारद्यांस पांच लक्ष रुपये देऊं केले आणि "नारायणरावास धरावें" असा राघोबादादानें-ही त्यांस लेखी हुकूम दिला. पण राघोबाची बायको आनंदीबाई मोठी महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री होती. तिनें गुप्तपणें त्या हुकुमांतील 'ध' चा 'मा' केला आणि " नारायणरावास मारावें " असा हुकूम गारद्यांस मिळाला ! शिवाय, तिनें नारायणरावास मारण्याविषयीं गारद्यांकडून बेल-भंडार उचलून घेतला आणि या कामगिरीबद्दल पुरंदर, नगर व साष्टी हे तीन किल्ले बक्षीस देण्याचें वचन दिलें !

नारायणराव सकाळीं पर्वतीच्या दर्शनास गेला असतां त्यास गारद्यांच्या गडबडीची कांहीं कुणकूण लागली. म्हणून त्यानें हरीपंत फडक्यास

वाड्यांत जाऊन तपास करावयास सांगितलें. पण फडक्यास त्याचें तितकें महत्त्व वाटलें नाहीं. त्यानें संध्याकाळीं तपास करण्याचें ठरविलें! होणाराप्रमाणें बुद्धि होते म्हणतात ती अशीच.

दुपारी सुमेरसिंग, खरकसिंग आणि महमद यूसफ असे तिघे गारदी नारायणरावापाशीं पगार मागावयाच्या निमित्तानें येऊन दंगा करू लागले. एक कारकून जवळच होता. तो म्हणाला, "असा दंगा करून ऐवज मिळतो कीं काय?" हें ऐकतांच गारद्यांनीं तरवारी उपसून त्यास ठार केलें. इतक्यांत सोप्यांतील दोन गाई बुझल्या व गारद्यांच्या अंगावर आल्या. त्यांसही त्यांनीं ठार मारिलें. मग नारायणराव पळूं लागला व गारदी त्याच्या मागें लागले. वाटेंत त्यांस एक कुणबीण आडवी आली, तिलाही त्यांनीं कंठस्नान घातलें. इतक्यांत नारायणराव राघोबादादास जाऊन बिलगला व 'काका मला मारूं नका' असें केविलवाणीनें म्हणूं लागला. गारदी त्याच्या मागोमाग आलेच. त्यांस राघोबा म्हणाला, 'यास मारूं नका.' तेव्हां गारदी म्हणाले, "सर्पास दुखवून कोणी सोडील काय? मुकाट्यानें तुम्हीं यांस सोडा. नाहीं तर दोघेही मराल." इतकें बोलून गारद्यांनीं वार केला. त्यानें राघोबाच्या कपाळास व हातास जखम झाली. तेव्हां त्यानें नारायणरावास सोडलें. नारायणराव पळूं लागला. पण आनंदीबाईचा खिजमतगार तुळ्या पवार यानें त्याचा पाय ओढून त्यास खालीं पाडलें. तोंच पेशव्याचा हुजऱ्या चाफाजी टिळेकर आपल्या धन्यास वांचविण्यासाठीं त्याचे अंगावर पडला. पण गारद्यांनीं त्या दोघांसही एकदमच ठार मारिलें! अशा प्रकारें राघोबादादानें आणि दुष्ट आनंदीबाईनें राज्यलोभानें आपल्या पुतण्याचा घात केला.

# सवाई माधवराव पेशवे.

## ४३. बारभाईचें कारस्थान.

राघोबादादानें पुतण्याचा खून करून पेशवाई मिळविल्यामुळें महाराष्ट्रांतील साऱ्या कर्त्या लोकांस त्याचा राग आला. आणि सखारामबापू, नाना फडनीस वगैरे मुत्सद्यांनीं राघोबास पेशवाई पचूं द्यावयाची नाहीं, असा निश्चय केला. या कटांत बारा मुत्सद्दी प्रमुख होते. म्हणून यास 'बारभाईचें कारस्थान' असें म्हणतात.

पुण्यांत बखेडा माजला असें पाहतांच पेशव्यांच्या सर्व शत्रूंनीं उचल केली. या शत्रूंमध्यें निजाम व हैदरअल्ली हे प्रमुख होते. म्हणून राघोबानें निजामावर स्वारी करून त्यास बेदर येथें कोंडून तह करावयास भाग पाडिलें आणि मग आपला मोर्चा हैदराकडे वळविला. राघोबा स्वारीस निघाल्यावर लवकरच सखारामबापू, नाना फडनीस, हरीपंत फडके, वगैरे मुत्सद्दी कांहीं तरी निमित्त काढून पुण्यास परत आले. आणि आतां राघोबा दूर गेला आहे अशी संधि साधून त्यांनीं आपलें कारस्थान सिद्धीस नेलें. त्यांनीं नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती तीस पुरंदरावर बंदोबस्तानें ठेविलें. सातारचे राजाकडून राघोबास पदच्युत करवून गंगाबाईच्या नांवानें पेशवाईचीं वस्त्रें आणिलीं. बापू व नाना यांची कारभाऱ्याचे जागीं नेमणूक करून घेतली. अनेक सरदारांस अनुकूल केलें आणि बरीच नवी फौज जमविली.

पुण्याकडील ही बातमी राघोबास कळतांच त्यानें कृष्णेच्या खालचा सारा मुलूख हैदरअल्लीस देऊन त्याशीं दोस्ती केली. आणि तो पुण्यावर चालून येऊं लागला. इतक्यांत इकडून त्रिंबकराव मामा पेठे त्यास अडविण्यास

गेला. तेव्हां राघोबा उत्तरेकडे पळूं लागला व हरीपंत फडके त्याचा पाठलाग करूं लागला.

इकडे पुरंदरावर गंगाबाई बाळंत होऊन तीस पुत्र झाला. तेव्हां साऱ्या महाराष्ट्रांत मोठा आनंदोत्सव झाला आणि राघोबाची पूर्ण निराशा झाली. नारायणरावाच्या या मुलाचें नांव माधवराव असें ठेविलें होतें. पण लोक कौतुकानें त्यास ‘ सवाई माधवराव ’ असें म्हणूं लागले. पुढें सवाई माधवराव ४० दिवसांचा झाला तोंच त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

राघोबा पळाला तो ब्ऱ्हाणपुराकडे गेला आणि तिकडून नर्मदा उतरून माळव्यांत शिरला. हरीपंत त्याचे पाठीवर होताच. पण शिंद्यानें राघोबाची समजूत करून त्यास घेऊन येण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें राघोबा शिंदेहोळकरांबरोबर खानदेशापर्यंत आला. पण तेथून झुकांडी देऊन पळाला, तो धार, उज्जनी, इकडे जाऊन तिकडून गुजराथेंत उतरला. हरीपंत फडक्याचा ससेमिरा त्याचे मागें होताच. त्यानें राघोबास महीनदीवर गांठून त्याचा पराभव केला. पण राघोबा तेथून निसटला आणि सुरतेस इंग्लिशांच्या आश्रयास गेला.

---

## ४४. इंग्लिशांबरोबर लढाई.

यूरोपांतून हिंदुस्थानांत आलेल्या लोकांपैकी पोर्तुगीझ व फ्रेंच यांची सत्ता आतां संपुष्टांत आली होती. तिसरे इंग्रज. त्यांची मात्र वाढती कमान होती. कलकत्ता, मद्रास व मुंबई हीं त्यांचीं तीन मुख्य ठाणीं होतीं. यांपैकीं पहिल्या दोहोंकडे त्यांनीं पुष्कळ मुलूख मिळविला होता. पण मराठ्यांचें राज्य प्रबळ असल्यामुळें मुंबईकडे मात्र त्यांचा लाग आजवर साधला नव्हता. आतां पेशव्यांचे घराण्यांत यादवी होऊन राघोबादादा

यांचे आश्रयास गेला. तेव्हां ही संधि बरी आहे असें पाहून, त्यांनीं रावोबास पुण्यास नेऊन पेशवा करण्याचें ठरविलें, व या मदतीबद्दल इंग्लिशांस साष्टी, वसई वगैरे सवाएकोणीस लक्षांचा मुलूख देण्याचें रावोबानें कबूल केलें (१७७५).

इंग्लिशांचें सैन्य रावोबास घेऊन खंबायतेहून निघालें व त्यावर हरीपंत फडके हल्ले करूं लागला. पण कलकत्त्याचे गव्हर्नर जनरलास मराठ्यांशीं युद्ध करणें पसंत नव्हतें. म्हणून त्यानें युद्ध बंद करण्याविषयीं मुंबई सरकारास हुकूम केला आणि पेशव्यांशीं पुरंदर येथें तह केला. त्यांत ठरलें कीं, "इंग्लिशांनीं रावोबास मदत करूं नये व रावोबानें दरमहा २५ हजार रुपये घेऊन कोपरगांवीं स्वस्थ बसावें."

हा तह ठरला खरा पण पुढें पेशव्यांचे दरबारांत दुफळी झाली असें पाहून इंग्लिशांनीं रावोबाचा पक्ष घेऊन पुण्यावर फौज पाठविली (१७७८). तिजबरोबर बोरघाटाखालीं झालेल्या चकमकींत इंग्लिशांकडील प्रसिद्ध योद्धा कॅप्टन स्टुअर्ट हा पडला. यास मराठे 'इस्टुर फांकडा' असें म्हणत. पुढें इंग्लिश तळेगांवापर्यंत आले. पण तेथें मराठ्यांनीं त्यांस घेरलें आणि त्यांची रसद तोडली. तेव्हां इंग्लिश मागें फिरून वडगांवास गेले. त्या ठिकाणीं मराठ्यांनीं त्यांवर हल्ला करून त्यांची फार खराबी केली व राहिलेल्या फौजेस कोंडून धरलें. तेव्हां इंग्लिशांनीं निरुपाय होऊन मराठ्यांशीं तह केला. त्यांत ठरलें कीं, "इंग्लिशांनीं घेतलेला साष्टीसुद्धां सारा मुलूख परत द्यावा, रावोबास हवालीं करावें, आणि कलकत्त्याहून येत असलेल्या फौजेस परत पाठवावें."

असा तह करून इंग्लिशांनीं आपली सुटका करून घेतली तरी कलकत्त्याहून फौज येत होती ती परत न जातां गुजराथेंत आली आणि पुन्हां लढाई सुरू झाली. सन १७८० त इंग्लिशांनीं वसई घेतली आणि पुण्यावर स्वारी करण्यास फौज पाठविली. या फौजेचीही मराठ्यांनीं पूर्वी-

प्रमाणेंच रसद तोडली आणि ती परत जात असतां हल्ले करून तिची फार नासाडी उडविली. यानंतर सन १७८३ त सालपें येथें तिसरा तह झाला. त्यांतील मुख्य कलमें अशीं:—इंग्लिशांनीं मराठ्यांचा साष्टीखेरीज सारा मुलूख परत द्यावा. राघोबास पेशव्यांकडे पाठवावें. आणि यापुढें इंग्लिश व पेशवे यांनीं परस्परांचे शत्रूंशीं सख्य करूं नये.

हा तह ठरल्यावर मात्र राघोबा निराश होऊन कोपरगांव येथें येऊन राहिला. पण तो पुढें ११ महिन्यांनींच मरण पावला.

## ४५. नाना आणि महादजी.

नारायणरावाच्या खुनानंतर मराठ्यांची घडी अगदींच विसकटली होती. ती दोन पुरुषांच्या कर्तबगारीनें पुन्हां बसली. हे दोन पुरुष म्हणजे नानाफडणीस आणि महादजी शिंदे.

१ भानू आणि भट या घराण्यांचा ऋणानुबंध कांहीं विलक्षण होता. पेशवाईच्या प्रारंभीं बाळाजी महादेव भानूनें दिल्लीस आपले प्राण खर्चीं घालून बाळाजी विश्वनाथाचे प्राण वांचविले होते. त्याच बाळाजी महादेवाचा, बाळाजी जनार्दन ऊर्फ नानाफडणीस हा नातू होय. यानें पेशवाईच्या पडत्या काळांत तीस आधार देऊन तिचें आयुष्य वाढविलें. नानाफडणीस हा थोरले माधवरावाचे कारकीर्दींत उदयास येऊन फडणीस झाला. पुढें बारभाईच्या कारस्थानांत तो प्रमुख होता आणि त्यानंतर सवाई माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यावर तो मुख्य कारभारी होऊन राज्याचीं सारीं सूत्रें त्याचे हातीं आलीं.

नानाफडणीस हा अत्यंत बुद्धिमान् व मोठा कर्तबगार मुत्सद्दी होता. त्याची टापटीप, नियमितपणा व कामाची व्यवस्था वाखाणण्याजोगी होती. आणि सर्व ठिकाणच्या गुप्त बातम्या काढण्यांत तर त्याचा हातखंडा असे.

यावेळीं राघोबाची गडबड सुरू होती, खुद्द पुण्याचे दरबारांत दुफळी होती, शिंदे, होळकर शिरजोर होऊं पहात होते आणि निजाम, हैदर वगैरे शत्रु तर टपून बसले होते. अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींतही नानानें आपल्या शहाणपणानें राज्याच उत्तमप्रकारें संरक्षण केलें.

२ महादजी शिंदा हा राणोजी शिंद्याचा मुलगा. यास पाटीलबावा असें म्हणत. पानिपतच्या युद्धानंतर लवकरच यास शिंद्यांची जहागीर मिळाली. हा मोठा शूर व हुशार असून याचें भाषण फार मोहक असे. याच्याच कर्तबगारीनें वडगांवच्या लढाईंत मराठ्यांस यश आलें. आणि सालप्याचा तहही याच्याच मध्यस्थीनें झाला. पुढें महादजीनें दिल्लीस जाऊन तेथील बादशाही आपल्या मुठींत आणिली. बादशहा दरमहा ६५ हजार रुपये खर्चास घेऊन स्वस्थ बसला आणि त्यानें आपली फौज व राज्य महादजीच्या हवालीं केलें! मग महादजीनें मुसलमानांचीं बंडें मोडलीं आणि रजपुतांसही शरण आणिलें.

पुण्याच्या दरबारचीं सारीं सूत्रें नानाच्या हातांत होतीं. यामुळें महादजीस वैषम्य वाटे. पुण्याचा सर्व कारभार आपल्या तंत्रानें चालावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून तो आठदहा वर्षें दिल्लीचा कारभार केल्यानंतर पुण्यास आला. लवकरच त्यानें आपल्या मोहक भाषणानें सवाईमाधवरावाचें मन आपल्याकडे आकर्षिलें आणि आपणास कारभार द्यावा म्हणून त्याजपाशीं एकांतीं गोष्ट काढिली. पण सवाईमाधवराव शहाणा होता. तो म्हणाला, "नाना व तुम्ही हे माझे दोन हात. यांतील कोणताही एक तुटला तरी मी लंगडा होणार. यास्तव, आहे अशीच व्यवस्था चालावी हें उत्तम."

यानंतर महादजीनें कारभारी होण्याची इच्छा सोडली. आणि नाना व महादजी यांचें पूर्ण ऐक्य होऊन लवकरच मराठ्यांची सत्ता जोरावेल असें दिसूं लागलें. पण दुर्दैवानें थोड्याच दिवसांत महादजी शिंदे मरण पावला ( १७९४ ).



नाना फडणीस.



महादजी शिंदे ऊर्फ पाटील बाबा.

नं...............

ता.........



श्री. सवाइ माधवराव पेशवे.



टिपू सुलतान.

## ४६. मराठ्यांच्या सामर्थ्याचें अखेरचें प्रदर्शन.

सवाई माधवरावाचे कारकीर्दीत मराठ्यांस म्हैसूरकरांशीं तीनदां लढावें लागलें. पहिली लढाई हैदराबरोबर झाली. पुढें हैदर वारला आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान गादीवर बसला. तो फार गर्विष्ठ, क्रूर व हिंदू धर्माचा द्वेष्टा होता. त्यावर निजाम व मराठे यांनीं मिळून स्वारी केली आणि त्यानंतर सन १७९० तें ९२ मध्यें मराठे, निजाम व इंग्रज यांनीं मिळून टिपूवर स्वारी केली. या स्वारींत टिपूनें इंग्लिशांच्या सेनेसभोंवतालचा प्रदेश बेचिराख केल्यामुळें दाणावैरणीचा तुटवडा पडून तिचे हाल होऊं लागले. अशा प्रसंगीं मराठ्यांनीं तीस रसद पोंचविण्याची मोठी कामगिरी केली. शेवटीं टिपूनें आपलें अर्धे राज्य व तीन कोट रुपये खंडणी देऊन तह केला. तेव्हां मराठ्यांस तुंगभद्रा व कृष्णा यांमधील मुलूख व एक कोट रुपये खंडणी मिळाली.

पण मराठ्यांच्या एकजुटीचें व सामर्थ्याचें खरें प्रदर्शन दुसऱ्याच एका प्रसंगीं झालें. तो प्रसंग म्हणजे निजामाबरोबर झालेली खर्ड्याची लढाई हा होय.

निजामाकडे मराठ्यांची फार बाकी तुंबली होती, पण महादजी शिंदे व हरीपंत फडके वारल्यामुळें निजाम मराठ्यांस मोजीत नव्हता. पेशव्यांचा वकील गोविंदपंत काळे यानें दोन कोटी सात लक्ष बाकीची याद सादर केली. तेव्हां निजामाचा वजीर मशीर उल्मुल्क आढ्यतेनें म्हणाला, " हा हिशेब समजून देण्यास तुमच्या नानास येथें आणावें लागेल. " यावर काळे म्हणाला, " नानांस उद्योग आहेत, ते सोडून ते कसे येतील?" तेव्हां मशीर आवेशानें बोलला, " ते कसे येतील ? पहा लवकरच त्यांस येथें आणितों कीं नाहीं तें ! " दुसऱ्या एका प्रसंगीं मशीर भरदरबारांत म्हणाला, " पेशव्यांस लंगोटी नेसवून हातीं भोपळा देऊन काशीस पाट-

विल्याखेरीज आतां आम्ही राहात नाहीं. " शेवटीं, या तुमच्या उद्दाम वजिरास धरून नेऊन पुण्यांत दारोदार फिरवूं, असें निजामास बजावून काळे पुण्यास निघून आला.

पेशव्यांच्या अपमानाची ही वार्ता ऐकतांच नानानें निजामावर स्वारी करण्याचा निश्चय केला. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, प्रतिनिधि वगैरे सारे मराठे सरदार खवळून एकत्र झाले. शिंद्याचा प्रख्यात सेनापति जिवबादादा बक्षी हाही घेऊन दाखल झाला आणि एकंदर दीड लक्ष फौज जमली !

निजामाचीही जय्यत तयारी होती. त्यानें खर्ड्याजवळ मराठ्यांवर हल्ला केला. पण त्यांत त्याचाच पराभव होऊन त्यास मागें हटावें लागलें. रात्रीं मराठ्यांचा छापा आल्याची खोटीच हूल उठली तेव्हां निजामाचें सैन्य घाबरून आपलाच खजिना लुटून पळूं लागलें ! मराठे आसपास घिरट्या घालीत होतेच. त्यांनीं या पळणाऱ्या लोकांस पकडून त्यांजवळचा सारा ऐवज हिरावून घेतला. मग निजाम घाबरून राहिलेल्या सैन्यासह खर्ड्याच्या गढींत शिरला. पण मराठ्यांनीं त्यास घेरून जेरीस आणिलें. तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें. मराठ्यांनीं उत्तर दिलें, "आधीं मशीर उल्मुल्कास स्वाधीन करा. मग तहाचें बोलणें." निजामानें निरुपाय होऊन मशीरास मराठ्यांचे हवालीं केलें आणि परिंड्यापासून तापीपर्यंत सारा मुलूख व तीन कोट रुपये खंडणी देऊन आपली सुटका करून घेतली.

या खर्ड्याच्या लढाईत सर्व मराठे सरदार पेशव्यांच्या निशाणाखालीं एकजुटीनें लढले. पण हें त्यांच्या सामर्थ्याचें अखेरचेंच मोठें प्रदर्शन होतें. यापुढें त्यांची अशी जूट पुन्हां कधींही झाली नाहीं व त्यामुळें लवकरच त्यांचें राज्य नामशेष झालें.

# ४७. सवाई माधवरावाचा मृत्यु.

( १७९५ )

सवाई माधवराव मोठा भाग्यशाली होता. तो चाळीस दिवसांचा झाला तोंच त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं होतीं आणि नाना फडनिसा-सारखा अत्यंत कर्तबगार कारभारी लाभल्यामुळें त्याच्या राज्याची व वैभवाची सारखी वृद्धि होत गेली.

सवाई माधवराव पांच वर्षांचा होईतों पुरंदरावर राहात असे. पुढें तो पुणें येथें शनवारचे वाड्यांत राहूं लागला. पांचव्या वर्षीं त्याची मुंज झाली आणि पुढें ३ वर्षांनीं लग्न झालें. या समारंभांइतके थाटाचे समा-रंभ महाराष्ट्रांत मागें किंवा पुढें कधींही झाले नाहींत.

माधवरावाच्या थोर पदास उचित असें त्यास शिक्षण देण्याची नानानें व्यवस्था केली. दांडपट्टा खेळणें, निशाण मारणें, घोड्यावर बसणें, हत्ती चालविणें वगैरे कला तो शिकला आणि नित्य नेमानें तालीम करून त्यानें शरीरही कमाविलें. नानानें त्याच्या बौद्धिक शिक्षणाचीही उत्तम व्यवस्था केली. फार चतुर व नेकीचीं माणसें त्याच्या सहवासास ठेविलीं. आणि त्यास वाचनाची गोडी लागावी म्हणून भारत व भागवत यांच्या बखरी व 'सारिकाशतक' नांवाचा मनोरंजक गोष्टींचा ग्रंथ नवीन तयार करविला. माधवराव मोठा होऊं लागला तसतसा त्यास नित्य नेमानें दरबारांत बसवून राज्यकारभाराची माहिती देण्यासही नानानें सुरवात केली. सारांश, शिक्षणाची इतकी उत्तम व्यवस्था क्वचितच कोणा राजपुत्राची झाली असेल.

यावेळीं राज्याचें वैभवही कळसास पोंचलें होतें. शिंदे, होळकर भोसले वगैरे सारे मराठे सरदार नानाच्या कह्यांत होते. राघोबाचा शेवट होऊन इंग्रज स्वस्थ बसले होते. आणि टिपू व निजाम हेही जेरीस आले होते. सारांश, राज्याला अंतस्थ किंवा बाहेरचा कोणीच शत्रु राहिला नव्हता आणि सवाई माधवराव लवकरच राज्यकारभार हातीं घेऊन राज्याची अभिवृद्धि करील असें वाटूं लागलें होतें. पण दैवयोग कांहीं विचित्र होता.

राघोबाचा मुलगा बाजीराव हा माधवरावाच्याच वयाचा होता. तो मोठा देखणा असून फार गोडबोल्या होता. खर्ड्याच्या लढाईवर जातांना नानानें त्यास शिवनेरी किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें होतें. त्यानें आतां गुप्तपणें पेशव्याशीं पत्रव्यवहार सुरू केला आणि त्याच्या कोवळ्या मनावर मोहिनी टाकिली. बाजीराव केव्हां दगा करील याचा नेम नाहीं, असें नानास वाटत होतें. म्हणून त्यानें बाजीरावाशीं पत्रव्यवहार केल्याबद्दल माधवरावास फार दोष दिला. पण त्यामुळें माधवरावाचें मन उदास झालें.

पुढें कांहीं दिवसांनीं माधवरावास ताप येऊन वाताचा विकार झाला. दसऱ्याचे दिवशीं शिलंगणास जातांना त्यानें वाताच्या लहरींत हत्तीवरून उडी टाकण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यास लवकर वाड्यात आणलें. पण होणारें कधीं चुकत नाहीं म्हणतात, तसें झालें आणि आश्विन शुद्ध द्वादशीचे दिवशीं माधवरावानें वाताच्या लहरींत वाड्याच्या खिडकींतून खालीं चौकांतील कारंजावर उडी टाकली! तेणेंकरून त्यास मोठी दुखापत होऊन पौर्णिमेच्या दिवशीं तो मरण पावला ( १७९५ ).

# धाकटे बाजीराव पेशवे.

## ४८. मराठ्यांचें राज्य डळमळूं लागलें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनें साऱ्या महाराष्ट्रांत हाहाकार उडाला. नाना फडनिसास तर अनिवार दुःख झालें. राघोबाच्या संततीकडे पेशवाई जाऊं नये असें अजूनही त्याचें मत होतें. पण शिंदे वगैरे कांहीं सरदार बाजीरावास अनुकूल आहेत असें पाहून, तंटाबखेडा न वाढावा म्हणून त्यानें मोठ्या शहाणपणानें आपण स्वतःच बाजीरावास पेशवेपदावर बसविलें ( १७९६ ).

पण याच्यायोगानें तंटेबखेडे चुकले नाहींत. बाजीरावानें शिंद्याकडून विश्वासघातानें नानास कैद करविलें आणि शिंद्याचा कारभारी, त्याचा सासरा सर्जेराव घाटगे, यानें नानाच्या पक्षाकडील लोकांचा अनिवार छळ केला. पुढें बाजीरावानें शिंद्यासही पकडण्याचा प्रयत्न केला! तेव्हां शिंद्यानें नानाची मुक्तता केली व पुढें नाना कारभार पाहूं लागला. पण म्हातार-पणामुळें व दगदगीमुळें तो लवकरच मरण पावला (१८००). त्याच्या-बरोबर महाराष्ट्रांतील मुत्सद्दीपणा लयास गेला.

याच संधीस तुकोजीराव होळकर वारला. आणि त्याचा शूर व धाडशी पुत्र यशवंतराव याचें शिंद्याशीं भांडण जुंपलें. दोघांनींही एकमेकांच्या राजधान्या जाळल्या आणि मग यशवंतराव पुण्याकडे वळला. पुण्यापासून थोड्या अंतरावर शिंदे व होळकर यांची लढाई झाली. तींत पेशव्यांनीं शिंद्यास मदत केली, तरी त्याचाच पराभव झाला. तेव्हां बाजीराव सिंह-गडास पळाला. माझें भांडण फक्त शिंद्याशीं आहे, तुम्ही परत या, असें होळकरानें त्यास कळविलें. तरी तो भित्रा व संशयी पेशवा परत न येतां

उलट तेथूनही पळाला व वसईस इंग्लिशांच्या आश्रयास गेला! मग असा तह ठरला कीं, "इंग्लिशांनीं बाजीरावास पुण्यास नेऊन गादीवर बसवावें. पेशव्यांच्या राज्यांत इंग्लिशांची सहा हजार फौज व तोफखाना असावा व त्याच्या खर्चासाठीं बाजीरावानें २६ लक्षांचा मुलूख इंग्लिशांस द्यावा. निजाम व गायकवाड यांशीं इंग्लिशांच्या मार्फतच बोलावें आणि कोणाशींही, खुद्द पेशव्यांचे सरदार शिंदे होळकर यांशीं देखील, तह किंवा लढाई करणें तर ती इंग्लिशांच्या सल्ल्याशिवाय करूं नये!" अशा रीतीनें बाजीरावानें 'दोस्तीच्या तहानें' आपणास बांधून घेतलें आणि इंग्रज सेनेसह तो पुण्यांत येऊन पेशवाई करूं लागला (१८०३).

मराठी साम्राज्याचा डोलारा यावेळीं मुख्यत्वेंकरून पेशवे, गायकवाड, भोसले, शिंदे व होळकर या पांच खांबांवर उभा होता. त्यांपैकीं गायकवाडांनीं इंग्लिशांशीं 'दोस्तीचा तह' आधींच केला होता. आतां पेशव्यांनींही केला. तेव्हां असाच 'दोस्तीचा तह' करण्याविषयीं इंग्लिशांनीं शिंदे व भोसले यांकडे बोलणें लाविलें. पण तें त्यांस पटलें नाहीं, म्हणून इंग्लिशांनीं त्यांशीं युद्ध सुरू केलें. असई व लासवारी येथें शिंद्यांचा व आडगांव येथें भोसल्यांचा पराभव झाला. तेव्हां त्यांनीं बराचसा मुलूख इंग्लिशांस देऊन त्यांशीं तह केला (१८०३).

आतां फक्त यशवंतराव होळकर राहिला होता. त्यानें इंग्लिशांशीं युद्ध सुरू केलें. पण त्याचा पराभव होऊन त्यासही इंग्लिशांशीं 'दोस्तीचा तह' करावा लागला (१८०४). याप्रमाणें मराठी साम्राज्याचे पांची आधारस्तंभ कमजोर होऊन तें डळमळूं लागलें.

---

## ४९. मराठ्यांच्या राज्याचा शेवट.

बाजीरावानें इंग्लिशांशीं वसईचा तह केला खरा, पण तो त्यास लवकरच जाचूं लागला. त्यानें शिंदे होळकरांकडे सहज वकील पाठविला

तरी तो कां पाठविला याची चौकशी होऊं लागली आणि त्यास नाशकास किंवा पंढरपुरास जावयाचें झालें तरी इंग्रजांची परवानगी लागूं लागली. असा बाजीराव सर्वस्वीं पराधीन होऊन गेला.

बाजीराव भित्रा, व्यसनी व मूर्ख असल्यामुळेंही त्याचें बल कमी झालें. हलके लोक मोठ्या योग्यतेस चढले. मक्त्यानें मामलती देण्याची सुरवात झाल्यामुळें प्रजा गांजली आणि प्रतिनिधि, रास्ते, यांसारख्या पिढीजाद सरदारांच्याही जहागिरी बाजीरावानें जप्त केल्यामुळें त्या सरदारवर्गाचेंही पाठबळ त्यास राहिलें नाहीं.

पेशव्यांची गायकवाडांकडे फार बाकी तुंबली होती. तिचा हिशेब करण्यासाठीं गायकवाडांचा दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन हा पेशव्यांकडे आला होता. त्याचा पंढरपुरास खून झाला (१८१५). त्रिंबकजी डेंगळे म्हणून बाजीरावाच्या मर्जींतला माणूस होता, त्यानें हा खून करविला अशी बातमी इंग्लिशांस समजली. तेव्हां त्यांनीं बाजीरावाकडून त्रिंबकजीस मागून घेतलें व ठाण्याचे किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. पण तेथून तो पळाला. तेव्हां, त्यास एक महिन्याचे आंत धरून द्या, असें इंग्लिशांनीं बाजीरावास फर्माविलें! आणि त्याजपासून सन १८१७ त पुढील करार करून घेतला. " बाजीरावानें गायकवाडांकडे मागील बाकी मागूं नये व खंडणीबद्दल दरसाल साडेचार लक्ष रुपये घेऊन स्वस्थ बसावें आणि इंग्लिशांस खर्चासाठीं सव्वीस लक्षांऐवजीं चौतीस लक्षांचा मुलूख द्यावा. "

याप्रमाणें बाजीराव अधिकाधिक परतंत्र होऊं लागला. तेव्हां एकदां सोक्षमोक्ष करावा म्हणून त्यानें इंग्लिशांशीं युद्ध सुरू केलें. शिवाजीच्या वेळेपासून खर्ड्याच्या लढाईपर्यंत दीडशें वर्षांच्या काळांत मराठ्यांना शेंकडों लढाया मारिल्या. पण एक पानिपतचा अपवाद सोडून दिला तर

एकाही मोठ्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाल्याचें उदाहरण नाहीं! अर्थात् वीरत्वांत मराठे कोणासही हार जाणारे नव्हते. पण यावेळीं त्यांची इंग्लिशांशीं गांठ पडली तेव्हां त्यांचे पूर्ण पराभव झाले. याचें कारण इंग्लिशांचें सैन्य कवाईत शिकलेलें असून त्याची शिस्त उत्तम होती आणि त्यापाशीं नवीन तऱ्हेचीं फार लांब पल्ल्याचीं शस्त्रें होतीं. अन्यपक्षीं मराठ्यांचें सैन्य बिनकवायती होतें व त्यापाशीं जुन्या तऱ्हेचींच शस्त्रें होतीं. शिवाय स्वतः बाजीरावाचे आंगीं कांहींच पराक्रम नव्हता. खडकी, कोरेगांव व अष्टें येथें लढाया झाल्या त्यांत त्याचा पराभव झाला आणि अष्टें येथील लढाईत त्याचा शूर सेनापति बापू गोखले पडला तेव्हां बाजीराव पळूं लागला. भोसले व होळकर यांनींही थोडीशी गडबड केली. पण त्यांचाही पराभव झाला. तेव्हां बाजीराव इंदुराजवळ इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. इंग्लिशांनीं त्यास दरसाल आठ लक्षांची नेमणूक ठरवून ब्रह्मावर्तास ठेविलें आणि पेशव्यांचें सारें राज्य हस्तगत केलें ( १८१८ ).

शाहूच्या नंतरचे सातारचे राजे नामधारीच होते. रामराजा हा १७४८ ते १७७७ पर्यंत गादीवर होता. त्याचे मागून गादीवर आलेला शाहूराजा १८०८ त वारला. या शाहूचा पुत्र प्रतापसिंह हा गादीवर असतां पेशव्यांचें राज्य गेलें. तेव्हां इंग्लिशांनीं प्रतापसिंहास १४ लक्षांचा मुलूख देऊन सातारचे गादीवर ठेविलें. पण पुढें १७३९ त कांहीं संशयावरून त्यास काढून काशीस नेऊन ठेविलें व त्याचा भाऊ शहाजी हा सातारचा राजा झाला. हा शहाजी सन १८४८ त वारला. तेव्हां त्यास औरस पुत्र नव्हता, म्हणून सातारचें राज्य खालसा करण्यांत आलें. अशा प्रकारें शिवाजीनें स्थापन केलेल्या मराठ्यांच्या राज्याचा शेवट झाला.

---



सरदार बापू गोखले.

## ५०. इंग्रजी अमदानी.

पेशव्याचे विस्तीर्ण राज्य इंग्रजांचे हातीं आलें तेव्हां त्याची सुव्यवस्था लावण्याचें काम एल्फिन्स्टन साहेबाकडे सोंपविण्यांत आलें. हा एल्फिन्स्टन पूर्वीं पेशव्यांचे दरबारीं वकील होता. यामुळें त्यास मराठ्यांच्या राज्यपद्धतीची व येथील लोकांची चांगली माहिती होती. यानें प्रथमच जाहीर केलें कीं, मराठी राज्यांत ज्या लोकांकडे ज्या ज्या जहागिरी, इनामें किंवा उत्पन्नें असतील तीं तीं त्यांजकडे पूर्वीप्रमाणें चालू राहतील आणि त्या उत्पन्नाचे मोबदला त्यांस पूर्वीं जी लष्करी चाकरी करावी लागे ती यापुढें करावी लागणार नाहीं. असें आश्वासन मिळतांच सरदार वगैरे लष्करी पेशाचे सारे लोक आपआपल्या जागीं जाऊन स्वस्थ बसले आणि चोहोंकडे शांतता झाली.

मराठ्यांचे राज्यांत वसुलाची व एकंदर मुलकी कारभाराची जी व्यवस्था होती ती एल्फिन्स्टननें तशीच चालू ठेविली आणि पाटील कुलकर्ण्यांपासून बहुतेक सारे मुलकी कामदार पूर्वीचेच कायम ठेविले. यामुळें राज्य बदललें तरी बिलकूल अव्यवस्था झाली नाहीं आणि तेणेंकरून प्रजेस सुख झालें.

इंग्रजी अमदानींत आगगाड्या व आगबोटी सुरू होऊन दळणवळणाची साधनं वाढलीं. यामुळें प्रवास सुखकर झाला. हजारों कोसांवरून मालाची नेआण सहज करतां येऊं लागली आणि दुष्काळानें उपासमर होण्याची भीति कमी झाली. मराठी राज्याचे वेळीं देशांत नेहमीं लढाया सुरू असत. पण इंग्रजांचें सर्वत्र एकछत्री राज्य झाल्यामुळें साऱ्या देशांत पूर्ण शांतता नांदूं लागली. यामुळें शेतीस व दुसऱ्या उद्योगधंद्यांस उत्तेजन

मिळालें. शिवाय सरकारनें पाटबंधारे पुष्कळ केल्यामुळेंही शेतीस मोठा फायदा होत आहे. सरकारनें प्रजेसाठीं टपाल व तारायंत्र यांची सर्वत्र व्यवस्था केली आहे. शाळाखातें सुरू करून प्रजेस सर्व प्रकारचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली आहे. मोठ्या गांवीं दवाखाने उघडून गरिबांस औषधपाणी मोफत मिळण्याची सोय केली आहे. सर्व लोकांची मालमत्ता व जीवित सुरक्षित राहील असा उत्तम बंदोबस्त ठेविला आहे आणि न्यायकोर्टें स्थापून सर्वांस चोख न्याय मिळेल अशीही तजवीज केली आहे. सारांश, इंग्रजसरकारचे अमदानींत प्रजेला नानाप्रकारच्या सुख-सोयी लाभल्या असून तिची भरभराट होत आहे.

जे इंग्लंडचे राजे तेच हिंदुस्थानचे बादशहा होत. महाराणी व्हिक्टोरिया ही फार थोर बादशाहीण होऊन गेली. तिनें पुष्कळ वर्षे राज्य उपभोगिलें. तिचे मागून तिचे पुत्र बादशहा सातवे एडवर्ड यांनीं सन १९०१ ते १९१० पर्यंत राज्य केलें आणि त्यांचे पश्चात् त्यांचे पुत्र बादशहा पंचमजार्ज हे सिंहासनावर विराजमान झाले आहेत.

हे बादशहा दीर्घायुषी व्हावे आणि त्यांचे कारकीर्दींत आपली विशेष भरभराट व्हावी म्हणून दयाघन प्रभूची प्रार्थना करणें हें आपलें प्रजाजनांचें कर्तव्य होय.

समाप्त

REFBK-0001962

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........



बादशहा पंचम जार्ज.